# सहकार

## इयत्ता अकरावी









# भारताचे संविधान

**भाग ४ क**

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २०.६.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# सहकार

## इयत्ता - अकरावी



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११००४.

P8A1U6

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१९
तिसरे पुनर्मुद्रण : २०२२

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे – ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**समिती सदस्य**

| | |
|---|---|
| श्री. मोहन साळवी | (अध्यक्ष) |
| डॉ. मुकुंद तापकीर | (सदस्य) |
| डॉ. प्रशांत साठे | (सदस्य) |
| डॉ. ज्योती गायकवाड | (सदस्य) |
| श्री. सुरेंद्र निरगुडे | (सदस्य) |
| श्री. महेश आठवले | (सदस्य) |
| श्रीमती अनंतलक्ष्मी कैलासन | (सदस्य) |
| श्री. नारायण पाटील | (सदस्य) |
| श्रीमती लक्ष्मी पिलाई | (सदस्य) |
| श्रीमती मृणाल फडके | (सदस्य) |
| श्रीमती उज्ज्वला गोडबोले | (सदस्य - सचिव) |

**अभ्यासगट सदस्य**

श्री. किशोर सावकारे
श्री. अनिलकुमार महाजन
श्री. महादेव कांबळे
श्री. राजेंद्रकुमार व्हनमाने
श्री. अरूण गायकवाड
श्री. प्रमोद शिरोडे
श्री. प्रकाश भस्मे
श्री. प्रकाश बोकडे
श्रीमती पल्लवी राजेश

**समन्वयक**

**उज्ज्वला श्रीकांत गोडबोले**
प्र. विशेषाधिकारी गणित,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**मुखपृष्ठ व सजावट**
श्री. संदिप कोळी, चित्रकार, मुंबई

**अक्षरजुळणी**
बलदेव कॉम्प्युटर्स, मुंबई-२८

**निर्मिती**

**सचिन मेहता**
मुख्य निर्मिती अधिकारी

**संजय कांबळे**
निर्मिती अधिकारी

**प्रशांत हरणे**
सहायक निर्मिती अधिकारी

**कागद**
७० जी.एस.एम.क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

**मुद्रक**

**प्रकाशक**
**विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक**
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई २५

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

तुम्हां सर्वांचे अकरावीच्या वर्गात स्वागत आहे!

इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी ‘सहकार’ या विषयाचे क्रमिक पाठ्यपुस्तक आपल्या हाती सोपवितांना आम्हांस अतिशय आनंद होत आहे.

आपल्या सभोवताली सजीव सृष्टीमध्ये सहकार दिसून येतो. उच्च माध्यमिक स्तरावर ‘सहकार’ या विषयाची निवड कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थी प्रथमत: करतात. सहकार ही एक नैसर्गिक मानवी प्रवृत्ती आहे. त्यामुळे या विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन यासाठीचे अध्ययन करणे आवश्यक आहे.

अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या सर्व बाबींचा योग्य आणि सुसंबंध पद्धतीने या पुस्तकात समावेश केलेला आहे.

अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना सहकाराचा इतिहास, सहकारी संस्थेची स्थापना, विविध व्यवसाय संघटना, सहकाराची तत्वे, सहकारी संस्थांचे महत्वाचे प्रकार इ. बाबत ज्ञान मिळवून त्याचा दैनंदिन जीवनात उपयोग करता यावा, यासाठी ‘सहकार’ विषयाच्या पाठ्यपुस्तकाची रचना सहज व सोप्या भाषेत करण्यात आली आहे. उपघटकांची यादी प्रत्येक घटकाच्या सुरूवातीला देण्यात आली आहे. पाठ्यपुस्तकांमध्ये आवश्यक ती माहिती सविस्तर देण्यात आली आहे.

पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीला अभ्यासक्रमाची क्षमता विधाने दिली आहेत. त्यामुळे या क्षमतांना अनुसरून आशय समजावून देतांना पाठ्यपुस्तकात आकृत्या व चित्रे यांचा वापर केला आहे. तसेच विद्यार्थी चर्चेतून खूप काही शिकतात, म्हणून ‘चर्चा करा’ या शीर्षका अंतर्गत काही चर्चा करायला सांगितले आहे. सहकारी संस्थांना भेट देऊन विद्यार्थ्यांनी माहिती संकलित करायची आहे, यासाठी काही कृती या पाठ्यपुस्तकात दिल्या आहेत. कृती केल्यावर स्वत:चे मत व्यक्त करण्याची संधी या पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांना दिली आहे. त्यासाठी संबंधित स्वरूपाचे प्रश्न स्वाध्यायात अंतर्भूत केले आहेत. प्रत्येक विषय घटकाच्या शेवटी महत्वाच्या संज्ञा, सारांश व स्वाध्याय दिलेला आहे.

इयत्ता अकरावी सहकार विषयाच्या पुनर्रचित अभ्यासक्रमाची शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून अंमलबजावणी होत आहे.

विद्यार्थ्यांच्या वयोगटाचा विचार करून या पाठ्यपुस्तकात आशयाचे लेखन केले आहे.

अध्ययन परिणामकारक होण्यासाठी ‘क्यू आर कोड’ द्वारे आशयाची अधिक माहिती मिळवण्यासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य आपणांस प्राप्त होईल. त्याचा अध्ययनासाठी निश्चित उपयोग होईल.

तुम्हांला तुमच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा!

(डॉ. सुनिल मगर)
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

पुणे
दिनांक : २० जन २०१९
भारतीय सौर दिनांक - ३० ज्येष्ठ १९४१.

# क्षमता विधाने

**इयत्ता ११वी सहकार विषयाच्या अभ्यासक्रमातून खालील क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होतील.**

| घटक क्रमांक | घटक | क्षमता विधाने |
|---|---|---|
| १ | सहकार<br>अर्थ<br>इतिहास<br>वैशिष्ट्ये<br>महत्त्व | • सहकाराच्या मूलभूत संज्ञा, व्याख्या आणि संकल्पनांची माहिती सांगता येणे.<br>• सहकाराचा इतिहास सांगता येणे.<br>• सहकाराची वैशिष्ट्ये सांगता येणे.<br>• सहकाराचे महत्त्व सांगता येणे. |
| २ | विविध व्यवसाय संघटनांचा तुलनात्मक अभ्यास | • विविध व्यवसाय संघटन प्रकाराचे वर्गीकरण करता येणे.<br>• व्यक्तिगत व्यापारी, भागीदारी, संयुक्त भांडवली संस्था, या व्यवसाय संघटनांच्या संकल्पनांचे आकलन होऊन वैशिष्ट्ये सांगता येणे.<br>• विविध व्यवसाय संघटना व सहकारी संस्था यांची तुलना करता येणे. |
| ३ | सहकाराची तत्वे | • सहकाराची पुनर्निर्धारित मूलतत्त्वे सांगता येणे.<br>• सहकाराची सर्वसामान्य तत्वे सांगता येणे. |
| ४ | सहकारी संस्थेची स्थापना | • सहकारी संस्थेच्या स्थापनेतील प्रवर्तन अवस्थेबाबत माहिती सांगता येणे.<br>• सहकारी संस्थेच्या स्थापनेतील नोंदणी अवस्थेबाबत माहिती सांगता येणे.<br>• सहकारी संस्थेच्या प्रवर्तकाचा अर्थ व कार्ये सांगता येणे. |
| ५ | सहकारी संस्थांचे प्रकार (अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, कार्ये) | • सहकारी पतपुरवठा संस्थेचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, कार्ये यांची माहिती सांगता येणे.<br>• सहकारी सेवा संस्थेचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, कार्ये यांची माहिती सांगता येणे.<br>• सहकारी प्रक्रिया संस्थेचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, कार्ये, सहकारी प्रक्रिया उद्योग यांची माहिती सांगता येणे.<br>• सहकारी विपणन संस्थेचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, कार्ये, संघटन रचना यांची माहिती सांगता येणे.<br>• सहकारी गृहनिर्माण संस्थेचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, कार्ये यांची माहिती सांगता येणे.<br>• ग्राहक सहकारी संस्थेचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, कार्ये, प्रकार यांची माहिती सांगता येणे. |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | सहकार - अर्थ, इतिहास, वैशिष्ट्ये, महत्त्व | १ |
| २ | विविध व्यवसाय संघटन प्रकारांचा तुलनात्मक अभ्यास | १४ |
| ३ | सहकाराची तत्वे | ३१ |
| ४ | सहकारी संस्थेची स्थापना | ४० |
| ५ | सहकारी पतपुरवठा संस्था | ५३ |
| ६ | सेवा सहकारी संस्था | ६३ |
| ७ | प्रक्रिया सहकारी संस्था | ७३ |
| ८ | सहकारी विपणन संस्था (सहकारी खरेदी - विक्री संस्था) | ८७ |
| ९ | सहकारी गृहनिर्माण संस्था | १०१ |
| १० | ग्राहक सहकारी संस्था | १११ |
| | संदर्भ सूची | १२४ |
| | संक्षिप्त रूपे | १२४ |

# १. सहकार –अर्थ, इतिहास, वैशिष्ट्ये आणि महत्त्व
(Co-operation – Meaning, History, Features and Importance)


| | | | |
|---|---|---|---|
| १.१ | प्रस्तावना | १.५ | महत्त्व |
| १.२ | अर्थ व व्याख्या | १.६ | सारांश |
| १.३ | इतिहास | १.७ | महत्त्वाच्या संज्ञा |
| १.४ | वैशिष्ट्ये | १.८ | स्वाध्याय |


## १.१ प्रस्तावना (Introduction) :

प्राचीन काळापासून सहकार हा मानवी संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. मानवाच्या शिकारी अवस्थेपासून आजच्या प्रगत अवस्थेपर्यंतचा विचार केला तर असे आढळते की, एकत्रितपणे विचार करणे व काम करणे ही मानवाची सहज आणि नैसर्गिक प्रवृत्ती आहे. त्यातून त्याला सुखी आयुष्य जगण्याची प्रेरणा मिळते. त्यातूनच त्याच्या आर्थिक आणि सामाजिक आयुष्यात पुढे क्रांतीकारक बदल घडून आले. सहकार ही मानवी सहजीवनाच्या कल्पनेची एक प्रगत अवस्था आहे. यामध्ये मानवास आर्थिक व सामाजिक विकासासाठी आणि अन्याय निवारण्यासाठी एकत्र येण्याची प्रखर इच्छा निर्माण होते. मानवाच्या जीवनप्रणालीचा इतिहास हा सहकाराचा इतिहास आहे. त्यामुळे आधुनिक अर्थव्यवस्थेत सहकाराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

सहकार म्हणजे एकमेकांना मदत करणे, कौटुंबिक व सामाजिक जीवनात एकत्रित राहणे व काम करणे. सहकार आणि मानवी सहजीवन यांचा जवळचा संबंध आहे. सहकारामध्ये व्यक्तिंनी एकत्रित राहण्याबरोबरच एकमेकांना मदत करण्यासाठी केलेल्या सामूहिक प्रयत्नांचाही समावेश होतो. सर्वांनी मिळून एकमेकांच्या मदतीने सर्वांच्या हितासाठी एकत्रित काम करणे याला सहकारात विशेष महत्त्व आहे.

या प्रकरणात आपण सहकाराच्या संकल्पनांचा अभ्यास करणार आहोत.

## १.२ सहकार/सहकारी संस्थेचा अर्थ व व्याख्या (Meaning and Definition of Co-operation) :

### १.२.१ अर्थ :

सहकाराला इंग्रजीमध्ये Co-operation असे म्हणतात. Co-operation हा मूळ शब्द लॅटिन भाषेतील Co-operari या शब्दापासून आला आहे. या शब्दातील Co म्हणजे 'सह' किंवा एकत्र व operari म्हणजे कार्य करणे असा या शब्दांचा अर्थ आहे. त्यामुळे Co-operation म्हणजे एकत्रितपणे काम करणे होय. कोणतेही काम एकत्रितपणे करावयाचे असल्यास त्यासाठी इतर व्यक्तिंची मदत घेणे आवश्यक असते. लोकांना स्वत:च्या ज्या गरजा वैयक्तिकरित्या पूर्ण करता येत नाहीत अशा गरजा एकमेकांच्या साहाय्याने सहकारात पूर्ण केल्या जातात. सहकार म्हणजे समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तिंनी एकत्रित येऊन एकमेकांच्या मदतीने आपल्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी स्थापन केलेली संस्था होय.

### १.२.२ व्याख्या :

अनेक विचारवंतांनी सहकाराच्या किंवा सहकारी संस्थेच्या केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे.

१) एच.कॅल्व्हर्ट– ''मानवी भूमिकेतून व्यक्तिंनी स्वेच्छेने एकत्र येऊन आपल्या आर्थिक हिताच्या वृद्धीसाठी समानतेच्या तत्त्वावर स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय.''

२) श्री. वैकुंठलाल मेहता (भारतीय सहकारी चळवळीचे प्रणेते) – ‘‘समान गरजा असलेल्या व्यक्तिंनी एकत्र येऊन आपल्या समान आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी स्वेच्छेने स्थापन केलेला संघटन प्रकार म्हणजे सहकारी संस्था होय.’’

३) भारतीय सहकार कायदा (१९१२) – ‘‘सहकारी तत्वांना अनुसरुन आपल्या सभासदांचे आर्थिक हितसंबंध वृद्धींगत करण्याचे ज्या संस्थेचे उद्दिष्ट असते तिला सहकारी संस्था असे म्हणतात’’.

४) सहकार नियोजन समिती (१९४६) – ‘‘सहकार हा व्यवसाय संघटनेचा एक प्रकार असून व्यक्ती आपल्या हितरक्षणासाठी समानतेच्या तत्वावर स्वेच्छेने एकत्र येतात.’’

५) प्रा. पॉल लॅम्बर्ट – ‘‘स्वत:च्या उपयोगासाठी व्यक्तिंच्या समूहाने निर्माण केलेली आणि दिग्दर्शित केलेली, लोकशाही नियमानुसार चालविलेली, सभासद व एकूण समाज यांच्या सेवेसाठी स्थापन झालेली व्यवहार संस्था म्हणजे सहकारी संस्था होय.’’



**कृती–**

**१) तुमच्या दैनंदिन जीवनातील अशी काही उदाहरणे सांगा की, ज्यामध्ये सहकाराचा अवलंब केला जातो.**

**२) ‘‘व्यक्ती विकासासाठी सांघिक भावना महत्त्वाची असते’’ चर्चा करा.**

## १.३ सहकाराचा इतिहास – (History of Co–operation) :

प्रस्तुत प्रकरणात आपण जागतिक, भारतातील व महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा इतिहास थोडक्यात अभ्यासणार आहोत.

### १.३.१ जागतिक सहकारी चळवळ :

सहकारी चळवळीचा उगम सर्वप्रथम युरोप खंडातील इंग्लंडमध्ये झाला. इ. स.१७६० मध्ये युरोपात औद्योगिक क्रांती घडून आली. औद्योगिक क्रांतीच्या प्रभावामुळे भांडवलशाही प्रवृत्ती वाढीस लागली. परिणामी अधिकाधिक नफा मिळविण्याच्या भांडवलदारांच्या प्रवृत्तीमुळे ग्राहकांचे व कामगारांचे शोषण होऊ लागले. कामगारांना फारच कमी वेतन देण्यात येऊ लागले. शिवाय त्यांचे कामाचे तास वाढविण्यात आल्याने कामगारांच्या दारिद्र्यात भर पडली. ग्राहकांना नकली माल, कमी वजनमापाचा, भेसळयुक्त माल महागड्या किंमतीत कंपन्या विकू लागल्या. त्यामुळे त्यांचेही आर्थिक शोषण होऊन असा वर्ग अधिकाधिक गरीब होत गेला. भांडवलदारांच्या नफ्यात वाढ होऊन ते अधिकाधिक श्रीमंत झाले. गरीब व श्रीमंत यांच्यामधील दरी वाढत जाऊन आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणावर वाढली. त्यावर उपाय शोधण्याचे प्रयत्न सुरू झाले.

भांडवलशाही समाजव्यवस्था व नफेखोरीच्या प्रवृत्तीमुळे ‘सहकार’ या संकल्पनेचा उदय झाला. सर रॉबर्ट ओवेन यांनी कामगारांच्या सहकारी संस्था स्थापन केल्या. तसेच त्यांनी सहकारी तत्वांचा प्रत्यक्ष व्यवहारात यशस्वीपणे वापर करून सहकाराचा पाया रचला. म्हणून सर रॉबर्ट ओवेन यांना ‘आधुनिक सहकारी चळवळीचे जनक’ मानले जाते. इंग्लंडमधील रॉश्डेल येथे २८ विणकरांनी एकत्र येऊन सहकारी तत्वावर सन १८४४ मध्ये ‘रॉश्डेल इक्वीटेबल पायोनियर्स सोसायटी लिमिटेड’ या संस्थेची स्थापना करून सहकारी ग्राहक भांडार सुरू केले व सहकारी चळवळीचा पाया घातला गेला.

याच कालखंडात जर्मनीमध्ये पतपुरवठा सहकारी चळवळ सुरू झाली. कॅनडा, चीन, रशियामध्ये शेती सहकारी संस्थांच्या माध्यमातून सहकारी चळवळ सुरू झाली. डेन्मार्क या देशात दुग्ध उत्पादन सहकारी संस्थांच्या स्थापनेतून सहकारी चळवळ सुरू झाली. स्वीडन मध्ये ग्राहक सहकारी संस्था सुरू झाल्या. यानंतरच्या काळात हळूहळू जगातील इतर देशांमध्ये सहकारी चळवळीच्या माध्यमातून सहकारी संस्था सुरू झाल्या.

इ. स.१८९५ मध्ये लंडन येथे आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची (International Co–operative Alliance) स्थापना झाली. ही संघटना सहकारी तत्वांचे पालन करणाऱ्या सहकारी संस्थांचे जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व करते. जागतिक सहकारी चळवळीच्या विकासात या संस्थेचे योगदान फार महत्वाचे आहे.



**कृती–**

**३) सर रॉबर्ट ओवेन यांना आधुनिक सहकारी चळवळीचे जनक मानले जाते. चर्चा करा.**

### १.३.२ भारतीय सहकारी चळवळ :

१८ व्या शतकात इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे वस्तूंचे मोठया प्रमाणावर उत्पादन होऊ लागले. पक्क्या मालाची हक्काची बाजारपेठ व कच्च्या मालासाठी भारताच्या भूप्रदेशाचा वापर ब्रिटिशांनी केला. औद्योगिक क्रांतीचा दुष्परिणाम व ब्रिटिशांच्या कूटनीतीमुळे भारतातील लघु व कुटीरोद्योग बंद पडले. कारागीर व कामगार बेकार झाले. रोजगारासाठी ते शेतीकडे वळले. परिणामी शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या वाढली. शेतीवरील अतिरिक्त भार, दुष्काळ यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती दुर्बल झाली. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढला. शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा वाढून ते सावकारी पाशात अडकले. शेतकऱ्यांना सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना पतपुरवठा करण्याच्या दृष्टीने कायदेशीर उपाय योजले.

मुंबई प्रांतातील बडोदा येथे भारतातील पहिली सहकारी पतपुरवठा संस्था ५ फेब्रुवारी, १८८९ रोजी स्थापन झाली. प्रा. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांनी 'अन्योन्य सहाय्यकारी मंडळी' या नावाने पहिली पतपुरवठा संस्था स्थापन केली. ब्रिटिश सरकारने भारतातील सहकारी चळवळीस मूर्त स्वरूप देणारा पहिला सहकार कायदा सन १९०४ मध्ये संमत केला. भारतीय शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक जीवनास नवे वळण देणारा हा कायदा होता. हा कायदा फक्त पतसंस्था स्थापन करण्यापुरताच मर्यादित होता. सन १९०४ च्या कायद्यातील त्रुटी व उणिवा दूर करण्यासाठी सन १९१२ मध्ये दुसरा सहकार कायदा संमत केला. या सहकार कायद्यामुळे सहकारी संस्थांची स्थापना सर्व क्षेत्रात होऊ लागली.

भारतातील सहकारी चळवळीची प्रगती व त्रुटी अभ्यासण्यासाठी सन १९१४ साली ब्रिटीश सरकारने एडवर्ड मॅक्लेगन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने सहकारी चळवळीच्या भविष्यातील वाटचालीबाबत मौलिक सूचना केल्या. पहिल्या महायुद्धानंतर सन १९१९ मध्ये ब्रिटिश सरकारने 'मॉन्टफोर्ड सुधारणा कायदा' मंजूर केला. या कायद्यामुळे सहकार हा विषय केंद्र सरकारकडून प्रांतिक सरकारांच्या अखत्यारित आला. त्यानुसार सर्वप्रथम मुंबई प्रांताने सन १९२५ मध्ये सहकार कायदा संमत केला.

सहकारी चळवळीची पुनर्रचना करण्यासाठी ज्या विविध समित्या नियुक्त केल्या होत्या त्यांच्या शिफारशीवरुन भारतात रिझर्व्ह बँकेची स्थापना १ एप्रिल, १९३५ रोजी करण्यात आली. या बँकेने शेती पतपुरवठा विभाग सुरू केला. यानंतरच्या काळात केंद्र सरकारने सहकाराच्या विकासासाठी प्रा.धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली 'कृषी अर्थपुरवठा समिती' (१९४४) व श्री.आर.जी.सरैय्या यांच्या अध्यक्षतेखाली 'सहकार नियोजन समिती' (१९४५) नियुक्त केली. बँकिंग सोयी व सुधारणासाठी सरकारने श्री.पुरुषोत्तमदास ठाकुरदास यांच्या अध्यक्षतेखाली 'ग्रामीण व बँकिंग चौकशी समिती' (१९४९) नेमली. सन १९५१ मध्ये ग्रामीण कर्जपुरवठ्याचा अभ्यास करून शिफारस करण्यासाठी 'अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीची' डॉ. ए. डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्ती केली होती. सन १९५४ मध्ये या समितीने आपला अहवाल सरकारकडे सादर केला. या समितीने आपल्या अहवालात असे मत नोंदविले की, 'सहकार अयशस्वी ठरला आहे तथापि तो यशस्वी झालाच पाहिजे.'

स्वांतत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारने सन १९५१ पासून पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्याचे धोरण स्वीकारले. पंचवार्षिक योजना दरम्यान सहकारी चळवळीचा विकास व सहकारी चळवळीत लोकांचा सहभाग वाढविणे यावर भर देण्यात आला.

### १.३.३ महाराष्ट्रातील सहकारी चळवळ :

महाराष्ट्र हे सहकार क्षेत्रातील पुढारलेले राज्य असून राज्यभरात सहकारी संस्थांचे मोठे जाळे पसरले आहे. सहकारी पतपुरवठा संस्था, बिगर कृषी पतपुरवठा संस्था, विपणन सहकारी संस्था, ग्राहक सहकारी संस्था, प्रक्रिया सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, मजूर सहकारी संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था अशा विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची स्थापना झाली. त्या यशस्वीपणे कार्यरत असल्यामुळे महाराष्ट्रातील सामान्य नागरिक, शेतकरी या ना त्या कारणामुळे सहकारी संस्थेच्या संपर्कात आला. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला सुमारे शंभर वर्षाहून अधिक काळाचा इतिहास आहे.

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी संस्थेची स्थापना सन १९२३ मध्ये झाली. या बँकेचे पुढे राज्य शिखर बँकेत रूपांतर होऊन ती सध्या 'महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड' म्हणून कार्यरत आहे. महाराष्ट्रामध्ये सहकारी पतपुरवठ्याबाबत त्रिस्तरीय रचना स्विकारलेली आहे. प्राथमिक स्तरावर प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था, जिल्हा स्तरावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, तर राज्य स्तरावर राज्य सहकारी बँक (शिखर बँक) कार्य करते.

स्वातंत्र्यानंतर सन १९५१ मध्ये प्रा.धनंजयराव गाडगीळ व पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखेपाटील यांच्या मार्गदर्शनामुळे प्रवरा सहकारी साखर कारखाना लि., प्रवरानगर जि.अहमदनगर येथे महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन झाला. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी सहकारी चळवळीचे एक नवे पर्व सुरू केले.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० या कायद्यानुसार सहकारी संस्थांचे नियमन व नियंत्रण केले जाते. सन १९६१ मध्ये महाराष्ट्रात विविध प्रकारच्या ३१,५६५ सहकारी संस्था होत्या. मार्च २०१८ अखेर ही संख्या १,९८,२५२ पर्यंत पोहोचली. सहकारी संस्थांच्या संख्येत जसजशी वाढ झाली तसतशी सहकारी संस्थांच्या सभासद संख्येत, भागभांडवल, कर्जे, ठेवी यामध्ये वाढ झाली.


देशातील सहकारी संस्थाच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी केंद्र शासनाने ९७ वी घटनादुरुस्ती अधिनियम २०११ अन्वये सहकार कायद्यात काही सुधारणा केल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने १४ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या अध्यादेशाद्वारे महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मध्ये सुधारणा केल्या आहेत.



**कृती–**

**४) भारतातील सहकारी चळवळीच्या विकासाला चालना देणाऱ्या महत्त्वाच्या घटनांविषयी आपल्या शिक्षकांबरोबर चर्चा करून माहिती घ्या.**

## १.४ सहकाराची वैशिष्ट्ये : (Features/Characteristics of Co-operation)



**सहकाराची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे**

१) **व्यक्तिंचे संघटन :** समाजातील अनेक व्यक्तिंचे उत्पन्न हे मर्यादित असते. अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ति आपल्या समान गरजा सामुहिकरित्या भागविण्यासाठी एकत्र येऊन सहकारी संस्थेची स्थापना करतात. 'प्रत्येक जण सर्वांसाठी व सर्वजण प्रत्येकासाठी' काम करतात. सर्व सभासद संस्थेचे मालक असतात. सहकारी संस्थेत भांडवलापेक्षा व्यक्ति (सभासद) हा घटक महत्त्वाचा असतो. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० नुसार सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी वेगवेगळ्या कुटुंबातील किमान १० व्यक्ती आवश्यक असतात.

२) **ऐच्छिक संघटन :** सहकाराचे सभासदत्व सर्वांना ऐच्छिक असते. म्हणजेच जात, धर्म, पंथ, लिंग, आर्थिक परिस्थिती यांचा विचार केला जात नाही. सहकारी संस्थेत सभासद होण्यासाठी अथवा सभासदत्व रद्द करण्यासाठी कोणत्याही व्यक्तिवर कोणत्याही प्रकारची सक्ती केली जात नाही. सभासद होणे अगर न होणे हे ठरविण्याचा संपूर्ण अधिकार संबंधित व्यक्तिस असतो. म्हणून सहकारी संस्था ही ऐच्छिक संघटना आहे.

३) **समान उद्दिष्ट :** सहकारामध्ये एकत्र येणाऱ्या व्यक्तिंचे उद्दिष्ट एकसमान असते. समान गरजा असणाऱ्या व्यक्ती आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी एकत्र येऊन सहकारी संस्थेची स्थापना करतात. उदा. घराची गरज असणाऱ्या व्यक्ती एकत्र येऊन सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करतात.

४) **लोकशाही संघटन :** सहकारी संस्था ही एक लोकशाही संघटना आहे. सहकारात भांडवलापेक्षा व्यक्तिला अधिक महत्त्व दिले जाते. कोणत्याही सभासदांचे भांडवल कमी किंवा जास्त असले तरी 'एक व्यक्ती एक मत' या तत्त्वाचा अवलंब केला जातो. सहकारी संस्थेचा कारभार सभासदांनी निवडून दिलेले प्रतिनिधी म्हणजेच संचालक मंडळाकडून लोकशाही पद्धतीने चालविला जातो. लोकशाही कारभार हा सहकाराचा गाभा आहे.

५) **समानता :** सहकारी संस्थेचे सभासदत्व देताना त्या व्यक्तिची जात, धर्म, पंथ, वर्ण, लिंग, आर्थिक परिस्थिती, सामाजिक प्रतिष्ठा इत्यादी बाबी विचारात घेतल्या जात नाहीत. सहकारी संस्थेत कोणीही श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नसतो. सर्व सभासदांना समान दर्जा, समान हक्क व अधिकार असतात. म्हणूनच समानता हा सहकाराचा पाया मानला जातो.

६) **आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे एकत्रीकरण :** आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ती स्वबळावर स्वत:ची आर्थिक प्रगती करू शकत नाही. अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ती सहकारी संस्थेच्या माध्यमातून एकत्र येऊन आपली शक्ती वाढवू शकतात. कारण त्यांच्यात संघशक्ती निर्माण झालेली असते. सहकारी संस्थेमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक हे भांडवलदार, व्यापारी, दलाल यांच्याकडून होणाऱ्या आर्थिक शोषण व पिळवणूकीला सामुहिकपणे प्रतिकार करू शकतात. म्हणूनच सहकारी संस्था म्हणजे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तिंचे संघटन होय.

७) **सेवा उद्देश :** सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश आपल्या सभासदांना सेवा देणे हा असतो. नफा मिळविणे हा त्यांचा गौण उद्देश असतो. परंतु व्यवस्थापन खर्च भागेल इतका नफा सहकारी संस्थाना मिळवावा लागतो. किमान खर्चात चांगली सेवा उपलब्ध व्हावी या अपेक्षेने संस्थेचे कार्य चालते. संस्थेला आर्थिक व्यवहारातून झालेला नफा देखील चांगल्या सेवा देण्याकरिता उपयोगात आणला जातो.


८) **परस्पर साहाय्यातून स्वसहाय्य :** सहकारी संस्थेत सभासदांच्या परस्पर सहकार्याला अधिक महत्त्व आहे. ''एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ'' यानुसार सभासद स्वत:चे आर्थिक हित आणि विकास एकमेकांच्या मदतीने करून घेतात. उदा. कर्मचाऱ्यांच्या पतसंस्था या प्रत्येक सभासदांकडून दरमहा ठरावीक वर्गणी गोळा करतात. त्यातून गरजू सभासदाला कमी व्याजदराने कर्ज दिले जाते. सुलभ हप्त्याने परतफेड आणि तारणाशिवाय कर्ज मिळाल्याने सभासदाचा फायदा होतो. असे कर्ज म्हणजे अन्य सभासदांनी एका सभासदाला केलेली आर्थिक मदतच असते.

९) **मध्यस्थांचे उच्चाटन :** अनेक आर्थिक व्यवहारांमध्ये आपल्याला मध्यस्थ आढळतात. असे मध्यस्थ सहकारी संस्थांमध्ये नसतात. कारण मध्यस्थांकडून व्यवहारामध्ये नफा घेतला जातो. त्यामुळे वस्तूंच्या किंमती वाढतात. तसेच मध्यस्थ मालात भेसळ, कमी वजनमापे, फसवणूक आदि अनिष्ट व्यापारी प्रथांचा अवलंब करतात. घाऊक व्यापारी व दलाल यासारख्या मध्यस्थांच्या साखळीतून सभासदांचे व ग्राहकांचे आर्थिक शोषण व पिळवणूक केली जाते. सहकारी संस्था मात्र थेट उत्पादकाकडून वस्तू खरेदी करून सभासदांना व ग्राहकांना पुरवितात. त्यामुळे मध्यस्थांचे उच्चाटन होऊन सभासदांना कमी किंमतीत चांगल्या दर्जाच्या वस्तू उपलब्ध होतात. म्हणून मध्यस्थांचे उच्चाटन हे सहकाराचे महत्वाचे वैशिष्ट्य मानले जाते.

१०) **आर्थिक व सामाजिक चळवळ :** समाजातील आर्थिक दुर्बल घटक आपल्या दुर्बलतेवर मात करून स्वत:चा विकास साधण्याकरिता एकत्र येऊन सहकारी संस्थेची स्थापना करतात. सहकारी संस्थांची जितकी वाढ आणि प्रगती होईल तितक्या प्रमाणात भांडवलदार, कारखानदार आणि व्यापारी वर्गाकडून होणारी समाजाची पिळवणूक व आर्थिक शोषण थांबेल. त्यातून श्रीमंत व गरीब यातील दरी कमी होऊन समाजात आर्थिक समानता निर्माण होण्यास मदत होते. सहकारी संस्थांमुळे समाजातील दुर्बल घटक भांडवलदाराविरुद्ध यशस्वीपणे लढा देतात. जितक्या प्रमाणात सहकारी संस्थांची वाढ आणि प्रगती होईल तितक्या प्रमाणात समाजात समतेवर आधारित अशी समाजरचना तयार होईल. जलद गतीने सामाजिक परिवर्तन घडेल. यासाठी सहकारी चळवळीमध्ये स्वावलंबन, नैतिक विकास, प्रामाणिकपणा यांना महत्त्व दिले जाते. म्हणूनच सहकार हे एक आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे साधन मानले जाते.

११) **व्यवसाय संघटन प्रकार :** सहकारी चळवळ सुरू होण्यापूर्वी व्यवसाय क्षेत्रामध्ये एकल व्यापारी, भागीदारी असे व्यवसाय संघटन प्रकार प्रचलित होते. कालांतराने कंपन्या अस्तित्वात आल्या. या सर्व व्यवसाय संघटना नफा मिळविण्याच्या मुख्य हेतूनेच कार्य करतात. तसेच भांडवल या घटकालाच प्राधान्य देतात. सहकारी संस्थादेखील इतर व्यावसायिक संघटन प्रकाराप्रमाणे व्यवसाय करणारी एक संघटना आहे. परंतु तिचा हेतू नफा मिळविणे हा नसून सेवा देणे व सभासदांचे हित जोपासणे हा असतो.

## १.५ सहकाराचे महत्त्व (Importance of Co-operation) :



सहकारी संस्थांचा देशाच्या आर्थिक विकासामध्ये महत्त्वाचा सहभाग आहे. आधुनिक समाजरचनेत सहकाराला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. सहकाराने देशाच्या ग्रामीण तसेच शहरी जीवनाला एक आकार देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यादृष्टीने सहकाराचे महत्त्व पुढील मुद्‌द्यांवरून अधिक स्पष्ट करता येईल.

१) **एकसंघ समाजाची निर्मिती :** सहकारात व्यक्तिगत हितापेक्षा व्यक्तिसमुहाच्या हिताला प्राधान्य दिले जाते. सहकारामुळे धर्म, जात, पंथ, लिंग, वर्ण इत्यादी भेद कमी होऊन सर्वांना समान मानले जाते. परिणामी समाजामध्ये समता, एकता, बंधुता, सलोखा व सामंजस्य वाढते आणि एकसंघ समाजाची निर्मिती होण्यास मदत होते.

२) **शेतीक्षेत्राचा विकास :** भारतात प्रामुख्याने शेतीक्षेत्राला पतपुरवठा करण्यासाठी सहकारी चळवळ सुरू झाली. सहकारी पतसंस्था शेतकऱ्यांना सुधारित बी-बियाणे, खते, कीटकनाशके , विद्‌युतपंप, पाईपलाईन, अवजारे इत्यादीसाठी अल्प व्याजदराने कर्जपुरवठा करतात. त्यामुळे शेती उत्पादन वाढते. परिणामी शेती क्षेत्राचा विकास होण्यास मदत होते.

३) **औद्योगिक विकास :** कारागीर, लघु व कुटीरउद्योजक एकत्र येऊन औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करतात. या संस्थेमार्फत सभासदांसाठी कच्च्या मालाची खरेदी व पक्क्या मालाची विक्री केली जाते. या संस्था लघुउद्योग, कुटीर उद्योगांना चालना देतात. तसेच सहकारी क्षेत्रामुळे शेतीपूरक व शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचादेखील विकास होतो. सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, सहकारी तेल गिरण्या इत्यादी प्रक्रिया संस्था कार्यरत आहेत. या संस्थामुळे औद्योगिक विकासाला चालना मिळाली आहे.

४) **रोजगार निर्मिती :** सहकारी क्षेत्रामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होण्यास मदत होते. सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या, तेल गिरण्या, इत्यादीमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होतो. याशिवाय शेतमजूर, ऊस तोडणी कामगार, वाहतुकदार, अन्य सेवा पुरविणारे व्यावसायिक यांना अप्रत्यक्षपणे रोजगार उपलब्ध होतो. कोणत्याही सहकारी संस्थेस दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी काही कर्मचाऱ्यांची गरज असते. अशा विविध प्रकारच्या सहकारी संस्थांच्या स्थापनेमुळे रोजगाराच्या संधीत वाढ होते.

५) **मक्तेदारीवर नियंत्रण :** ग्रामीण भागात सावकार शेतकऱ्यांना भरमसाठ व्याजदराने कर्जपुरवठा करतात. सहकारी पतसंस्थांच्या स्थापनेमुळे सावकारांची कर्जपुरवठ्यातील मक्तेदारी कमी होण्यास मदत झाली आहे. सहकारी ग्राहक संस्थांमुळे वस्तू वितरणातील मध्यस्थ व व्यापाऱ्यांची मक्तेदारी कमी झाली आहे. मक्तेदारीच्या दुष्परिणामांपासून ग्राहकांचे संरक्षण होण्यास मदत होते. अशा रितीने सहकारी संस्था मक्तेदारीवर नियंत्रण ठेवतात.

६) **स्वसामर्थ्याची जाणीव :** सहकारामुळे समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ती परस्पर सहाय्याने एकत्र येऊन स्वत:चे संरक्षण करू शकतात. त्यांच्यात स्वसामर्थ्याची जाणीव निर्माण होऊन ते आपले शोषण करणाऱ्यांविरुद्‌ध लढा देऊ शकतात. त्यामुळे आत्मविश्वास वाढून संघटन व व्यवस्थापन कौशल्य इत्यादी गुणांचा विकास होतो. यातून सभासदांमध्ये स्वसामर्थ्याची जाणीव निर्माण होते.

७) **नफ्याचे न्याय्य वाटप :** सहकारी संस्थेला मिळालेले आधिक्य/नफा सर्व सभासदांमध्ये वाटून दिला जातो. आधिक्याचे वाटप हे भाग भांडवलाच्या प्रमाणात व सभासदांनी संस्थेशी केलेल्या आर्थिक व्यवहाराच्या प्रमाणात केले जाते. नफ्याच्या न्याय्य वाटपामुळे वाढीव नफ्यात प्रत्येक सभासदास वाटा मिळतो. परिणामी नफ्याचे न्याय्य वाटप होऊन सभासदांची आर्थिक प्रगती होते.

८) **मध्यस्थांचे उच्चाटन :** सहकारी संस्था या थेट उत्पादकांकडून माल खरेदी करून प्रत्यक्ष ग्राहकांना विकतात. त्यामुळे मध्यस्थ व व्यापाऱ्यांची साखळी नष्ट होण्यास मदत होते. तसेच काही सहकारी संस्था शेतमाल विक्रीची कार्यक्षम

व्यवस्था करतात. त्यामुळे सभासद शेतकऱ्यांना मध्यस्थ, दलाल यांच्यामार्फत माल विकावा लागत नाही. परिणामी मध्यस्थ व दलाल यांच्याकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक व पिळवणूक थांबविता येते. प्रत्यक्ष ग्राहकांना वस्तू विकल्याने शेतमालाला योग्य किंमत मिळते. ग्राहकांनाही तुलनेने वाजवी किंमतीत वस्तू मिळतात. मध्यस्थांकडून होणारी नफेखोरी, वस्तूंची टंचाई,भेसळ, पिळवणूक, आर्थिक शोषण या अनिष्ट प्रवृत्तीस सहकारी संस्थांमुळे पायबंद बसतो. अशा रितीने सहकारी संस्थांमुळे मध्यस्थांचे उच्चाटन होण्यास मदत होते.

९) **खरेदी शक्तीत वाढ :** सहकारी संस्था सभासदांना, ग्राहकांना चांगल्या दर्जाच्या वस्तूंचा पुरवठा वाजवी किंमतीत करतात. वाजवी किंमतीत वस्तू मिळाल्याने पैशाची बचत होते. त्यामुळे सभासदांची खरेदीशक्ती वाढते.

१०) **लोकशाही शिक्षण :** सहकारी संस्थेचे व्यवस्थापन लोकशाही पद्धतीने चालते. सभासदांच्या सर्वसाधारण सभेला सर्वोच्च अधिकार असतात. सहकारी संस्थेचे सर्व निर्णय सभासदांच्या सभेत लोकशाही पद्धतीने सर्वानुमते घेतले जातात. 'एक व्यक्ती एक मत' या नियमाद्वारे सहकारामध्ये लोकशाही तत्त्वप्रणाली व्यवस्थापनासाठी वापरली जाते. सहकारातून सर्वसामान्य लोकांना लोकशाहीचे शिक्षण मिळते. त्यामुळे देशातील लोकशाही बळकट होण्यास मदत होते.



**कृती–**

**५) सहकारी संस्थांमुळे रोजगार निर्मिती होण्यास मदत होते, याविषयी तुमच्या शिक्षकांबरोबर चर्चा करा.**

## ९.६ सारांश

सहकार ही मानवाच्या सहजीवनातून उदयास आलेली संकल्पना असून सहकार म्हणजे एकत्रित राहणे व काम करणे होय.

सहकाराला इंग्रजीमध्ये Co-operation असे म्हटले जाते. Co-operation हा शब्द लॅटिन भाषेतील Co-operari या शब्दापासून आला आहे. Co म्हणजे सह किंवा एकत्र व operari म्हणजे काम करणे होय. अर्थातच Co-operation म्हणजे एकत्रित काम करणे होय.

अनेक विचारवंतांनी सहकाराच्या व्याख्या दिल्या असून या व्याख्यांवरुन असे स्पष्ट होते की, सहकार हे व्यक्तिंचे संघटन असून समान गरजा असलेल्या व्यक्ती आपल्या समान आर्थिक उदि्दष्टांच्या पुर्ततेसाठी समानतेच्या तत्त्वावर एकत्रित आलेल्या असतात.

आधुनिक सहकार चळवळ ही सर्वप्रथम इंग्लंडमध्ये सुरू झाली. सर रॉबर्ट ओवेन हे सहकारी चळवळीचे जनक मानले जातात. इ. स. १८४४ मध्ये इंग्लंडमधील रॉश्डेल येथे २८ विणकरांनी एकत्रित येऊन 'रॉश्डेल इक्वीटेबल पायोनियर्स सोसायटी लिमिटेड' या नावाची पहिली सहकारी संस्था सुरू केली.

स्वातंत्र्य पूर्वकाळात भारतात विविध टप्प्यात सहकारी चळवळीचा विकास झाला. मात्र तो पुरेशा प्रमाणात नव्हता. सन १९०४ व १९१२ च्या सहकार कायद्याने सहकारी चळवळीस गती मिळाली. स्वातंत्र्यानंतर सहकारी चळवळीच्या विकासासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न करण्यात आले.

महाराष्ट्र हे सहकारी चळवळीच्या विकासातील देशातील अग्रेसर राज्य आहे. १९ व्या शतकात महाराष्ट्रामध्ये सहकारी चळवळ सुरू झाली. सन १९६० मधील महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यामुळे सहकारी चळवळीला दिशा मिळाली.

- **सहकाराची वैशिष्ट्ये**

  १) व्यक्तिंचे संघटन
  २) ऐच्छिक संघटन
  ३) समान उद्‌दिष्ट
  ४) लोकशाही संघटन
  ५) समानता
  ६) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे एकत्रीकरण
  ७) सेवा उद्‌देश
  ८) परस्पर साहाय्यातून स्वसहाय्य
  ९) मध्यस्थांचे उच्चाटन
  १०) आर्थिक व सामाजिक चळवळ
  ११) व्यवसाय संघटन प्रकार

- **सहकाराचे महत्त्व**

  १) एकसंघ समाजाची निर्मिती
  २) शेतीक्षेत्राचा विकास
  ३) औद्योगिक विकास
  ४) रोजगार निर्मिती
  ५) मक्तेदारीवर नियंत्रण
  ६) स्वसामर्थ्याची जाणिव
  ७) नफ्याचे न्याय्य वाटप
  ८) मध्यस्थांचे उच्चाटन
  ९) खरेदी शक्तीत वाढ
  १०) लोकशाही शिक्षण

## १.७ महत्त्वाच्या संज्ञा

१) **लोकशाही–** लोकांनी, लोकांसाठी,लोकांमार्फत चालविलेले शासन / कार्यपद्‌धती.

२) **सहकारी चळवळ–** आर्थिकदृष्ट्या दुर्बल व कमकुवत वर्गातील व्यक्तिंनी स्वत:च्या आर्थिक विकासासाठी एकत्र येऊन सुरू केलेली चळवळ.

## १.८ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

१) सहकारी चळवळीचा उगम सर्वप्रथम ----- या देशात झाला.
अ) इंग्लंड ब) जर्मनी क) फ्रान्स

२) समाजातील आर्थिकदृष्ट्या ----- व्यक्ती एकत्रित येऊन सहकारी संस्था स्थापन करतात.
अ) श्रीमंत ब) दुर्बल क) भांडवलदार

३) सहकार म्हणजे ----- चे संघटन होय.
अ) व्यक्ती ब) भांडवल क) मध्यस्थ

४) इंग्लंडमध्ये इ. स. ----- मध्ये सहकारी चळवळ सुरू झाली.
अ) १९४४ ब) १८४४ क) १८८०

५) भारतातील पहिला सहकार कायदा ----- या वर्षी संमत झाला
अ)१९०४ ब) १९६० क) १९१२

६) महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना ----- येथे स्थापन झाला.
अ) कोल्हापूर ब) प्रवरानगर क) नागपूर

७) सहकारी संस्थेत सर्व सभासद ----- मानले जातात.
अ) असमान ब) समान क) गौण

८) सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश ----- हा असतो.
अ) नफा मिळविणे ब) सेवा देणे क) पिळवणूक करणे

९) अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीचे ----- हे अध्यक्ष होते.
अ) प्रा. धनंजयराव गाडगीळ ब) आर.जी. सरैय्या क) डॉ. ए.डी. गोरवाला

**ब) योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| अ) नफ्याचे न्याय्य वाटप | १) सेवा देणे |
| ब) भारतातील पहिला सहकार कायदा | २) १९१२ |
| क) सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश | ३) आर्थिक व्यवहाराच्या प्रमाणात |
| ड) सहकारी संस्थेचा कारभार | ४) हुकूमशाही पद्धतीने |
| इ) सहकारी चळवळीचा उगम देश | ५) जर्मनी |
| | ६) नफा मिळविणे |
| | ७) समान प्रमाणात |
| | ८) लोकशाही पद्धतीने |
| | ९) इंग्लंड |
| | १०) १९०४ |

### क) खालील विधानांसाठी एक शब्द/शब्दसमूह लिहा.

१) सहकारी संस्थेचे मालक

२) आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे एक महत्त्वाचे साधन

३) सहकारी चळवळीचे जनक

४) महाराष्ट्रातील पहिला सहकार कायदा

५) भारतातील दुसरा सहकार कायदा

### ड) खालील विधाने चूक किंवा बरोबर ते लिहा.

१) सहकारी संस्था ही एक ऐच्छिक संघटना आहे.

२) सहकारी संस्था नफा मिळविण्याच्या उद्देशाने स्थापन केल्या जातात.

३) सहकारी संस्था आपल्या सभासदांमध्ये कोणताही भेदभाव करीत नाहीत.

४) सहकारी संस्था ही एक हुकूमशाही संघटना आहे.

५) सहकारी संस्थामुळे मध्यस्थांची साखळी नष्ट होण्यास मदत होते.

६) सहकारी संस्था मक्तेदारीवर नियंत्रण ठेवतात.

### (इ) खालील विधाने पूर्ण करा.

१) सहकार म्हणजे .............. चे संघटन होय.

२) सहकारात भांडवलापेक्षा .............. ला अधिक महत्त्व दिले जाते.

३) भारतातील पहिला सहकार कायदा .......... यावर्षी संमत झाला.

४) भारत सरकारने सन ............... पासून पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्याचे धोरण स्वीकारले.

५) सहकारी चळवळीचा उगम सर्वप्रथम युरोप खंडातील ............. या देशामध्ये झाला.

### (फ) अचूक पर्याय निवडा.

| | |
|---|---|
| १) आधुनिक सहकारी चळवळीचे जनक | |
| २) एक व्यक्ती | |
| ३) | सहकारी चळवळीचा उगम देश |
| ४) आर्थिक व्यवहाराच्या प्रमाणात | |
| ५) | भारतातील पहिला सहकार कायदा |

१९०४, इंग्लंड, एक मत, सर रॉबर्ट ओवेन, नफ्याचे न्याय्य वाटप

### ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सहकार म्हणजे काय?

२) सर रॉबर्ट ओवेन यांना आधुनिक सहकारी चळवळीचे जनक का म्हणतात?

३) संचालक मंडळ म्हणजे काय?

४) ऐच्छिक संघटन म्हणजे काय?

५) इंग्लंडमधील पहिल्या सहकारी ग्राहक भांडाराचे नाव कोणते?

### ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरूस्त करून वाक्य पुन्हा लिहा.

१) सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश नफा मिळविणे हा असतो.

२) महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना मुंबई येथे स्थापन झाला.

३) सहकार म्हणजे भांडवलदारांचे संघटन होय.

४) सहकारी चळवळीचा उगम सर्वप्रथम फ्रान्स या देशात झाला.

५) समाजातील श्रीमंत व्यक्ती एकत्रित येऊन सहकारी संस्था स्थापन करतात.

६) सहकारी संस्था ही एक हुकूमशाही संघटना आहे.

### ई) गटात न बसणारा शब्द शोधा.

१) अ) १९६० चा कायदा ब) १९०४ चा कायदा
क) १९५६ चा कायदा ड) १९१२ चा कायदा

### ज) योग्य क्रम लावा.

१) अ) भारताचा दुसरा सहकार कायदा ब) मुंबई प्रांत सहकार कायदा
क) भारताचा पहिला सहकार कायदा

२) अ) सहकार नियोजन समिती ब) ग्रामीण व बँकींग चौकशी समिती
क) कृषी अर्थपुरवठा समिती

### प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.

१) सहकार

२) समानता

३) लोकशाही शिक्षण

४) एकसंघ समाजाची निर्मिती

५) स्वसामर्थ्याची जाणीव

### प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.

१) एखाद्या व्यक्तिला सहकाराबाबतचे आपले विचार कसे पटवून द्याल.

२) भारतात ''सहकारी चळवळ'' यशस्वी झाली.

## प्र.४ टीपा लिहा.

१) सहकाराचा अर्थ

२) सहकाराचे महत्व

३) सहकाराची वैशिष्ट्ये

४) जागतिक सहकारी चळवळ

## प्र.५ कारणे द्या.

१) सेवा देणे हा सहकारी संस्थांचा प्रमुख हेतू असतो.

२) सहकारी संस्था ही लोकशाही संघटना आहे.

३) सहकारी संस्थामुळे मध्यस्थांचे उच्चाटन होते.

४) सहकार हे सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे एक साधन मानले जाते.

## प्र.६ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१) सहकाराची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) सहकाराचे महत्व स्पष्ट करा.

३) भारतातील सहकारी चळवळीची माहिती लिहा.

## प्र.७ दीर्घोत्तरी प्रश्न.

१) सहकाराची व्याख्या सांगून सहकाराची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) सहकाराचे महत्व सविस्तरपणे स्पष्ट करा.

◆◆◆

# २. विविध व्यवसाय संघटन प्रकारांचा तुलनात्मक अभ्यास
(Comparative Study of Various Forms of Business Organisations)


| | | | |
|---|---|---|---|
| २.१ | प्रस्तावना | २.४ | संयुक्त भांडवली संस्था |
| २.२ | व्यक्तिगत व्यापारी संस्था | २.४.१ | अर्थ व व्याख्या |
| २.२.१ | अर्थ व व्याख्या | २.४.२ | वैशिष्ट्ये |
| २.२.२ | वैशिष्ट्ये | २.५ | विविध व्यावसायिक संघटनांचा तुलनात्मक अभ्यास |
| २.३ | भागीदारी संस्था | २.६ | सारांश |
| २.३.१ | अर्थ व व्याख्या | २.७ | महत्त्वाच्या संज्ञा |
| २.३.२ | वैशिष्ट्ये | २.८ | स्वाध्याय |


## २.१ प्रस्तावना (Introduction) :

व्यापार आणि व्यावसायिक क्षेत्रामध्ये आपणास विविध व्यावसायिक संघटना प्रकार कार्य करीत असतांना आढळतात. व्यापारी संघटना लहान, मध्यम आणि मोठ्या स्वरूपात कार्य करीत असतात. उद्योग, व्यवसाय आणि व्यापाराच्या विकासाच्या कार्यात उत्पादन, निर्मिती, खरेदी-विक्री आणि ग्राहक या सर्व घटकांना एकत्र आणण्याचे कार्य संघटना करीत असतात.

व्यवसाय संघटना कोणत्याही प्रकारची असली तरी समाजाला वस्तू व सेवांचा पुरवठा करणे हा त्यांच्या कार्यामागील मुख्य हेतू असतो.

व्यापारी संघटना म्हणजे अशी रचना की, जी औद्योगिक किंवा व्यापारी कार्य करील आणि वस्तूंचे उत्पादन व पुरवठा यांच्या माध्यमातून फायदा मिळवेल.

व्यवसाय क्षेत्रात कार्य करीत असलेल्या या विविध व्यावसायिक संघटना एकदम निर्माण झाल्या नाहीत तर व्यापाराच्या विकासाच्या अवस्थांतून एकापाठोपाठ एक अशी त्यांची गरजेनुसार निर्मिती झाली.

सुरुवातीस '**एकल व्यापारी**' संस्था निर्माण झाल्या, व्यवसाय वाढविण्यासाठी आणि भांडवल व व्यवस्थापकीय कौशल्ये या गरजा भागवण्यासाठी सामूहिक मालकी असणाऱ्या '**भागीदारी संस्था**' अस्तित्वात आल्या. मोठ्या प्रमाणावर भांडवल उभे करून,व्यवसायामध्ये आधुनिक तंत्र व कौशल्याचा वापर करून,उत्पादन आणि सेवा कार्यामध्ये नफा मिळविण्यासाठी '**संयुक्त भांडवली संस्था**'**(कंपनी)** या व्यवसाय संघटनेचा उदय झाला.

समाजाला मूलभूत स्वरूपाच्या सेवा देण्यासाठी सहकारी तत्वावर कार्य करणाऱ्या '**सहकारी संस्थांचा**' उगम झाला.

आपण या प्रकरणात विविध व्यवसाय संघटन प्रकाराची माहिती व वैशिष्ट्ये आणि त्यांचा तुलनात्मक अभ्यास करणार आहोत.

### ❖ व्यवसाय संघटनांचे विविध प्रकार

- एकल व्यापारी / व्यक्तिगत व्यापारी संस्था
- भागीदारी संस्था
- संयुक्त भांडवली संस्था
- सहकारी संस्था

## २.२ एकल व्यापारी / व्यक्तिगत व्यापारी संस्था (Sole Trading Concern) :

### २.२.१ अर्थ व व्याख्या (Meaning and Definition ) :

- अर्थ (Meaning)

जेंव्हा एखादी व्यक्ती स्वत:चे भांडवल व्यवसायात गुंतविते व व्यवसायाचे दैनंदिन व्यवस्थापन आणि नियंत्रण स्वत: करते, झालेल्या नफ्या–तोट्यास स्वत: जबाबदार असते, तेंव्हा त्यास 'व्यक्तिगत व्यापारी / एकल व्यापारी' असे म्हणतात. व्यवसायातील धोके स्वीकारून नफा मिळविते,कोणत्याही कायदेशीर बाबींची पूर्तता न करता व्यक्ती ताबडतोब व्यवसाय सुरू करू शकते.मात्र व्यवसाय सुरू करण्यासाठी स्थानिक परवान्याची गरज असते.

➢ 


एकल व्यापारी

- व्याख्या (Definition) :

➢ **"जेंव्हा एखादी व्यक्ती व्यवसायात स्वत:चे भांडवल गुंतविते व व्यवसाय स्वत:च्या जबाबदारीवर चालविते, व्यवसायातील नफ्या–तोटयाला स्वत:च जबाबदार राहते तेंव्हा त्यास 'एकल व्यापारी' किंवा 'व्यक्तिगत व्यापारी' असे म्हणतात". – जेम्स लुंडी**

➢ **"व्यापारात एकच व्यक्ती व्यवसायाला भांडवल पुरवठा करून,व्यवसायाचे व्यवस्थापन व नियंत्रण करते, आणि नफा–नुकसानीस स्वत: जबाबदार असते त्यास 'एकल किंवा व्यक्तिगत' व्यापारी असे म्हणतात." – डॉ. जॉन शुबीन**

### २.२.२ व्यक्तिगत व्यापारी संस्थेची वैशिष्ट्ये (Features of Sole Trading Concern) :




१) **सुलभ स्थापना (Easy Formation) :** व्यक्तिगत व्यापारी संस्थेसाठी कोणताही स्वतंत्र कायदा केलेला नाही. त्यामुळे हा व्यवसाय सुरू करण्यासाठी कोणतीही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी लागत नाही.देशातील सर्वसाधारण कायद्याचे पालन करून स्थानिक पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्थेचा परवाना प्राप्त करून व्यक्ती या व्यवसायाची सुरुवात आपल्या मर्जीनुसार करू शकते.

२) **व्यवसायाची मालकी (Ownership of Business) :** व्यक्तिगत व्यापारामध्ये एकच व्यक्ती व्यवसायाची मालक असते. व्यवसायाचा स्वामी या नात्याने व्यवसायातील सर्व मालमत्ता व साधनांचा तो एकटाच मालक असतो.

३) **स्वत:चे भांडवल (Own Capital) :** व्यवसायासाठी लागणारे भांडवल हे व्यक्तिगत व्यापाऱ्याला एकट्यालाच उभारावे लागते. नातेवाईक, मित्र यांच्याकडून मदत किंवा बँकेकडून कर्ज काढून व्यवसायासाठी स्वत:च भांडवल उभे करतो.

४) **व्यवस्थापन (Management) :** व्यक्तिगत व्यापारामध्ये एकच व्यक्ती व्यवसायाची मालक असल्यामुळे व्यवसायाचे दैनंदिन व्यवस्थापन व नियंत्रण त्यालाच करावे लागते. व्यवसायातील सर्व निर्णय तिच व्यक्ती घेते. एकल व्यापारी हा व्यवसायाचा एकटाच मालक व व्यवस्थापक असल्याने व्यक्तिगत व्यापार हा एकपात्री प्रयोगासारखाच असतो.

५) **अमर्यादित जबाबदारी (Unlimited Liability) :** व्यक्तिगत व्यापाऱ्याची व्यवसायातील जबाबदारी अमर्यादित असते. व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणावर तोटा झाला तर तो भरून काढण्यासाठी, देणी देण्यासाठी त्याची खाजगी मालमत्ता विकून देणी द्यावी लागतात.

६) **व्यवसायातील गुप्तता (Business Secrecy) :** व्यवसायामध्ये गुप्ततेला अतिशय महत्त्व असते. व्यक्तिगत व्यवसायातील सर्व महत्त्वाच्या गुप्त गोष्टींची माहिती फक्त एकाच व्यक्तिला असते. व्यावसायिक निर्णय, तंत्र, खरेदी-विक्री, नफा-तोटा इत्यादी बाबतीत कमाल गोपनियता ठेवता येते.

७) **नफा-तोट्यात भागीदार नसतो (No Sharing of Porfit-Loss) :** एकल व्यवसायामध्ये एकटाच मालक असल्याने सर्व नफा व्यक्तिगत व्यापाऱ्याला मिळतो. व्यवसायातील तोटाही त्यालाच सहन करावा लागतो. व्यवसायाच्या नफ्यात किंवा तोटयात इतर व्यक्ती भागीदार नसतात.

८) **ग्राहकांशी सलोख्याचे संबंध (Cordial Relations with Customers) :** व्यक्तिगत व्यापारामध्ये दैनंदिन जीवनात अनेक ग्राहकांशी त्याचे दररोज प्रत्यक्ष संबंध येतात . ग्राहकांच्या आवडी-निवडी, सवयी, चालीरिती आर्थिक परिस्थितीची त्याला माहिती असते . ग्राहकांशी सलोख्याचे व व्यक्तिगत संबंध निर्माण करून त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करतो.

९) **त्वरीत निर्णय (Promt Decision) :** व्यक्तिगत व्यापारी व्यवसायात एकच व्यक्ती मालक असल्यामुळे बाजारातील बदलत्या परिस्थितीनुसार, ग्राहकांच्या मागणीनुसार व आवडी निवडीनुसार वस्तूंच्या किंमतीवर ग्राहकांना दिली जाणारी सूट, हंगामानुसार (सणवार) उधारीची सवलत इत्यादी बाबत तो ताबडतोब निर्णय घेतो .

१०) **स्वयंरोजगाराचा मार्ग (Self Employment Source) :** विद्यमान काळात बेरोजगारी वाढत आहे . स्वयंरोजगाराचा मार्ग म्हणून व्यक्तिगत व्यापारी व्यवसाय लोकप्रिय होत आहे. काही व्यवसाय असे असतात की, ज्यामध्ये व्यक्तिगत कलागुणांना आणि कौशल्यास महत्त्व असते. असे व्यवसाय व्यक्तिगत व्यापारी स्वत: लक्ष घालून सुरू करतो व सेवा देतो.



कृती-

**१) 'एकल व्यापारी संस्था प्रकार हा एकपात्री प्रयोगासारखा असतो' चर्चा करा.**

## २.३ भागीदारी संस्था (Partnership Firm ) :



**भागीदारी संस्था**

### २.३.१ अर्थ व व्याख्या (Meaning and Definition )

- **अर्थ (Meaning)**

व्यक्तिगत व्यापारी व्यवसायातील सर्व व्यावसायिक कार्ये एकच व्यक्ती स्वत: हाताळू शकत नाही, कारण त्याच्याकडे भांडवल आणि व्यवस्थापकीय कौशल्ये ही मर्यादित असतात. व्यक्तिगत व्यापारातील दोष दूर करून व्यक्तिगत व्यापार विकसित करण्यासाठी व्यवसाय संघटनेचे नवीन स्वरूप उदयास आले. व्यवसायाचे विस्तारीकरण करण्यासाठी अधिक प्रमाणात भांडवल व व्यवस्थापकीय कौशल्य गरजेचे असते. म्हणूनच दोन किंवा दोनापेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येऊन भागीदारी संस्थेची स्थापना करतात.

- **व्याख्या (Definition)**

➢ **"सर्वांनी किंवा सर्वांतर्फे एकाने चालविलेल्या व्यवसायातील नफ्याची वाटणी आपापसात करण्याचे ज्या व्यक्तिंनी मान्य केले आहे त्या व्यक्तिंच्या परस्परांतील संबंधाला 'भागीदारी' असे म्हणतात".– भारतीय भागीदारी कायदा १९३२.**

➢ **"दोन किंवा दोनापेक्षा अधिक व्यक्ती तोंडी किंवा लेखी करार करून व्यवसाय चालविण्याची सामूहिक जबाबदारी भागीदारी संस्था स्थापन करून घेतात". – डॉ. जे. ए. सुबिन**

### ३.३.२ भागीदारी संस्थेची वैशिष्ट्ये (Features of Partnership Firm)

**• भागीदारी संस्थेची वैशिष्ट्ये**

१. करार
२. कायदेशीर नोंदणी
३. भागीदारांची संख्या
४. कायदेशीर व्यवसाय
५. व्यवस्थापन
६. भागीदारांमधील परस्पर संबंध
७. अमर्यादित जबाबदारी
८. संयुक्त मालकी
९. नफा–तोटा विभागणी
१०. विसर्जन

१) **करार (Agreement) :** भागीदारीची निर्मिती ही भागीदारीच्या करारातून होते. 'भागीदारीचा करार' हा भागीदारी व्यवसाय संघटनेचा पाया असतो. भागीदारीच्या अंतर्गत व्यवस्थापनासाठी एकमेकांमध्ये करार करणे आवश्यक

असते. या करारात भागीदारांमधील व्यवसायाच्या अटी व नियमांचा उल्लेख असतो. हा करार लेखी किंवा तोंडी असू शकतो. भविष्यकालीन मतभेद/विवाद टाळण्यासाठी भागीदारीचा करार लेखी स्वरूपात असणे गरजेचे असते. लिखित करारामुळे प्रत्येक भागीदाराचे हक्क, कर्तव्य व जबाबदाऱ्या अधिक स्पष्ट होतात.

२) **कायदेशीर नोंदणी (Legal Registration) :** भागीदारी संस्थेची नोंदणी ही सक्तीची नाही. परंतू महाराष्ट्र राज्यामध्ये ती सक्तीची करण्यात आलेली आहे. संबंधित राज्यातील भागीदारी नोंदणी कार्यालयात भागीदारीचा करार नोंदविला जाऊ शकतो, भागीदारी संस्थेची नोंदणी भारतीय भागीदारी कायदा १९३२ नुसार करणे फायदेशीर असते.

३) **भागीदारांची संख्या (Number of Partners) :** भागीदारी संस्थेच्या स्थापनेसाठी किमान २ व्यक्तिंची व कमाल ५० व्यक्तिंची मर्यादा असते.

४) **कायदेशीर व्यवसाय (Lawful Business) :** भागीदारी संस्थेला कायदेशीर व्यवसाय करावा लागतो. त्याला कायदयाच्या चौकटीतच राहून व्यवसाय करावा लागतो. भागीदारी संस्थेला बेकायदेशीर व्यवसाय करता येत नाही.

५) **व्यवस्थापन (Management) :** भागीदारी करारामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे सर्व भागीदार संस्थेच्या व्यवस्थापन कार्यात सहभागी होतात, पण भागीदारी सुरळीत चालावी म्हणून काही भागीदार स्वेच्छेने आपले व्यवस्थापकीय हक्क इतर भागीदाराला देतात. परंतु व्यवस्थापनाची जबाबदारी ही सर्वांवर असते.

६) **भागीदारांमधील परस्पर संबंध (Relationship between the Partners) :** प्रत्येक भागीदार हा भागीदारी संस्थेचा अभिकर्ता त्याच बरोबर प्रधान या नात्याने कार्य करीत असतो. सर्वजण भागीदारी संस्थेचे मालक व अभिकर्ते असतात.

७) **अमर्यादित जबाबदारी (Unlimited Liabilities) :** अल्पवयीन भागीदार सोडून भागीदारी संस्थेमध्ये सर्व भागीदारांची जबाबदारी वैयक्तिक, सामूहिक व अमर्यादित असते .जेंव्हा व्यवसायातील देणी देण्यासाठी व्यवसायाची मालमत्ता अपुरी पडते तेंव्हा बाह्य देयतांची परतफेड करण्यासाठी भागीदारांच्या खाजगी संपत्तीचा उपयोग केला जातो.

८) **संयुक्त मालकी (Joint Ownership) :** भागीदारीमध्ये सर्व भागीदार व्यवसायातील मालमत्तेचे संयुक्त मालक असतात. भागीदारी संस्थेची सर्व मालमत्ता भागीदारी संस्थेत व्यवसायासाठी वापरली जाते. भागीदाराला संस्थेची मालमत्ता खाजगी उपयोगासाठी वापरता येत नाही.

९) **नफा-तोटा विभागणी (Sharing of Profit and Loss) :** भागीदारी करारामध्ये नफा किंवा तोटा कोणत्या प्रमाणात वाटला जाईल हे नमूद केलेले असते. व्यवसाय करून नफा वाटणी करणे हा भागीदारीचा मुख्य हेतू असतो. जर भागीदारी करारामध्ये नफा-तोटा वाटपाचे प्रमाण दिलेले नसेल तर सर्व भागीदार नफा-तोटा समान प्रमाणात वाटून घेतात.

१०) **विसर्जन (Dissolution) :** विसर्जन म्हणजे भागीदारी व्यवसाय बंद करणे होय. एखादया भागीदाराचा मृत्यू, निवृत्ती, दिवाळखोरी, वेड यामुळे भागीदारी संस्था विसर्जित होऊ शकते. ऐच्छिक भागीदारी संस्थेचे विसर्जन कोणत्याही भागीदाराने इतर भागीदारांना किमान १४ दिवसांची पूर्व सूचना देऊन केले जाते. भागीदारी संस्थेचे विसर्जन करणे सोपे असते .



**कृती –**

**२) 'भागीदारीचा करार हा भागीदारीचा पाया असतो' चर्चा करा.**

## २.४ संयुक्त भांडवली संस्था (कंपनी) (Joint Stock Company) :



संयुक्त भांडवली संस्था

इंग्लंड मधील इ.स.१७६० च्या औद्योगिक क्रांती नंतर यंत्राच्या साहाय्याने मोठया प्रमाणावर मागणीपूर्व उत्पादन होऊ लागले. देशी व विदेशी बाजारपेठांचा विस्तार झाला.

व्यवसायासाठी मोठया प्रमाणावरील भांडवल, व्यवस्थापन कौशल्ये,व्यावसायिक धोका सहन करण्याची क्षमता व्यक्तिगत व भागीदारी व्यवसाय संघटनेत नव्हती. मागणीपूर्व उत्पादन झालेल्या मालाला ग्राहक मिळविण्यासाठी वाहतूक व दळणवळणाच्या क्षेत्रातही क्रांती घडून आल्याने बाजारपेठांचा विस्तार झाला. देशाच्या आर्थिक व्यवस्थेत व्यापार व उत्पादन कार्यक्षमपणे करण्यासाठी संयुक्त भांडवली संस्थेचा उदय झाला.

### २.४.१ अर्थ व व्याख्या (Meaning and Definition ):

- **अर्थ (Meaning) :**

कंपनी कायदा २०१३ प्रमाणे स्थापन झालेली संस्था म्हणजे संयुक्त भांडवली संस्था होय. कंपनीच्या कमाल सभासद संख्येवर मर्यादा नाही. भांडवलाचे विभाजन भागांमध्ये करून संयुक्त भांडवली संस्था प्रचंड प्रमाणावर भांडवल उभारणी करून व्यवसाय करतात. कंपनीची स्थापना प्रवर्तकाव्दारे केली जाते व ती खर्चिक असते.


समान हेतू असलेल्या व्यक्तिंची स्वतंत्र अस्तित्व असलेली संघटना म्हणजे 'संयुक्त भांडवली संस्था' (कंपनी ) होय.

- **व्याख्या (Definition) :**

➢ **"कंपनी कायदा २०१३ नुसार स्थापन झालेली व नोंदणी केलेली किंवा अस्तित्वात असलेली कंपनी म्हणजे 'संयुक्त भांडवली संस्था' होय." – कंपनी कायदा २०१३.**

➢ **"स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व, स्वत:ची मुद्रा (बोधचिन्ह) आणि दीर्घ अस्तित्व असणारी कायदयाने निर्माण केलेली कृत्रिम व्यक्ती म्हणजे 'कंपनी' होय".**

## २.४.२ संयुक्त भांडवली संस्थेची वैशिष्ट्ये (Features of Joint Stock Company) :




१) **ऐच्छिक संघटन (Voluntary Association) :** संयुक्त भांडवली संस्था ही अनेक व्यक्तिंनी स्वेच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेली संघटना असते . कोणत्याही जात, धर्म, पंथ, वंशाची व्यक्ती कंपनीचे भाग खरेदी करून भागधारक होऊ शकते.

२) **सभासद संख्या (Number of Members) :** कंपनी कायदा २०१३ प्रमाणे खाजगी कंपनी मध्ये किमान सभासद संख्या २ आणि कमाल २०० असते.सार्वजनिक कंपनीमध्ये कायद्याप्रमाणे सभासद संख्या किमान ७ आणि कमाल अमर्यादित असते.

३) **कृत्रिम व्यक्ती (Artificial Person) :** कंपनी ही कायद्याने निर्माण केलेली कृत्रिम व्यक्ती असते.तिला व्यक्तिप्रमाणे शरीर, मन, आत्मा नसतो, तरी पण ती करार व मालमत्ता धारण करू शकते, व्यवहार करू शकते म्हणून तिला कृत्रिम व्यक्ती म्हणतात.

४) **स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व (Seperate Legal Status) :** कंपनी कायदा २०१३ नुसार कंपनीची स्थापना झालेली असते,म्हणून तिला स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व प्राप्त होते. कंपनी स्वत:च्या नांवाने खरेदी-विक्री करार, कायदेशीर कारवाई करू शकते.इतरांची देणी देण्यासाठी कंपनी स्वत: जबाबदार असते.

५) **दीर्घकाळ अस्तित्व (Continuity of Life) :** कंपनीला कायदेशीर अस्तित्व असल्यामुळे तिला दीर्घकाळ टिकणारे अस्तित्व असते. सभासदात बदल, दिवाळखोरी, भागधारकाचा मृत्यू, निवृत्ती याचा परिणाम कंपनीच्या अस्तित्वावर होत नाही. आपल्या सभासदांपासून स्वतंत्र कायदेशीर दीर्घकाळ टिकणारे अस्तित्व तिला असते.

६) **सक्तीची नोंदणी (Compulsory Registration) –** कंपनी कायदा २०१३ मधील तरतुदीप्रमाणे कंपनीची नोंदणी करणे सक्तीचे असते. कायद्याच्या तरतुदीनुसार कंपनीची नोंदणी केल्यामुळे तिला कायद्याचे पाठबळ मिळते.

७) **मर्यादित जबाबदारी (Limited Liability) :** कंपनीच्या भागधारकांची जबाबदारी त्यांनी खरेदी केलेल्या भागांच्या दर्शनी किंमती इतकीच मर्यादित असते. कंपनीची कोणतीही देणी देण्यासाठी भागधारकांची खाजगी मालमत्ता धोक्यात येत नाही.

८) **बोधचिन्ह (Common Seal) :** कंपनीला स्वत:ची मुद्रा (बोधचिन्ह) असते. कंपनी कृत्रिम व्यक्ती असल्यामुळे बोधचिन्हाचा वापर ती सहीसारखी करते. सर्व महत्त्वाच्या कागदपत्रावर आणि मालकी हक्काच्या दस्तऐवजावर हे बोधचिन्ह छापलेले असते.

९) **तज्ज्ञ व्यवस्थापन (Professional Management) :** भागधारकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी म्हणजे संचालक मंडळ होय.कंपनीच्या व्यवस्थापनात मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी पगारी तज्ज्ञ अधिकारी वर्ग नेमला जातो. त्यामुळे कंपनीचे व्यवस्थापन कार्यक्षम होण्यास मदत होते.

१०) **भाग हस्तांतरण करण्याची सोय (Transfer of Shares) :** भागधारकांना कंपनीच्या नियमावलीतील तरतुदीप्रमाणे आपले भाग दुसऱ्या व्यक्तिला मुक्तपणे हस्तांतरण करता येतात. भागधारक भाग बाजारात आपल्या भागांची विक्री करून त्याची रोख रक्कम प्राप्त करू शकतो.



**कृती–**

**३) संयुक्त भांडवली संस्था मोठ्या प्रमाणावर भांडवल उभारणी करते चर्चा करा.**

**४) तुमच्या परिसरातील विविध व्यावसायिक संघटना प्रकारातील व्यवसाय संस्थांची यादी तयार करा.**

## २.५ सहकारी संस्थांचा विविध व्यावसायिक संघटनांशी तुलनात्मक अभ्यास:
## (Comparative Study of Various Types of Business Organizations with Co-operative society) :

| अ. क्र. (Sr. No.) | मुद्दे (Point) | व्यक्तिगत व्यापारी संस्था (Sole Trading concern) | भागीदारी संस्था (Partnership Firm) | संयुक्त भांडवली संस्था (Joint Stock Company) | सहकारी संस्था (Co-operative Society) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्थ | एकाच व्यक्तिकडे व्यवसायाची मालकी, व्यवस्थापन व नियंत्रण असते, त्यास व्यक्तिगत व्यापारी संस्था असे म्हणतात. | दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्र येऊन नफा प्राप्तीच्या हेतूने कोणताही कायदेशीर व्यवसाय सामूहिकरीत्या करतात त्याला भागीदारी संस्था असे म्हणतात. | ज्या संस्थेला दीर्घ काळ टिकणारे अस्तित्व असून प्रतिक म्हणून तिचे एक बोधचिन्ह असते आणि सरकारी दप्तरी कायद्यानुसार नोंदणी झालेली असते तिला संयुक्त भांडवली संस्था असे म्हणतात. | स्वत:च्या आर्थिक प्रगतीसाठी स्वेच्छेने आणि समानतेच्या तत्वावर आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तिंनी स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय. |
| २ | उद्देश | व्यक्तिगत व्यापारी संस्थेचा मुख्य उद्देश नफा मिळविणे हा असतो. | भागीदारी संस्थेचा मुख्य उद्देश नफा मिळविणे हा असतो. | संयुक्त भांडवली संस्थेचा मुख्य उद्देश नफा मिळविणे हा असतो. | सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश नफा मिळविणे हा नसून आपल्या सभासदांना सेवा प्रदान करणे हा असतो. |
| ३ | सभासद संख्या | व्यक्तिगत व्यापारामध्ये किमान आणि कमाल एकच व्यक्ती सभासद असते. | भागीदारी संस्थेत किमान दोन आणि कमाल पन्नास भागीदार असतात. | खाजगी कंपनीत किमान दोन आणि कमाल दोनशे तर सार्वजनिक कंपनीत किमान सात व कमाल अमर्यादित भागधारक असतात. | सहकारी संस्थेच्या स्थापनेसाठी किमान दहा व कमाल अमर्यादित सभासद असतात. |
| ४ | नोंदणी कायदा | व्यक्तिगत व्यापारासाठी कोणताही स्वतंत्र कायदा नाही. | भारतीय भागीदारी कायदा १९३२ नुसार भागीदारी संस्थेची नोंदणी केली जाते. | कंपनी कायदा २०१३ नुसार संयुक्त भांडवली संस्थेची नोंदणी केली जाते. | महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा १९६० नुसार सहकारी संस्थेची नोंदणी केली जाते. |
| ५ | जबाबदारी | व्यक्तिगत व्यापारी संस्थेत व्यापाऱ्याची जबाबदारी अमर्यादित असते. | भागीदारी संस्थेमध्ये भागीदारांची जबाबदारी वैयक्तिक, सामूहिक व अमर्यादित असते. | संयुक्त भांडवली संस्थेमध्ये भागधारकांची जबाबदारी मर्यादित असते. | सहकारी संस्थेमध्ये सभासदांची जबाबदारी मर्यादित असते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | **व्यवस्थापन** | एकच व्यक्ती व्यवसायाचे दैनंदिन व्यवस्थापन करते. | सर्व भागीदारांना दैनंदिन व्यवस्थापनात समान अधिकार असतात. सर्व भागीदार सामूहिक व्यवस्थापन करतात. | संयुक्त भांडवली संस्थेचे व्यवस्थापन संचालक मंडळ पाहते. | सहकारी संस्थेचे दैनंदिन व्यवस्थापन कार्यकारी समिती पाहते. |
| ७ | **भांडवल** | एकच व्यक्ती व्यवसायाला भांडवल पुरवठा करते. त्यामुळे अतिशय कमी भांडवल जमा होते. | भागीदारी संस्थेत अनेक भागीदार असल्याने भांडवलात वाढ होते. | भागधारक संख्या मोठी असल्यामुळे मोठया प्रमाणात भांडवल जमा होते. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील सभासद असल्याने भांडवलात फारशी वाढ होत नाही. |
| ८ | **स्थापना** | ज्यावेळी व्यक्तिच्या मनात येईल त्यावेळी या व्यवसायाची स्थापना करता येते. | भागीदार एकमेंकामध्ये लेखी किवां तोंडी करार करून भागीदारी संस्थेची स्थापना करतात. | संयुक्त भांडवली संस्थेची स्थापना प्रवर्तकाद्वारे केली जाते. या संस्थेची स्थापना खर्चीक व गुंतागुंतीची असते. | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांनी सामूहिक हितासाठी सहकारी संस्थेची स्थापना केलेली असते. या संस्थेची स्थापना सहज व सुलभ असते. |
| ९ | **व्यवसाय गुप्तता** | व्यक्तिगत व्यवसायामध्ये एकच व्यक्ती मालक असल्यामुळे जास्तीत जास्त व्यवसायात गुप्तता पाळतो. | भागीदारी संस्थेमध्ये एकापेक्षा जास्त व्यक्ति मालक असल्यामुळे व्यावसायिक गुप्तता पाळणे शक्य नसते. | संयुक्त भांडवली संस्थेला व्यवसायाचे वार्षिक जमाखर्च प्रसिद्ध करावे लागतात त्यामुळे गुप्तता पाळता येत नाही. | सहकारी संस्थेला वार्षिक हिशेब पत्रके प्रसिद्ध करावी लागत असल्यामुळे गुप्तता पाळता येत नाही. |
| १० | **नफा–तोटा वाटप** | व्यक्तिगत व्यवसायात मिळणारा नफा किंवा तोटा एकाच व्यक्तिचा असतो. | भागीदारी व्यवसायात मिळणारा नफा–तोटा सर्व भागीदारांना करारात नमूद केल्याप्रमाणे वाटप केला जातो. | संयुक्त भांडवली संस्थेमध्ये संचालक मंडळ वार्षिक सभेत ठराव मंजूर करून लाभांश रुपाने नफा वाटप करते. | सहकारी संस्थेच्या नफ्याचा वापर प्रथम राखीव निधीसाठी व विकासासाठी करून उर्वरीत नफा सभासदांना वाटला जातो. |
| ११ | **विसर्जन** | व्यक्तिगत व्यवसायात मालकाचा मृत्यू, दिवाळखोरी, वेडेपणामुळे व्यक्तिगत व्यवसायाचे विसर्जन होते. | भागीदाराचा मृत्यू, निवृत्ती, करारातील तरतुदीमुळे भागीदारी संस्थेचे विसर्जन होते. | कंपनी कायद्यातील तरतुदीनुसार आणि न्यायालयाच्या अनुमतीने संयुक्त भांडवली संस्थेचे विसर्जन होते. | निबंधकाच्या निर्णयानुसार सहकारी कायद्याप्रमाणे सहकारी संस्थेचे विसर्जन होते. |

## २.६ सारांश

- **मानवी गरजा भागविणारे अनेक व्यवसाय समाजात अस्तित्वात आहेत. नफा प्राप्तीच्या हेतूने केलेल्या कोणत्याही कार्याला 'व्यवसाय' असे म्हणतात.**
- **समाजात चांगली उद्दिष्ट्ये किंवा हेतू साध्य करण्यासाठी एकत्र आलेला मानवी समूह म्हणजे 'संघटन' होय.**

- **व्यवसाय संघटनांचे प्रकार :-**

१) व्यक्तिगत व्यापारी संस्था
२) भागीदारी संस्था
३) संयुक्त भांडवली संस्था
४) सहकारी संस्था

- **व्यक्तिगत व्यापारी संस्था :-**एकाच व्यक्तिच्या भांडवलावर, नियंत्रण व व्यवस्थापन कौशल्यावर जो व्यवसाय चालविला जातो त्यास व्यक्तिगत व्यापारी संस्था असे म्हणतात.

❖ **व्यक्तिगत व्यापारी संस्थेची वैशिष्ट्ये :-**

१) सुलभ स्थापना
२) व्यवसायाची मालकी
३) स्वत:चे भांडवल
४) व्यवस्थापन
५) अमर्यादित जबाबदारी
६) व्यवसायातील गुप्तता
७) नफा-तोट्यात भागीदार नसतो.
८) ग्राहकाशी सलोख्याचे संबंध
९) त्वरीत निर्णय
१०) स्वयंरोजगाराचा मार्ग

- **भागीदारी संस्था:-**सर्वांतर्फे एक किंवा अधिक व्यक्तिंनी चालविलेल्या व्यवसायातील नफ्याचे वाटप करण्यासाठी आपापसातील कराराने दोन किंवा अधिक व्यक्तिंनी एकत्र येऊन निर्माण केलेला संबंध म्हणजे भागीदारी संस्था होय.

❖ **भागीदारी संस्थेची वैशिष्ट्ये:-**

१) करार
२) कायदेशीर नोंदणी
३) भागीदारांची संख्या
४) कायदेशीर व्यवसाय
५) व्यवस्थापन
६) भागीदारांमधील परस्पर संबंध
७) अमर्यादित जबाबदारी
८) संयुक्त मालकी
९) नफा-तोटा विभागणी
१०) विसर्जन

- **संयुक्त भांडवली संस्था :–** ज्या संस्थेला दीर्घकाळ टिकणारे अस्तित्व असून प्रतिक म्हणून ज्या संस्थेचे एक बोधचिन्ह असते व जिची निर्मिती कंपनी कायदा २०१३ च्या कायद्यानुसार होऊन सरकारी दप्तरी नोंदणी झालेली असते अशी संस्था म्हणजे संयुक्त भांडवली संस्था होय.

❖ **संयुक्त भांडवली संस्थेची वैशिष्ट्ये :–**

१) ऐच्छिक संघटन
२) सभासद संख्या
३) कृत्रिम व्यक्ती
४) स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व
५) दीर्घकाळ अस्तित्व
६) सक्तीची नोंदणी
७) मर्यादित जबाबदारी
८) बोधचिन्ह
९) तज्ज्ञ व्यवस्थापन
१०) भाग हस्तांतर करण्याची सोय

## २.७ महत्त्वाच्या संज्ञा

१) **व्यवसाय :–** वस्तू व सेवांचे उत्पादन व वितरण करण्याच्या आर्थिक क्रियेला व्यवसाय असे म्हणतात.

२) **व्यवसाय संघटन :–** एखाद्या व्यवसायाची रचना किंवा बांधणी की,जी कार्यक्षमपणे नफा मिळविण्यासाठी व्यापारी क्रिया किंवा उपक्रम करून वस्तूंचे उत्पादन आणि पुरवठ्यांच्या माध्यमातून फायदा मिळविण्याचा प्रयत्न करील.

३) **भागीदारीचा करार :–** भागीदारी व्यवसाय चालविण्यासाठी अंतर्गत व्यवस्थापनाचे नियम व अटी.

४) **मर्यादित जबाबदारी :–** सभासदांची जबाबदारी त्याने खरेदी केलेल्या भागांच्या दर्शनी मूल्याइतकी मर्यादित असते. मर्यादित जबाबदारीमध्ये सभासदांची खाजगी मालमत्ता धोक्यात येत नाही.

५) **अमर्यादित जबाबदारी :–** संस्थेच्या कर्जाची व इतर देणी देण्याची जबाबदारी वैयक्तिकरित्या मालकाची असते. या प्रकारच्या जबाबदारीत सभासदांची खाजगी मालमत्ता धोक्यात येऊ शकते, प्रसंगी खाजगी मालमत्ता विकून देणी द्यावी लागतात.

## २.८ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

१) व्यक्तिगत व्यापारात एकच व्यक्ती व्यवसायाची ----- असते.
अ) सावकार  ब) मालक  क) दलाल

२) व्यक्तिगत व्यापारी संस्थेत ----- व्यावसायिक गुप्तता पाळली जाते.

अ) कमीत कमी ब) जास्तीत जास्त क) कमी-जास्त

३) व्यक्तिगत व्यापाऱ्याची जबाबदारी ----- असते.

अ) मर्यादित ब) सामूहिक क) अमर्यादित

४) भागीदारी व्यवसायात कमाल ----- भागीदार असतात.

अ) वीस ब) दहा क) पन्नास

५) महाराष्ट्र राज्यामध्ये भागीदारी संस्थेची नोंदणी ----- आहे.

अ) ऐच्छिक ब) सक्तीची क) अनावश्यक

६). भारतीय भागीदारी संस्था कायदा ----- साली संमत झाला.

अ) १९३२ ब) २०१३ क) १९६०

७) भागधारकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीला ----- म्हणतात.

अ) संचालक ब) सभासद क) मालक

८) कंपनी कायदा ----- साली संमत झाला.

अ) १९३२ ब) २०१३ क) १९६०

९) संयुक्त भांडवली संस्थेची नोंदणी ----- असते.

अ) सक्तीची ब) ऐच्छिक क)अनावश्यक

१०) सहकारी संस्थेच्या स्थापनेसाठी किमान ----- सभासदांची आवश्यकता असते.

अ) दोन ब) दहा क) सात

## ब) योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| अ) व्यक्तिगत व्यापारी संस्था | १) १९६० |
| ब) भागीदारी संस्थेची किमान सभासद संख्या | २) कमीत कमी व्यावसायिक गुप्तता |
| क) संयुक्त भांडवली संस्था कायदा | ३) १९५१ |
| ड) महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा | ४) इंग्लंड |
| इ) औद्योगिक क्रांती | ५) १९२५ |
| | ६) २०१३ |
| | ७) भारत |
| | ८) दोन |
| | ९) जास्तीत जास्त व्यावसायिक गुप्तता |
| | १०) दहा |

### क) खालील विधानांसाठी एकशब्द/शब्दसमूह लिहा.

१) एकपात्री प्रयोगासारखा व्यवसाय संघटन प्रकार.

२) सन २०१३ च्या कायद्याने निर्माण केलेली कृत्रिम व्यक्ती.

३) स्वयंरोजगारांसाठी लोकप्रिय व्यवसाय संघटन प्रकार.

४) आपल्या सभासदांना सेवा प्रदान करण्यासाठी स्थापन केलेला व्यवसाय संघटन प्रकार.

५) भागीदारांनी अंतर्गत व्यवस्थापनासाठी परस्परांमध्ये केलेल्या अटी व नियम.

### ड) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.

१) व्यक्तिगत व्यापारी संस्थेची नोंदणी आवश्यक असते.

२) व्यक्तिगत व्यापारी संस्थेत त्वरीत निर्णय घेतले जातात.

३) भागीदारी संस्थेचा करार लेखी किंवा तोंडी असू शकतो.

४) सहकारी संस्थेचा मुख्य हेतू जास्तीत जास्त नफा मिळविणे हा असतो.

५) कंपनीची भांडवल उभारणी क्षमता प्रचंड नसते.

६). औदयोगिक क्रांती नंतर कंपनी संघटन प्रकार उदयास आला.

७) संयुक्त भांडवली संस्थेला अल्पकाळ टिकणारे अस्तित्व असते.

### इ) खालील विधाने पूर्ण करा.

१) व्यक्तिगत व्यापाऱ्याची जबाबदारी ............. असते.

२) भागधारकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीला .......... म्हणतात.

३) सहकारी संस्थेच्या स्थापनेसाठी किमान ........ सभासदांची आवश्यकता असते.

४) भागीदारी संस्था कायदा ........... साली संमत झाला.

५) संयुक्त भांडवली संस्थेची नोंदणी ......... असते.

### (फ) अचूक पर्याय निवडा.

| | |
|---|---|
| १) व्यक्तिगत व्यापारी संस्था | |
| २) | कायदा १९३२ |
| ३) औद्योगिक क्रांती | |
| ४) | बोधचिन्ह |
| ५) किमान सभासद दहा | |

सहकारी संस्था, कंपनी, एकच व्यक्ती, भागीदारी संस्था, इंग्लंड

### ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) एकल व्यापारी म्हणजे काय?

२) संयुक्त भांडवली संस्थेची नोंदणी कोणत्या कायद्याप्रमाणे केली जाते?

३) भागीदारी संस्थेमध्ये कोणत्या भागीदाराची जबाबदारी मर्यादित असते?

४) भागीदारीचा करार म्हणजे काय?

५) स्वयंरोजगारासाठी कोणता व्यावसायिक संघटन प्रकार लोकप्रिय आहे?

६) मर्यादित जबाबदारी म्हणजे काय?

### ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरूस्त करून वाक्य पुन्हा लिहा.

१) व्यक्तिगत व्यापारी संस्थेमध्ये किमान व्यावसायिक गुप्तता राखली जाते.

२) भागीदारी संस्थेची नोंदणी भारतीय भागीदारी कायदा १९५६ नुसार केली जाते.

३) कंपनी कायदा २०१३ प्रमाणे कंपनीमध्ये कमाल सभासद संख्या मर्यादित असते.

४) सहकारी संस्थेची नोंदणी १९३२ च्या कायद्यानुसार केली जाते.

### ई) गटात न बसणारा शब्द शोधा.

१) अ) व्यक्तिगत व्यापारी संस्था ब) भागीदारी संस्था
क) सहकारी संस्था ड) संयुक्त भांडवली संस्था

२) अ) १९३२ चा कायदा ब) १९६० चा कायदा
क) २०१३ चा कायदा ड) १९५० चा कायदा

### ज) योग्य क्रम लावा.

१) अ) कंपनी कायदा ब) महाराष्ट्र सहकार कायदा
क) भागीदारी संस्था कायदा

### प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.

१) व्यवसाय.

२) व्यक्तिगत व्यापारी.

३) भागीदारी संस्था.

४) भागीदारीचा करार.

५) संयुक्त भांडवली संस्था.

### प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.

१) व्यवसाय संघटन प्रकारातील कोणता व्यवसाय संघटन प्रकार आपण व्यवसायासाठी निवडाल.

२) "भागीदारीचा करार हा भागीदारी संस्थेचा पाया असतो".

३) "स्वयंरोजगारासाठी व्यक्तिगत व्यवसाय संघटन प्रकार सर्वात उत्तम आहे".

### प्र.४ फरक स्पष्ट करा.

१) व्यक्तिगत व्यापारी संस्था आणि सहकारी संस्था.

२) भागीदारी संस्था आणि सहकारी संस्था.

३) संयुक्त भांडवली संस्था आणि सहकारी संस्था.

### प्र.५ टीपा लिहा.

१) व्यवसाय संघटनांचे प्रकार.

२) व्यक्तिगत व्यापारी संस्थेची वैशिष्ट्ये.

३) भागीदारी संस्थेची वैशिष्ट्ये.

४) संयुक्त भांडवली संस्थेची वैशिष्ट्ये.

### प्र.६ कारणे द्या.

१) व्यक्तिगत व्यापारी संस्थेत त्वरीत निर्णय घेतले जातात.

२) संयुक्त भांडवली संस्थेची भांडवल उभारणी क्षमता प्रचंड असते.

३) भागीदारीचा करार लेखी असला पाहिजे.

४) संयुक्त भांडवली संस्थेमध्ये भागांचे हस्तांतरण मुक्तपणे करता येते.

५) व्यक्तिगत व्यापारी संस्था संघटन प्रकार स्वयंरोजगारासाठी लोकप्रिय असतो.

### प्र.७ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१) व्यक्तिगत व्यापारी संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) भागीदारी संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३) संयुक्त भांडवली संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४) व्यवसाय संघटनेचे प्रकार स्पष्ट करा.

### प्र.८ दीर्घोत्तरी प्रश्न

१) व्यक्तिगत व्यापारी संस्थेची व्याख्या सांगून, व्यक्तिगत व्यापारी संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) भागीदारी संस्थेची व्याख्या सांगून,भागीदारी संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३) संयुक्त भांडवली संस्थेची व्याख्या सांगून,संयुक्त भांडवली संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

◆◆◆

# ३. सहकाराची तत्वे

## (Principles of Co-Operation)


| | | | |
|---|---|---|---|
| ३.१ | प्रस्तावना | ३.३.२ | सहकाराची सर्वसामान्य तत्वे |
| ३.२ | अर्थ व व्याख्या | ३.४ | सारांश |
| ३.३ | सहकाराची तत्वे | ३.५ | महत्त्वाच्या संज्ञा |
| ३.३.१ | सहकाराची पुनर्निर्धारित मूलतत्वे | ३.६ | स्वाध्याय |


### ३.१ प्रस्तावना (Introduction) :

माणसाचे जीवन सुरळीत, नियोजनबद्ध व यशस्वी होण्यासाठी समाजप्रिय जीवन जगण्यासाठी व व्यवहारासाठी काही नियम असावे लागतात. तेंव्हाच माणसाचे जीवन सुखकर होते. अशा नियमांचा अर्थ जीवन जगण्यासंबंधीची तत्वे असा घेता येईल.

सहकार या संकल्पनेचा विचार करत असताना सहकार म्हणजे एकमेकांना मदत करणे, एकत्र येऊन काम करणे होय. समाजाचे कल्याण साध्य करणे, समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा विकास करण्यासाठी सहकार ही संकल्पना उदयास आली. सहकारामध्ये समाजाच्या सेवेला अनन्यसाधारण महत्व असल्याने समाज विकासासाठी सहकारी चळवळीचे योग्य दिशेने मार्गक्रमण होणे आवश्यक आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या व्यक्ती एकत्र येऊन स्वत:चा विकास साध्य करण्यासाठी सहकारी संस्था स्थापन करतात. या संस्था व्यवस्थित व सुरळीत चालविण्यासाठी काही मार्गदर्शक नियमांची आवश्यकता असते आणि याच अटींचे व मार्गदर्शक नियमांचे रूपांतर पुढे सहकारी तत्वामध्ये झालेले आहे. सहकाराच्या तत्वामुळे सहकारी संस्थांनी ठरविलेली उद्दिष्ट्ये, ध्येये साध्य करता येतील. सहकारी चळवळीची प्रगती साधण्यासाठी आणि विकासासाठी सहकारी तत्वांची गरज असते.

तत्व याचा अर्थ वागण्यासंबधीचे नियम असा करता येईल. सहकारी संस्थांची वाढ, विकास तसेच तिचा उद्देश साध्य करण्यासाठी ठरविलेले किंवा मान्य केलेले नियम म्हणजे सहकाराची तत्वे होय.

दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक देशांना स्वातंत्र्य मिळाले. जलद आर्थिक विकासासाठी नियोजनाची कास धरली गेली. एकूणच आर्थिक, राजकीय व सामाजिक परिस्थितीत बदल झाले. त्यासाठी ऑक्टोबर १९६४ मध्ये ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. डी. जी. कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने तज्ज्ञ समितीची नियुक्ती केली. या समितीने सादर केलेल्या अहवालात सहकाराच्या तत्वांची पुनर्मांडणी केली. इ.स. १९६६ मध्ये व्हिएन्ना येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेमध्ये सहकारी तत्वांना जगमान्यता मिळालेली आहे. डॉ. इयान मॅकफरसन अभ्यासगटाच्या शिफारशीवरुन इंग्लंडमधील मँचेस्टर येथे सन १९९५ मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेत सात सहकारी तत्वांना पुनर्निर्धारित मूलतत्वे म्हणून मान्यता देण्यात आली.

### ३.२ सहकारी तत्वांचा अर्थ (Meaning) :

'सहकारी तत्वे म्हणजेच सहकारी संस्थाची उद्दिष्ट्ये, ध्येयधोरणे, कार्यपद्धती, भविष्यकालीन यशस्वी वाटचाल, व्यवस्थापन इत्यादी बाबतच्या मार्गदर्शक नियमांचा संच होय'. सहकारी संस्था उत्तम व यशस्वीरित्या चालविण्यासाठी काही मार्गदर्शक नियम तयार केलेले आहेत. याच मार्गदर्शक नियमांना सहकाराची तत्वे असे म्हटले जाते. ही तत्वे संस्थेने ठरविलेली ध्येये, उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी उपयुक्त व मार्गदर्शक ठरतात. या सहकाराच्या तत्वांशिवाय सहकारी संस्था यशस्वीपणे कामकाज करू शकणार नाहीत. व्यवहारात सहकारी तत्वांचा यशस्वीपणे वापर करण्यावरच सहकारी चळवळीचे यश व भवितव्य अवलंबून असते.

**सहकारी तत्त्वांच्या व्याख्या :**

१) आंतरराष्ट्रीय सहकार संघटना १९६६ नुसार – ''सहकारी चळवळीच्या उद्दिष्ट प्राप्तीसाठी नितांत आवश्यक असणाऱ्या व्यवहार्य नियमांना सहकाराची तत्त्वे असे म्हणतात.''

२) डॉ. डी. जी. कर्वे – ''सहकारी चळवळीच्या उद्देशांची पूर्तता करण्यासाठी करण्यात येणाऱ्या सहकारी कार्याचे संघटन व नियमन करण्यासाठी केलेले नियम म्हणजे सहकारी तत्त्वे होत.''

## ३.३ सहकाराची तत्त्वे : (Principles of Co-operation)


बदलत्या परिस्थितीनुसार सहकार तत्त्वात काहीसा बदल झालेला आहे. तरीही मूलभूत तत्त्वे कायम आहेत.

सहकारी तत्त्वांची विभागणी खालील दोन गटात केलेली आहे.

- **सहकाराची पुनर्निर्धारित मूलतत्त्वे**
- **सर्वसामान्य तत्त्वे**

### ३.३.१ पुनर्निर्धारित मूलतत्त्वे :

सर्वसाधारणपणे जगातील सर्व सहकारी संस्था ह्या इंग्लंडमधील मँचेस्टर येथे १९९५ मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी परिषदेत पुनर्निर्धारित केलेल्या तत्त्वानुसार कार्य करतात.




१) **खुले व ऐच्छिक सभासदत्व :** सहकारी संस्थेचे सभासदत्व सर्वांसाठी खुले व ऐच्छिक असते. सहकारी संस्थेत कोणत्याही पात्र व्यक्तिला सभासद होता येते. कोणत्याही व्यक्तिस सभासदत्वासाठी सक्ती केली जात नाही. सहकारी संस्थेचे सभासदत्व स्वीकारणे किंवा संस्था सोडून जाणे हे पूर्णत: व्यक्तिच्या इच्छेवर अवलंबून असते. संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तिस सभासद होता येते. जात, वंश, धर्म, पंथ, लिंग, भाषा, वर्ण, आर्थिक स्थिती इत्यादी कारणावरून प्रवेश नाकारता येत नाही. जी व्यक्ती सभासदत्वाच्या सर्व अटी व नियमांची पूर्तता करते अशा व्यक्तिला सहकारी संस्थेचे सभासद होता येते.

२) **सभासदांचे लोकशाही नियंत्रण :** सहकारी संस्था या लोकशाही संस्था आहेत. त्यांचे नियंत्रण सभासदांमार्फत होते. सहकारी संस्थेचा सर्व कारभार लोकशाही पद्धतीने चालवावा असे हे तत्त्व सांगते. प्रत्येक सभासदाला 'एक व्यक्ती एक मत' असा मताधिकार असतो. संस्थेचा दैनंदिन कारभार पाहण्यासाठी सभासदांनी निवडून दिलेल्या व्यवस्थापन समितीमार्फत कामकाज चालते. संस्थेतील सर्व निर्णय सामूहिकपणे घेतले जातात. वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व सभासद अंतिम निर्णय घेतात. यातून सभासदांचे लोकशाही नियंत्रण हा हेतू साध्य होण्यास मदत होते.

३) **सभासदांचा आर्थिक सहभाग :** सभासद सहकारी संस्थांच्या भांडवलात सहभाग घेतात आणि लोकशाही पद्धतीने त्याचे नियंत्रण करतात. सहकारी संस्थेने भांडवलाचा मोबदला म्हणून जास्त व्याज देणे योग्य नाही. जास्त व्याज देण्यासाठी जास्त नफा मिळविणे आवश्यक ठरते.म्हणून सहकारी संस्थेने भांडवलावर मर्यादित प्रमाणात व्याज द्यावे. संचालक मंडळ सभासदांच्या वार्षिक सभेत भांडवलावर किती व्याज वा लाभांश द्यावे याची शिफारस करतात. संचालक मंडळाने सुचविलेल्या व्याजाच्या वा लाभांशाच्या दरात सभासद कपात सुचवू शकतात किंवा व्याज देण्याबद्दल ठराव फेटाळू शकतात. सहकारी संस्थांनी भांडवलावर व्याज दिलेच पाहिजे असा याचा अर्थ नसून भांडवलावर व्याज द्यायचे असेल तर ते मर्यादित प्रमाणात द्यावे. मर्यादित व्याज देऊन शिल्लक राहिलेली रक्कम सभासद राखीव निधीत वर्ग करणे, विविध निधी निर्माण करणे, सामाजिक कल्याणासाठी निधीचा वापर करणे असे नियोजन करू शकतात. सहकारी संस्था जास्तीत जास्त १५% पर्यंत लाभांश जाहीर करू शकतात.

४) **स्वायत्तता आणि स्वातंत्र्य :** सहकारी संस्था लोकशाही तत्त्वानुसार चालते. अशा संस्थामध्ये स्वायतत्ता व स्वातंत्र्य या तत्त्वांना स्थान देणे महत्त्वाचे असते. संस्थेच्या प्रवर्तकापासून ते संस्था चालकांपर्यंतचे सर्वजण हे त्या संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहणारे असले पाहिजेत. संस्थेतील कोणतेही व्यवहार करण्यासाठी स्वातंत्र्य असले पाहिजे. नियोजन व धोरणांची अंमलबजावणी करताना सहकारी संस्थेला स्वायत्तता व स्वातंत्र्य हे तत्त्व अत्यंत महत्त्वाचे मानले आहे.


५) **शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती :** सहकाराचे भवितव्य हे सहकाराच्या प्रसारावर व शिक्षणावर अवलंबून आहे. सहकारी संस्था ही प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनी एकत्र येऊन स्थापन केलेली असते. संस्थेतील बहुतांश सभासद हे अल्प शिक्षित असतात. अशा संस्था प्रभावी, यशस्वी, भक्कम व विकसित होण्यासाठी सभासद, सेवक, पदाधिकारी, संचालक व सर्वसामान्य जनतेला सहकाराचे शिक्षण, प्रशिक्षण व माहिती देण्याची गरज आहे.

६) **सहकारांतर्गत सहकाराचे तत्त्व :** हे तत्व सभासदांच्या समान आर्थिक गरजा उत्कृष्टरित्या भागविण्यासाठी सर्वांनी सुसंघटितपणे व समन्वयासहित एकत्रितरित्या काम करण्यासाठी आवाहन करते. स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध प्रकारच्या सहकारी संस्थानी परस्परात स्पर्धा न करता एकमेकांना सहकार्य करून कारभार करावा हे अभिप्रेत आहे. एका संस्थेने दुसऱ्या संस्थेस सहकार्य केल्यास सहकारी क्षेत्राचा विकास अधिक चांगला होईल. या चळवळीच्या विकासासाठी व सभासंदाच्या हितसंबंधाचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने सर्वांनी सहकार्य केले पाहिजे. या तत्त्वाला विकासाचे तत्त्व असेही म्हणतात.

७) **सामाजिक बांधिलकी :** सहकारी संस्था या सामाजिक कल्याणाकरीता स्थापन केल्या जातात. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या व्यक्ती एकत्र येऊन आपल्या आर्थिक दुर्बलतेवर मात करण्यासाठी सहकारी संस्थां स्थापन करतात. त्याचबरोबर समाजाचे कल्याण डोळ्यासमोर ठेवून कार्य करीत असतात. सहकारी संस्थानी अधिकाधिक लोकांच्या इच्छा, आकांक्षा सहकारी संस्थामार्फत साध्य करणे आवश्यक आहे. उदा. सभासदांना चांगले आरोग्य आणि सेवा पुरविणे, सहकारी वित्तीय सेवांचा विस्तार करणे, लाभदायी रोजगार पुरविणे, युवक व महिलांना सबल व सक्षम बनविणे व त्यांचे राहणीमान उंचावणे इत्यादी. सहकारी संस्थांनी आपले कामकाज हे सामाजिक हित व सामाजिक कल्याणाच्या दृष्टीकोनातून केले पाहिजे.

### ३.३.२ सहकाराची सर्वसामान्य तत्वे :

सहकाराची पुनर्निर्धारीत तत्वे पाहिल्यानंतर सर्वसामान्य तत्वांचाही अभ्यास करणे आवश्यक आहे. ती आपणांस पुढीलप्रमाणे सांगता येतील.




१) **परस्पर साहाय्याव्दारे स्वावलंबन :** परस्पर साहाय्याशिवाय स्वावलंबन होत नाही. परस्परांना साहाय्य करून स्वत:चा व संस्थेचा विकास करून घेण्याची शिकवण सहकारात दिली जाते. परस्पर साहाय्य हा संस्थेच्या सभासदांचा एकमेकांतील संबंधाचा गाभा आहे. 'सर्व एकाकरिता व एक सर्वांकरिता' म्हणजेच 'Each for all and all for Each' हे सहकार चळवळीचे मुख्य तत्व आहे. त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम केल्यानंतर स्वत:च्या उन्नतीबरोबर इतरांचेही कल्याण करणे ही सहकाराची कार्यपद्धती आहे.

२) **रोखीचे व्यवहार :** सहकारी संस्थेमध्ये रोख व्यवहाराचे तत्व हे अत्यंत महत्वाचे मानले जाते. प्रत्येक सहकारी संस्थेने आपले सर्व आर्थिक व्यवहार हे रोखीने करावेत असा या तत्त्वाचा अर्थ सांगता येईल. सहकारी संस्थाकडे भांडवल मर्यादित असते. कारण सहकारी संस्थेचे सभासद हे आर्थिकदृष्ट्या सक्षम नसतात. संस्थेचे आर्थिक बळ टिकवायचे असेल तर सहकारी संस्थांनी उधारीवर मालाची विक्री करणे योग्य नाही. उधारीवर वस्तू विकल्यास बुडीत रकमेचे प्रमाण वाढू शकते. परिणामी संस्था आर्थिक संकटात येऊ शकते. रोखीच्या व्यवहारामुळे सहकारी संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम बनतात.



**कृती–**

**१) रोखीच्या व्यवहारामुळे सहकारी संस्थेची आर्थिक स्थिती बळकट होते यावर चर्चा करा.**

३) **धार्मिक व राजकीय तटस्थता :** सहकारी संस्था ही एक ऐच्छिक संघटना असून संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो. सहकारात कोणत्याही राजकीय व धार्मिक विचारप्रणालीस स्थान नाही. त्यामुळे सहकारी संस्था या गोष्टीपासून अलिप्त असणे आवश्यक आहे. सहकारी संस्थांची दारे सर्व जाती, धर्म व वंशाच्या लोकांसाठी खुली असली पाहिजेत. आपला कारभार करत असताना राजकीय व धार्मिक विचारसरणीचा प्रभाव असता कामा नये. संस्थेच्या निकोप वाढीसाठी सहकारी संस्था राजकीय व धार्मिक बाबतीत तटस्थ राहिली पाहिजे.

४) **सेवा तत्त्व :** आपल्या सभासदांना व समाजाला सेवा देणे हे सहकारी संस्थांचे मुख्य उदि्दष्ट आहे. सहकारी संस्थेत सेवेला अधिक प्राधान्य दिले जाते तर नफा मिळविणे गौण किंवा दुय्यम समजले जाते. सहकारी संस्था सभासदांना निर्भेळ व दर्जेदार वस्तूंचा पुरवठा, योग्य वजनमापे, आर्थिक शोषण व फसवणुकीपासून संरक्षण इत्यादी सेवा पुरवितात. सभासदांचे आर्थिक कल्याण समोर ठेवून संस्था आपले आर्थिक व्यवहार करीत असतात. हे आर्थिक व्यवहार करतांना संस्थेचे अस्तित्व टिकवण्यासाठी ग्राहकांची आर्थिक पिळवणूक न करता वाजवी प्रमाणात नफा मिळविणे गैर नाही.

५) **काटकसरीचे तत्त्व :** सभासदांनी जास्तीत जास्त काटकसर करावी असे हे तत्त्व सांगते. प्रत्येक सहकारी संस्थेने आपला कारभार हा काटकसरीने चालविला पाहिजे. तसेच अनावश्यक खर्च व उधळपट्टी टाळली पाहिजे. आपल्या सभासदांना कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त चांगली सेवा उपलब्ध करून दिली पाहिजे. यामुळे संस्था अर्थक्षम होण्यास मदत होते. साहजिकच सभासदांना बचतीची सवय लागते. यासाठीच सहकारी संस्थेत काटकसरीचे तत्त्व महत्त्वाचे मानले जाते.

६) **आधिक्याचे न्याय्य वाटप :** सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश नफा मिळविणे नसून सेवा देणे हा असतो. तरीही संस्थांनी व्यवस्थापन खर्च भागवून वाजवी नफा मिळविला पाहिजे. संस्थेने वर्षभर केलेल्या आर्थिक व्यवहारातून जे शिल्लक राहते त्यालाच आधिक्य म्हणतात. या आधिक्यातील २५ टक्के रक्कम राखीव निधीत जमा केली पाहिजे. उर्वरित नफा सभासदांनी केलेल्या व्यवहाराच्या व भागभांडवलाच्या प्रमाणात सभासदांमध्ये लांभाशाच्या स्वरूपात दिला जातो. हा लांभाश दर जास्तीत जास्त १५ टक्के पर्यंत दिला जातो.



**कृती–**

**२) भविष्यकालीन तरतुदीसाठी काटसकर व बचत करणे आवश्यक आहे – यावर चर्चा करा.**

## ३.४ सारांश

सहकारी संस्थेचे कामकाज उत्तम पद्धतीने चालविण्यासाठी काही मार्गदर्शक सहकार तत्त्वे किंवा नियमांची आवश्यकता असते. तत्त्वामुळे संस्थेने निश्चित केलेली उद्दिष्ट्ये साध्य करता येतील. विविध नियमांचा अवलंब करत संस्था आर्थिकदृष्ट्या बळकट करण्यासाठी व संस्थेच्या विकासासाठी ही तत्त्वे उपयोगी पडतात व निश्चित केलेली उद्दिष्ट्ये व ध्येये साध्य करता येतात. त्यामुळे नियम किंवा तत्त्वे असणे आवश्यक असतात तरच संस्थेचा सर्वांगीण विकास साध्य करता येईल.

- **सहकाराची पुनर्निर्धारित मूलतत्त्वे**

  १) खुले व ऐच्छिक सभासदत्व

  २) सभासदांचे लोकशाही नियंत्रण

३) सभासदांचा आर्थिक सहभाग

४) स्वायत्तता आणि स्वातंत्र्य

५) शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती

६) सहकारांतर्गत सहकाराचे तत्त्व

७) सामाजिक बांधिलकी

- **सहकाराची सर्वसामान्य तत्त्वे**

१) परस्पर सहाय्याव्दारे स्वावलंबन

२) रोखीचे व्यवहार

३) धार्मिक व राजकीय तटस्थता

४) सेवा तत्त्व

५) काटकसरीचे तत्त्व

६) आधिक्याचे न्याय्य वाटप

## ३.५ महत्त्वाच्या संज्ञा

१) **सहकार तत्त्व** – सहकारी चळवळीच्या उद्दिष्ट प्राप्तीसाठी व्यवहार्य असलेले नियम

२) **राखीव निधी** – वार्षिक नफ्यातून भविष्यकालीन गरजेसाठी बाजूला काढून ठेवलेली रक्कम

३) **लाभांश** – सभासदांमध्ये (भागधारक) वाटप केला जाणारा वाढावा (नफा) (आधिक्य)

## ३.६ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

१) सहकारी संस्था ही आर्थिकदृष्ट्या ----- व्यक्तिंची संघटना आहे.

(अ) सबल (ब) दुर्बल (क) प्रभावशाली

२) सेवा देणे हे सहकारी संस्थेचे ----- उद्दिष्ट आहे.

(अ) मुख्य (ब) दुय्यम (क) विशिष्ट

३) सहकारी संस्थांमध्ये भांडवलावर ----- व्याज दिले जाते.

(अ) स्थिर (ब) मर्यादित (क) अमर्यादित

४) सहकारी संस्थेचे कामकाज ----- पद्धतीने चालते.

(अ) भांडवलशाही (ब) हुकूमशाही (क) लोकशाही

५) सहकारी संस्थेतील प्रत्येक सभासदाला ----- मत देण्याचा अधिकार असतो.

(अ) एक (ब) दोन (क) तीन

**(ब) योग्य जोड्या जुळवा.**

| अ गट | ब गट |
|---|---|
| अ) खुले सभासदत्व | १) समाजहिताविरुद्ध कार्य |
| ब) काटकसरीचे तत्व | २) जात,धर्म,पंथ विरहित सभासदत्व |
| क) लोकशाही कारभार | ३) सामाजिक कल्याणाचे कार्य |
| ड) सामाजिक बांधिलकी | ४) अनावश्यक खर्च टाळणे |
| इ) राजकीय व धार्मिक तटस्थतेचे तत्व | ५) एक व्यक्ती एक मत |
| | ६) पैशाची उधळपट्टी |
| | ७) राजकीय हस्तक्षेप नसतो |
| | ८) एक भाग एक मत |
| | ९) जात,धर्म,पंथरहित सभासदत्व |
| | १०) राजकीय हस्तक्षेप असतो |

**(क) खालील विधानासाठी एक शब्द/शब्दसमूह लिहा.**

१) सहकारी संस्था स्थापनेचा मुख्य उददेश

२) सहकारी संस्थेचा कारभार व व्यवस्थापन या तत्वानुसार चालतो.

३) सभासदांना बचतीची सवय लावणारे तत्व.

४) सामाजिक हित व सामाजिक कल्याण साधण्याचे तत्व.

**(ड) खालील विधाने चूक किंवा बरोबर ते लिहा.**

१) सहकारी संस्थेचे सभासदत्व खुले व ऐच्छिक असते.

२) सहकारी संस्था नफा मिळविण्याच्या उददेशाने स्थापन झालेल्या असतात.

३) सहकारात राजकीय व धार्मिक विचारप्रणालीस स्थान नसते.

४) सहकारी संस्थेतील सभासदांना लाभांश प्राप्त करण्याचा अधिकार असतो.

५) सभासदत्व मिळवण्यासाठी सक्ती केली जाते.

६) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक एकत्र येऊन सहकारी संस्था स्थापन करतात.

**इ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) सभासदांना .............. देणे हे सहकारी संस्थेचे मुख्य उद्दिष्ट असते.

२) सहकारी संस्थांमध्ये भांडवलावर .............. व्याज दिले जाते.

३) सहकारी संस्थेला झालेल्या एकूण नफ्यातून ............ टक्के रक्कम राखीव निधीत जमा करावी लागते.

४) सहकारी संस्थेच्या निकोप वाढीसाठी सहकारी संस्था राजकीय व ............... बाबतीत तटस्थ राहिली पाहिजे.

## (फ) अचूक पर्याय निवडा.

| | |
|---|---|
| १) | जात, धर्म, पंथ विरहित तटस्थतेचे तत्त्व |
| २) काटकसरीचे तत्त्व | |
| ३) सामाजिक बांधिलकी | |
| ४) | राजकीय व धार्मिक तटस्थतेचे तत्त्व |
| ५) एक व्यक्ती एक मत | |

अनावश्यक खर्च टाळणे, खुले व ऐच्छिक सभासदत्व, राजकीय हस्तक्षेप नसतो, लोकशाही कारभार, सामाजिक कल्याण.

## ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सहकाराचे तत्त्व म्हणजे काय?

२) सहकारी संस्था स्थापनेचा मुख्य उद्‌देश कोणता असतो?

३) सहकारांतर्गत सहकार म्हणजे काय?

४) सहकारी संस्था जास्तीत जास्त किती टक्क्यापर्यंत लाभांश जाहीर करू शकतात?

५) काटकसरीचे तत्त्व म्हणजे काय?

६) सहकारी संस्थेने आपला कारभार काटकसरीने चालविण्यासाठी काय टाळले पाहीजे?

## ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.

१) सहकारी संस्था उधारीच्या व्यवहारामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम बनतात.

२) सभासदांना सेवा देणे हे सहकारी संस्थांचे दुय्यम उद्‌दिष्ट असते.

३) सहकारी संस्थेचा कारभार हुकूमशाही पद्‌धतीने चालतो.

४) सहकारी संस्थेचे सभासदत्व सक्तीचे असते.

## ई) गटात न बसणारा शब्द शोधा.

१) अ) स्वायत्तता आणि स्वातंत्र्य ब) खुले व ऐच्छिक सभासदत्व
क) सामाजिक बांधिलकी ड) सेवा तत्त्व

२) अ) रोखीचे व्यवहार ब) काटकसरीचे तत्त्व
क) आधिक्याचे न्याय्य वाटप ड) खुले व ऐच्छिक सभासदत्त्व

**प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.**

१) काटकसरीचे तत्त्व

२) रोखीचे व्यवहार

३) लाभांश वाटप

४) सभासदांचे लोकशाही नियंत्रणाचे तत्त्व

**प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.**

१) सहकारी तत्त्वांचा वापर दैनंदिन जीवनात कसा होतो.

२) ''सहकारी चळवळीच्या प्रगतीसाठी सहकारी तत्त्वांची गरज आहे.''

**प्र.४ टीपा लिहा.**

१) सभासदांचा आर्थिक सहभाग

२) सहकाराची सर्वसामान्य तत्त्वे

३) राजकीय व धार्मिक तटस्थता तत्त्व

४) सहकारातंर्गत सहकार आणि शिक्षण, प्रशिक्षण व माहितीचे तत्त्व

**प्र.५ कारणे द्या.**

१) सहकारी संस्था राजकीय व धार्मिकदृष्ट्या तटस्थ असली पाहिजे.

२) सहकारी संस्था सभासदांशी रोखीने व्यवहार करतात.

३) सहकारी संस्थेतील सभासदत्व खुले व ऐच्छिक असते.

४) सेवा देणे हा सहकारी संस्थेचा मुख्य उद्‌देश असतो.

५) संस्थेतील सभासद व सेवकांना सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण दिले पाहिजे.

**प्र.६ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) सहकाराची पुनर्निर्धारित मूलतत्त्वे स्पष्ट करा.

२) सहकाराची सर्वसामान्य तत्त्वे स्पष्ट करा.

**प्र.७ दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) सहकाराची पुनर्निर्धारित मूलतत्त्वे सविस्तरपणे लिहा.

२) सहकाराची तत्त्वे म्हणजे काय? सहकाराची सर्वसामान्य तत्त्वे सविस्तरपणे लिहा.

◆◆◆

# ४. सहकारी संस्थेची स्थापना
(Formation of Co-operative Society)


४.१ प्रस्तावना
४.२ सहकारी संस्थेची स्थापना
४.२.१ प्रवर्तन अवस्था
४.२.२ सहकारी संस्थेची नोंदणी अवस्था
४.३ सहकारी संस्थेचा प्रवर्तक
४.३.१ प्रवर्तकाची कार्ये
४.४ सारांश
४.५ महत्त्वाच्या संज्ञा
४.६ स्वाध्याय


## ४.१ प्रस्तावना : (Introduction)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात सहकाराचा विकास मोठ्या प्रमाणावर झाल्याने विविध क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन होऊ लागल्या. ग्रामीण तसेच शहरी भागातसुद्‌धा सहकाराचा विस्तार झाल्याचे दिसून येते. प्रारंभी फक्त शेती पतपुरवठा व त्यास पूरक सेवा या क्षेत्रापुरत्याच सहकारी संस्था स्थापन झालेल्या होत्या. अशा विविध प्रकारच्या संस्थांचे स्वरूप व कार्ये वेगवेगळी असतात. सहकारी संस्थांची स्थापना कोण आणि कशा पद्‌धतीने करतात यासाठी सहकारी संस्थेच्या नोंदणीची कार्यपद्‌धती समजावून घेणे महत्त्वाचे असते.

समान आर्थिक उद्‌दिष्ट्ये असणाऱ्या व्यक्ती आपल्या गरजा भागविण्यासाठी एकत्र येऊन सहकारी संस्थेची स्थापना करतात. यामुळे समाजातील सर्व स्तरातील लोकांना सहकारी संस्थेच्या स्थापनेची आवश्यकता भासते. सहकारी संस्थेची स्थापना ही एक कायदेशीर व तांत्रिक बाब आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० नुसार सहकारी संस्थेच्या नोंदणीची कार्यपद्‌धती निर्धारित केलेली आहे. त्यानुसार सहकारी संस्थेची नोंदणी करावी लागते. आपण या प्रकरणात सहकारी संस्थेची स्थापना, नोंदणीची कार्यपद्‌धती व प्रवर्तकाची कार्ये इत्यादीचा अभ्यास करणार आहोत.

## ४.२ सहकारी संस्थेची स्थापना : (Formation of Co-operative Society)

सहकारी संस्थेला कायदेशीर अस्तित्व प्राप्त होण्यासाठी तिची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा **१९६०** नुसार होणे बंधनकारक आहे. सहकारी संस्थेची स्थापना ही प्रवर्तन अवस्था आणि नोंदणी अवस्था अशा दोन अवस्थांमधून होत असते.

### ४.२.१ प्रवर्तन अवस्था : (Promotion Stage)

''सहकारी संस्थेची स्थापना होण्यापूर्वी तिला ज्या ज्या टप्प्यातून जावे लागते त्यांना एकत्रितपणे 'प्रवर्तन अवस्था' असे म्हणतात''. संस्थेच्या नोंदणीपूर्वी विविध बाबी पूर्ण कराव्या लागतात.याचा प्रारंभ प्रवर्तन अवस्थेपासून होतो. सहकारी संस्था स्थापनेची कल्पना मनात उद्‌भवणे व ती संस्था प्रत्यक्षात साकार करणे याला प्रवर्तन अवस्था/नोंदणीपूर्व अवस्था असे म्हणतात. सहकारी संस्थेचा उद्‌देश निश्चित करून त्या उद्‌देशाप्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करावी लागते. प्रवर्तनातील सर्व टप्पे संस्थेच्या भावी काळाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असतात.

## • प्रवर्तन अवस्थेतील टप्पे




• प्रवर्तन अवस्थेतील टप्पे पुढीलप्रमाणे –

१) **संस्था स्थापनेची कल्पना मनात उद्‌भवणे :** सहकारी संस्था स्थापन करण्याची कल्पना ज्या व्यक्ती व व्यक्तिसमूहाच्या मनात उद्‌भवते. अशा व्यक्ती किंवा व्यक्तिसमूहाला 'प्रवर्तक' म्हणतात. आपल्या परिसरातील दुर्बल घटकांच्या प्रगतीचा विचार करणाऱ्या आणि नेतृत्वाचे गुण असणाऱ्या व्यक्ती किंवा व्यक्तिसमूहाच्या मनात सहकारी संस्था स्थापनेची कल्पना उद्‌भवते.

२) **मनातील कल्पनेचे तपशीलवारपणे परीक्षण करणे :** नियोजित सहकारी संस्थेच्या कल्पनेचे परीक्षण करणे गरजेचे असते. सर्वप्रथम कल्पना वास्तवतेवर तपासून पाहिली पाहिजे. या परीक्षणातून नियोजित सहकारी संस्थेचे भांडवल उभारणीचे मार्ग, अर्थक्षमता याचा अंदाज घ्यावा लागतो. अर्थक्षम होऊ शकणाऱ्या सहकारी संस्थेची निबंधक नोंदणी करतात, अन्यथा अर्थक्षम होऊ न शकणाऱ्या संस्थेच्या नोंदणीस नकार देतात.

३) **अनौपचारिक सभेचे आयोजन करणे :** सहकारी संस्था स्थापनेची कल्पना मनात निश्चित केल्यानंतर प्रवर्तक परिसरातील लोकांना त्याला सुचलेली कल्पना पटवून देण्यासाठी अनौपचारिक सभेचे आयोजन करतात. त्या सभेत नियोजित सहकारी संस्थेची गरज व फायदे पटवून देतात.या सभेत संस्थेचे उद्देश, कार्यक्षेत्र, व्यवसायाचे स्वरूप, संस्थेचे प्रस्तावित नाव इत्यादी बाबी निश्चित करण्यात येतात.


४) **साधनसामग्री गोळा करणे :** सहकारी संस्था स्थापनेच्या कल्पनेस मूर्त स्वरूप देण्यासाठी साधनसामग्री प्रवर्तकाला गोळा करावी लागते.संस्थेच्या स्थापनेसाठी जागा, फर्निचर, स्टेशनरी, विहित नमुन्यातील अर्ज, वेगवेगळ्या कुटुंबातील किमान दहा सभासद इत्यादींची पूर्तता प्रवर्तक करतो. याशिवाय संस्थेच्या नोंदणीसाठी नोंदणी अधिकाऱ्याकडे विहीत नमुना 'अ' नुसार अर्ज सादर करावा लागतो.तसेच साधनसामग्री गोळा करण्याचा खर्च प्रवर्तकच करीत असतो.

५) **आर्थिक योजना तयार करणे :** सहकारी संस्थेला आपली नियोजित उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी भांडवलाची गरज असते. सहकारी संस्थेचा आकार व प्रकारानुसार भांडवलाची गरज भागवावी लागते. त्यासाठी भांडवल उभारणीचे मार्ग निश्चित करावे लागतात. यासाठी भागविक्री, ठेवी, सहकारी बँका व वित्तीय संस्था यांच्याकडून कर्जाच्या रूपाने उभारले जाणारे भांडवल इत्यादी आर्थिक स्वरूपाची माहिती देणारी योजना प्रवर्तक तयार करून योजनेची माहिती इतर सभासदांना देतात.

६) **दस्तऐवज व कागदपत्रे तयार करणे :** सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठी किमान दहा सभासदांच्या सह्या असलेला पूर्ण व व्यवस्थितपणे भरलेला अर्ज नमुना 'अ' मध्ये तयार करतात. तसेच सभासद यादी, संस्थेचे पोटनियम, नोंदणीपूर्व झालेल्या सभेचे इतिवृत, जागा/इमारत मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र, सभेस हजर असलेल्या सभासदांची नावे व सहयांचे पत्रक इत्यादी कागदपत्रे तयार करावी लागतात. अशा प्रकारे नियोजित सहकारी संस्थेच्या स्थापनेतील प्रवर्तन अवस्था पूर्ण होऊन संस्थेची नोंदणी अवस्था सुरू होते.

### ४.२.२ सहकारी संस्थेची नोंदणी अवस्था : (Registration Stage)

प्रवर्तन अवस्था पूर्ण झाल्यावर नोंदणी अवस्था सुरू होते. सहकारी संस्थेला कायदेशीर अस्तित्व प्राप्त होण्यासाठी तिची नोंदणी होणे गरजेचे असून या अवस्थेतील सर्व बाबी औपचारिक स्वरूपाच्या असतात. या बाबी पूर्ण केल्यानंतरच सहकारी संस्थेची नोंदणी होऊ शकते. त्यासाठी नोंदणी अवस्था महत्त्वाची असते. या अवस्थेमध्ये पुढील टप्प्यांचा समावेश होतो.




१) **प्राथमिक /औपचारिक सभा बोलविणे :** नियोजित संस्थेची नोंदणीपूर्व तयारी करून प्रवर्तक सभासदांची प्राथमिक सभा बोलवितात. त्या सभेत नियोजित संस्थेचा उद्देश, व्याप्ती, सभासद संख्येची मर्यादा, कार्यक्षेत्र, भांडवल उभारणी, उपविधी, नियोजित संस्थेचे नांव, निवडणूक नियम, इत्यादीबाबत निर्णय घेतले जातात. तसेच या सभेच्या कामकाजाच्या इतिवृत्ताची एक प्रत नोंदणी अर्जासोबत जोडावी लागते.

२) **नियोजित सहकारी संस्थेचे बँकेत खाते उघडणे :** नियोजित सहकारी संस्था स्थापनेचा निर्णय प्राथमिक सभेत मंजूर झाल्यानंतर जिल्हा उपनिबंधकाच्या परवानगीने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत संस्थेचे खाते उघडले जाते. त्या खात्यावर सभासदांकडून मिळालेली भाग भांडवलाची रक्कम जमा केली जाते. भाग भांडवलापोटी संस्थेच्या नावे किती रक्कम जमा झाली आहे. यासाठीचा बँक शिलकीचा दाखला प्रवर्तकाला बँकेकडून मिळवावा लागतो व तो नोंदणी अर्जासोबत जोडावा लागतो .

३) **नोंदणी प्रस्ताव सादर करणे :** सहकार कायद्यातील तरतुदीनुसार नियोजित संस्थेच्या नोंदणीसाठी विहित नमुना 'अ' मध्ये नोंदणी अधिकाऱ्याकडे नोंदणी अर्ज चार प्रतीत प्रर्वतक सादर करतो. नोंदणी अर्जासोबत विविध प्रकारची कागदपत्रे सादर करावी लागतात. यामध्ये सभासद यादी, तलाठ्याचा दाखला, उपविधीच्या चार प्रती, बँक शिलकीचा दाखला, जागेचे नाहरकत प्रमाणपत्र, प्राथमिक सभेचे इतिवृत्त, प्रकल्प अहवाल, नियोजित संस्थेचे नाव पत्ता, उद्‌दिष्टे, कार्यक्षेत्र, व्यवसायाचे स्वरूप इत्यादीचा समावेश असतो.

४) **नोंदणी शुल्क/ चलन पावती :** महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६१ नुसार सहकारी संस्थेचे नोंदणी शुल्क शासकीय कोषागारात भरावे लागते. त्यावेळी मिळणारी मूळ चलन पावती नोंदणी अर्जासोबत सादर करावी लागते. सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठी रू. ५० ते रू. २५,००० पर्यंत शुल्क आकारले जाते. सहकारी संस्थांच्या प्रकारानुसार वेगवेगळे नोंदणी शुल्क आकारले जाते.

५) **नोंदणी अर्जाची नोंद :** सहकारी संस्थेची नोंदणी करण्यासाठी आलेला अर्ज मिळाल्यानंतर निबंधक नमुना 'ब' नोंदवहीत अर्जातील तपशिलाची नोंद करतात. अशा अर्जास अनुक्रमांक दिला जातो. अर्ज मिळाल्याबद्‌दलची पोच पावती मुख्य प्रवर्तकाकडे दिली जाते.

६) **निबंधकामार्फत नोंदणी अर्जाची छाननी :** नियोजित सहकारी संस्थेचा नोंदणी प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नोंदणी अर्जाची व त्या सोबतच्या कागदपत्रांची छाननी निबंधक करतात. त्यात त्रुटी असतील तर त्या प्रवर्तकाला कळवून पूर्ण करण्याबद्‌दल कळविले जाते.छाननीच्या वेळी काही त्रुटी उद्‌भवल्यास त्या विषयीचा खुलासा करण्याचा निर्देश मुख्य प्रवर्तकास दिला जातो.

७) **सहकारी संस्था नोंदणी आणि वर्गीकरण :** नोंदणी अर्ज व कागदपत्रे परिपूर्ण असतील तर निबंधक त्या संस्थेची नोंदणी झाल्याचे शासकीय अधिपत्रात जाहीर करतात. त्या संस्थेचे योग्य त्या वर्गात/ उपवर्गात वर्गीकरण करतात. नोंदणीसाठी अर्ज दाखल झाल्यानंतर नोंदणीबाबतचा निर्णय नोंदणी अधिकाऱ्यांना दोन महिन्याच्या आत द्यावा लागतो. त्यांना नोंदणी नाकारायची असेल तर नोंदणी अधिकाऱ्यांनी मुख्य प्रवर्तकाला योग्य त्या कारणासह लेखी स्वरूपात कळविणे आवश्यक असते.

८) **नोंदणी प्रमाणपत्र :** सहकारी संस्थेची नोंदणी केल्यानंतर निबंधक संस्थेला नोंदणी क्रमांक देतो. संस्थेची नोंदणी झाल्याचा पुरावा म्हणून संस्थेला नोंदणी दाखला/नोंदणी प्रमाणपत्र दिले जाते. हे प्रमाणपत्र दिल्यानंतर संस्थेला कायदेशीर दर्जा प्राप्त होतो व संस्था अस्तित्वात येते. नोंदणी प्रमाणपत्रावर नोंदणीकृत संस्थेचे नाव, नोंदणी क्रमांक, नोंदणी दिनांक, वर्ष, वर्ग इत्यादीची माहिती असते. नोंदणी प्रमाणपत्रावर निबंधकाची सही व शिक्का असतो.तसेच नोंदणीनंतर संस्थेच्या नावात, उपविधीत निबंधकाच्या परवानगीशिवाय बदल करता येत नाही.

- **सहकारी संस्था नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे**

सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठी मुख्य प्रवर्तक खालील कागदपत्रे तयार करतो.

१) **सभासद यादी :** नियोजित सहकारी संस्थेचे सभासद होणाऱ्या व्यक्तिंना सहकारी संस्थेकडे अर्ज करावा लागतो. त्यांना प्रवेश शुल्क व भागभांडवलाची रक्कम भरावी लागते. अशा सभासदांची यादी तयार केली जाते. या सभासद यादीच्या चार प्रती नोंदणी अर्जासोबत जोडाव्या लागतात. या यादीमध्ये सभासदाचे संपूर्ण नाव, वय, पत्ता, व्यवसाय, भागसंख्या व प्रवेश शुल्क इत्यादींचा समावेश असतो.

२) **तलाठ्याचा दाखला :** नियोजित सहकारी संस्थेच्या स्थापनेसाठी वेगवेगळ्या कुटुंबातील दहा व्यक्ती असाव्या लागतात. या व्यक्ती एकाच कुटुंबातील नाहीत असा दाखला तलाठ्याकडून मिळवून नोंदणी अर्जासोबत जोडावा लागतो.

३) **संस्थेचे उपविधी / पोटनियम :** सहकारी संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार चालते. उपविधी म्हणजे संस्थेचे अंतर्गत कामकाज व व्यवस्थापन चालविण्यासाठी तयार केलेल्या नियमांचा संच होय. हे उपविधी मुख्य प्रवर्तक तयार करतो. उपविधी म्हणजे एकप्रकारे संस्थेची घटनाच असते. नोंदणी अर्जासोबत उपविधीच्या चार प्रती जोडाव्या लागतात. निबंधकाच्या परवानगीशिवाय उपविधीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येत नाही.

४) **बँक शिलकीचा दाखला :** नियोजित सहकारी संस्थेचे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत मुख्य प्रवर्तकाच्या नावे खाते उघडले जाते. या खात्यावर भागभांडवलाची रक्कम व प्रवेश शुल्काची रक्कम जमा केली जाते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून बँक शिलकीचा दाखला मिळवावा लागतो. हा दाखला नोंदणी अर्जासोबत जोडावा लागतो.

५) **जागेचे ना हरकत प्रमाणपत्र :** नोंदणी अर्जामध्ये नियोजित सहकारी संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता लिहावा लागतो. संस्थेच्या कार्यालयासाठी ज्या व्यक्तिच्या मालकीची जागा आहे त्या जागा मालकाकडून 'ना-हरकत प्रमाणपत्र' घेणे आवश्यक असते. हे प्रमाणपत्र नोंदणी अर्जासोबत जोडावे लागते.

६) **औपचारिक सभेचे इतिवृत्त :** नियोजित सहकारी संस्थेच्या नोंदणी अर्जासोबत नोंदणीपूर्व घेतलेल्या प्राथमिक सभेच्या इतिवृत्ताची प्रत जोडणे आवश्यक असते.

७) **प्रकल्प अहवाल :** प्रकल्प अहवाल म्हणजे संस्थेच्या भविष्यकालीन प्रगतीचा आराखडा होय. या अहवालामध्ये उत्पन्नाचे मार्ग, उत्पादन खर्च, खरेदी विक्रीची व्यवस्था, संभाव्य नफा, अर्थक्षमता इत्यादी बाबींचा विचार करून संस्था नोंदणीस निबंधक परवानगी देतात.



**कृती–**

**१) नजीकच्या निबंधक कार्यालयाला भेट देऊन सहकारी संस्थेच्या नोंदणीबाबत माहिती जमा करा.**

### ४.३ सहकारी संस्थेचा प्रवर्तक : (Promoter)

सहकारी संस्थेच्या स्थापनेमध्ये प्रवर्तक हा अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडतो. प्रवर्तक म्हणजे अशी व्यक्ती की, जी सहकारी संस्थेच्या स्थापनेसाठी पुढाकार घेते. प्रवर्तक हा सहकारी संस्था स्थापनेची कल्पना मनात आणण्यापासून ती कल्पना प्रत्यक्षात साकार करण्यासाठी आवश्यक ते सर्व परिश्रम घेतो.


**अर्थ –** 'प्रवर्तक' या संज्ञेची व्याख्या सहकार कायदयामध्ये दिलेली नाही.परंतु त्याची कार्ये स्पष्टपणे सांगितली आहेत. त्या आधारे प्रवर्तकाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगता येईल.

"सहकारी संस्थेच्या स्थापनेच्या कल्पनेपासून ती कल्पना मूर्त स्वरूपात आणून संस्थेची नोंदणी करून तिचा कारभार सुरळीत चालू करण्याच्या दृष्टीने सर्व कार्ये करण्याऱ्या एका किंवा अनेक व्यक्तिंच्या समूहाला 'प्रवर्तक' म्हणतात."

प्रवर्तक हा सहकारी संस्थेच्या स्थापनेबाबत पुढाकार घेऊन संभाव्य सभासदांना गोळा करण्याची व साधनसामग्रीची

जुळवाजुळव करण्याचीही जबाबदारी स्वीकारतो. त्यासाठी त्याच्या अंगी नेतृत्व गुण, चिकाटी, पुढाकार वृत्ती, कर्तबगारी, कल्पकता इ. गुण असले पाहिजेत. तसेच संस्थेच्या स्थापनेसाठी कराव्या लागणाऱ्या प्रारंभिक खर्चाचा आर्थिक भारही पेलण्याची तयारी असावी लागते.

### ४.३.१ प्रवर्तकाची कार्ये: (Functions of Promoter)




१) **सहकारी संस्थेच्या स्थापनेची कल्पना सुचणे :** समाजाच्या /व्यक्तिसमूहाच्या विशिष्ट समान गरजा भागविण्यासाठी एखादी सहकारी संस्था स्थापन करण्याची कल्पना मनात आणण्याचे महत्त्वाचे काम प्रवर्तकाला करावे लागते.

२) **अनौपचारिक सभा बोलविणे :** आपल्या मनातील सहकारी संस्था स्थापनेच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी प्रवर्तक गावातील किंवा परिसरातील संभाव्य सभासदांची सभा बोलवितो. तिला अनौपचारिक सभा किंवा नोंदणीपूर्व सभा असे म्हणतात. प्रवर्तक सहकारी संस्था स्थापन करण्याची कल्पना या सभेपुढे मांडतो व संस्था स्थापनेचे महत्व पटवून देतो.

३) **संस्थेची उद्दिष्टे ठरविणे :** अनौपचारिक सभेमध्ये संस्था स्थापनेचे महत्त्व पटल्यास संस्थेच्या उद्दिष्टांची एक यादी तयार करावी लागते.सहकारी संस्थेच्या प्रकारानुसार मुख्य उद्दिष्टात फरक पडतो. उदाहरणार्थः ग्राहक सहकारी संस्था स्थापन केली तर वाजवी किंमतीत जीवनावश्यक वस्तू व सेवांचा पुरवठा करून देणे हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट असेल.

४) **प्रकल्प अहवाल तयार करणे :** नियोजित सहकारी संस्थेचा संभाव्य व्यवहार, उत्पन्न-खर्च व उलाढाल विचारात घेऊन तिचा प्रकल्प अहवाल तज्ज्ञांकडून तयार करून घेण्याचे कार्य प्रवर्तकास करावे लागते.

५) **साधनसामग्री गोळा करणे :** नियोजित सहकारी संस्थेच्या स्थापनेसाठी आवश्यक असलेल्या साधनसामुग्रीचे संकलन प्रवर्तकाला करावे लागते. उदा. भांडवल गोळा करणे, संस्थेसाठी कार्यालयाची व्यवस्था करणे, फर्निचर, स्टेशनरी, लेखन साहित्य, मनुष्यबळ इत्यादींची जुळवाजुळव करणे.

६) **आर्थिक योजना तयार करणे :** नियोजित सहकारी संस्थेच्या प्रकल्प अहवालाच्या आधारे संस्थेची आर्थिक योजना तयार करून भांडवल उभारणीची साधने निश्चित करणे हे प्रवर्तकाचे काम आहे.

७) **बँकेत खाते उघडणे :** जिल्हा उपनिबंधकाच्या परवानगीने प्रवर्तक नियोजित सहकारी संस्थेचे खाते जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत उघडतो. संभाव्य सभासदांकडून भाग भांडवलापोटी जमा झालेल्या रकमेचा भरणा बँक खात्यात करून बँकेकडून शिलकीचे प्रमाणपत्र प्रवर्तकाला प्राप्त करावे लागते.

८) **नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे तयार करणे :** नियोजित सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे तयार करण्याचे कार्य प्रवर्तकांना करावे लागते. उदा. संस्थेची उपविधी, निवडणूकीचे नियम, सभासदांची नावे पत्यासह यादी, प्रवर्तक मंडळातील सभासदांची यादी, तलाठ्याचा दाखला, कार्यक्षेत्रातील लोकसंख्येचा दाखला, अनौपचारिक सभेचे इतिवृत्त, जागा/ घर मालकाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' बँक शिलकी प्रमाणपत्र, प्रकल्प अहवाल इत्यादी कागदपत्रे त्याला तयार करावी लागतात .

९) **सभासदांची प्राथमिक/औपचारिक सभा बोलविणे :** सहकारी संस्था कायद्यानुसार नियोजित सहकारी संस्थेच्या संभाव्य सभासदांची प्राथमिक/औपचारिक सभा प्रवर्तक बोलवितो. या सभेत संस्था स्थापण्याचा ठराव मंजूर करून सभेचे इतिवृत्त नोंदणी अर्जासोबत जोडावे लागते.

१०) **नोंदणी अर्ज सादर करणे :** प्रवर्तकाला नियोजित सहकारी संस्थेच्या नोंदणीचा रितसर अर्ज नमुना 'अ' हा भरून आवश्यक त्या कागदपत्रासह नोंदणी अधिकाऱ्याकडे (निबंधक)सादर करावा लागतो. तसेच संस्था नोंदणीचे शुल्क शासकीय कोषागारात भरावे लागते.

११) **नोंदणी प्रमाणपत्र मिळविणे :** विहित नमुन्यातील नोंदणी अर्ज निबंधकाकडे सादर केल्यानंतर निबंधक त्या अर्जाची छाननी करतो. हा अर्ज परिपूर्ण असल्यास निबंधक अशा संस्थेची नोंदणी करतो व नोंदणीचे प्रमाणपत्र मुख्य प्रवर्तकाकडे देतो.

१२) **पहिली सर्वसाधारण सभा/नियामक सभा बोलविणे :** सहकारी संस्थेला नोंदणी प्रमाणपत्र मिळाल्यापासून तीन महिन्याच्या आत पहिली सर्वसाधारण सभा/नियामक सभा घेण्याचे काम मुख्य प्रवर्तकाला करावे लागते. सहकार कायद्यातील तरतुदीनुसार पहिली सर्वसाधारण सभा घेणे बंधनकारक असते. या सभेत हंगामी(पहिल्या) व्यवस्थापन समितीची निवड करणे, प्राथमिक खर्चास मंजुरी देणे, प्रवर्तकाच्या नावाने असणारे बँक खाते संस्थेच्या नावे करणे इत्यादीबाबत ठराव संमत केले जातात. ही सभा संस्थेच्या आयुष्यात एकदाच बोलविली जाते.

१३) **पहिल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त लिहिणे :** पहिल्या सर्वसाधारण सभेचे कामकाज संपल्यापासून एक महिन्याच्या आत त्या सभेचे इतिवृत्त प्रवर्तकाने लिहिणे आवश्यक असते. इतिवृत्त म्हणजे सभेतील कामकाजाच्या लेखी स्वरूपातील नोंदी होय. इतिवृत्तातील नोंदीचा धोरणे ठरविण्यासाठी उपयोग होतो.

अशा प्रकारे प्रवर्तक सहकारी संस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची व्यक्ति असून संस्थेच्या स्थापनेपासून तिचे कार्य व्यवस्थितपणे सुरू व्हावे यासाठी ती प्रयत्नशील व जागरूक असते. सहकारी संस्थेचे यश प्रवर्तकाच्या भूमिकेवर अवलंबून असते.



**कृती–**

**२) सहकारी संस्थेच्या एखाद्या प्रवर्तकाची भेट घेऊन सहकारी संस्था स्थापन करताना येणाऱ्या अडचणीवर चर्चा करा.**

**फरक :–**

**प्रवर्तन अवस्था व नोंदणी अवस्था**

| अ. क्र. | मुद्दे | प्रवर्तन अवस्था | नोंदणी अवस्था |
|---|---|---|---|
| १. | अर्थ | सहकारी संस्था स्थापन होण्यापूर्वी तिला ज्या ज्या टप्प्यांतून जावे लागते त्यांना एकत्रितपणे 'प्रवर्तन अवस्था' म्हणतात. | नियोजित सहकारी संस्थेची स्थापना करण्यासाठी ज्या ज्या बाबींची पुर्तता करावी लागते. त्यांना एकत्रितपणे 'नोंदणी अवस्था' म्हणतात. |
| २. | कायद्यातील तरतुदी | सहकारी कायद्यामध्ये प्रवर्तनाबाबतच्या तरतुदी दिलेल्या नाहीत. | सहकारी कायद्यामध्ये सहकारी संस्थेच्या नोंदणी अवस्थेच्या कायदेशीर तरतुदी दिल्या आहेत. |
| ३. | स्वरूप | प्रवर्तन अवस्थेतील सर्व बाबींचे स्वरूप अनौपचारिक असते. | नोंदणी अवस्थेतील सर्व बाबींचे स्वरूप औपचारिक असते. |
| ४. | टप्पे | प्रवर्तन अवस्थेमध्ये –<br>१) संस्था स्थापनेची कल्पना मनात उद्भवणे.<br>२) कल्पनेचे परिक्षण करणे.<br>३) अनौपचारिक सभेचे आयोजन करणे<br>४) साधनसामग्री गोळा करणे<br>५) आर्थिक योजना तयार करणे.<br>६) दस्तऐवज व कागदपत्रे गोळा करणे या टप्प्यांचा समावेश होतो. | नोंदणी अवस्थेमध्ये –<br>१) औपचारिक सभा बोलविणे.<br>२) नियोजित संस्थेचे बँकेत खाते उघडणे.<br>३) नोंदणी प्रस्ताव सादर करणे<br>४) नोंदणी शुल्क भरणे.<br>५) नोंदणी अर्जाची नोंद<br>६) नोंदणी अर्जाची छाननी.<br>७) नोंदणी व वर्गीकरण.<br>८) नोंदणी दाखला<br>या टप्प्यांचा समावेश होतो. |
| ५. | कालावधी | प्रवर्तनाच्या अवस्थेला विशिष्ट कालमर्यादा नसते. तरी पण नियोजित सहकारी संस्था स्थापन होण्यासाठी प्रवर्तक वेगाने हालचाली करतो. | नोंदणी अर्ज मिळाल्यापासून संस्थेची नोंदणी करणे किंवा नाकारणे ही कृती निबंधकाने दोन महिन्याच्या आत करणे कायद्याने बंधनकारक असते. |
| ६. | अस्तित्व | प्रवर्तन अवस्थेत सहकारी संस्थेला कायदेशीर अस्तित्व प्राप्त होत नाही. | नोंदणी अवस्थेनंतर सहकारी संस्थेला कायदेशीर अस्तित्व प्राप्त होते. |

## ४.४ सारांश

सहकारी संस्थेची स्थापना ही एक कायदेशीर व तांत्रिक बाब आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मध्ये सहकारी संस्थेच्या नोंदणीची कार्यपद्धती निर्धारित केलेली आहे.

**सहकारी संस्था स्थापनेच्या अवस्था**

**प्रवर्तन अवस्था –**

- १) संस्था स्थापनेची कल्पना मनात उद्भवणे
  २) मनातील कल्पनेचे तपशीलवारपणे परीक्षण करणे
  ३) अनौपचारिक सभेचे आयोजन करणे
  ४) साधनसामुग्री गोळा करणे
  ५) आर्थिक योजना तयार करणे
  ६) दस्तऐवज व कागदपत्रे तयार करणे

**नोंदणी अवस्था :**

- १) प्राथमिक/औपचारिक सभा बोलविणे
  २) नियोजीत सहकारी संस्थेचे बँकेत खाते उघडणे
  ३) नोंदणी प्रस्ताव सादर करणे
  ४) नोंदणी शुल्क / चलन पावती
  ५) नोंदणी अर्जाची नोंद
  ६) निबंधकामार्फत नोंदणी अर्जाची छाननी
  ७) सहकारी संस्था नोंदणी आणि वर्गीकरण
  ८) नोंदणी प्रमाणपत्र

**सहकारी संस्था नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे :**

१) सभासद यादी
२) तलाठ्याचा दाखला
३) संस्थेचे उपविधी/पोटनियम
४) बँक शिलकीचा दाखला
५) जागेचे नाहरकत प्रमाणपत्र
६) औपचारिक सभेचे इतिवृत्त
७) प्रकल्प अहवाल

**प्रवर्तक :**

"सहकारी संस्थेच्या स्थापनेच्या कल्पनेपासून ती कल्पना मूर्त स्वरूपात आणून संस्थेची नोंदणी करून तिचा कारभार सुरळीत चालू करण्याच्या दृष्टीने सर्व कार्ये करणाऱ्या एका किंवा अनेक व्यक्तिच्या समूहाला 'प्रवर्तक' म्हणतात".

**प्रवर्तकाची कार्ये :**

१. सहकारी संस्था स्थापनेची कल्पना सुचणे
२. अनौपचारिक सभा बोलविणे
३. संस्थेची उद्दिष्टे ठरविणे
४. प्रकल्प अहवाल तयार करणे
५ साधनसामग्री गोळा करणे
६ आर्थिक योजना तयार करणे
७. बँकेत खाते उघडणे
८. नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे तयार करणे
९. सभासदांची औपचारिक सभा बोलवणे
१०. नोंदणी अर्ज सादर करणे
११. नोंदणी प्रमाणपत्र मिळविणे
१२. पहिली सर्वसाधारण सभा बोलविणे
१३. पहिल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त लिहिणे

## ४.५ महत्वाच्या संज्ञा

१) **उपविधी /पोटनियम –** सहकारी संस्थेच्या दैनंदिन कामकाजाचे नियम .

२) **अनौपचारिक सभा –** प्रवर्तन अवस्थेमध्ये आयोजित केलेली सभा.

३) **नमुना 'अ' –** सहकारी संस्थेचा नोंदणीच्या अर्जाचा नमुना

४) **इतिवृत्त –** सभेतील कामकाजाच्या लेखी स्वरूपातील नोंदी.

५) **निंबधक (नोंदणी अधिकारी) –** सहकारी संस्थेची नोंदणी व नियंत्रण करण्यासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेला अधिकारी.

६) **नमुना 'ब' –** निबंधक नोंदणी अर्जाची नोंद आपल्या कार्यालयातील नमुना 'ब' या नोंदवहीत करतात.

## ४.६ स्वाध्याय

**प्र.१ अ) खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा .**

१) सहकारी संस्थेची नोंदणी ही ----- असते .

अ) बंधनकारक ब) ऐच्छिक क) अनावश्यक

२) नोंदणी अर्जासोबत उपविधीच्या ----- -प्रती जोडाव्या लागतात.

अ) तीन ब) चार क) दोन

३) सहकारी संस्था स्थापनेची कल्पना ज्या व्यक्तिच्या मनात उद्‌भवते तिला ----- असे म्हणतात.

अ) निबंधक ब) भागीदार क) प्रवर्तक

४) सहकारी संस्थेचा नोंदणी अर्ज नमुना ----- मध्ये असावा लागतो.

अ) 'क' ब) 'अ' क) 'ब'

५) सहकारी संस्थेच्या नोंदणीचा पुरावा म्हणून निबंधक संस्थेला ----- देतात.

अ) नोंदणी प्रमाणपत्र ब) सूचना पत्र क) इतिवृत्त

६) निबंधक नोंदणी अर्जाची नोंद आपल्या कार्यालयातील नमुना ----- या नोंदवहीत करतात.

अ) 'ब' ब) 'क' क) 'अ'

## ब) योग्य जोडया जुळवा

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| अ) नोंदणीचा पुरावा | १) १९६० |
| ब) प्रवर्तन अवस्था | २) नमुना' ब' |
| क) महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा | ३) नोंदणी दाखला |
| ड) नोंदणी अर्ज | ४) १९०४ |
| इ) सहकारी संस्थेचा नोंदणी अधिकारी | ५) नोंदणीपूर्व अवस्था |
| | ६) तलाठ्याचा दाखला |
| | ७) नोंदणी नंतरची अवस्था |
| | ८) नमुना 'अ' |
| | ९) निबंधक |
| | १०) सभासद |

## क) खालील विधानांसाठी एक शब्द /शब्दसमूह लिहा.

१) सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी पुढाकार घेणारी व्यक्ती

२) सहकारी संस्था नोंदणीचा अर्ज

३) सहकारी संस्थेची नोंदणी करणारा अधिकारी

४) सभेतील कामकाजाची लेखी स्वरूपातील नोंद

५) सहकारी संस्थेच्या नोंदणीचा पुरावा

६) नोंदणी अर्जाची नोंद निबंधक या नोंद वहीत करतात.

## ड) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा.

१) प्रवर्तक सहकारी संस्थेच्या स्थापनेत पुढाकार घेत नाही.

२) सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठी उपविधी आवश्यक असते.

३) पहिली सर्वसाधारण सभा नोंदणी पूर्व घ्यावी लागते .

४) सहकारी संस्थेच्या स्थापनेत प्रर्वतन अवस्थेला फारसे महत्त्व नसते.

५) नोंदणीचे प्रमाणपत्र हे सहकारी संस्थेच्या नोंदणीचा पुरावा असतो.

६) सहकारी संस्थेची नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्याला निबंधक असे म्हणतात.

### इ) खालील विधाने पूर्ण करा.

१) सहकारी संस्थेची नोंदणी ही ............ असते.

२) सहकारी संस्थेच्या स्थापनेत पुढाकार घेणाऱ्या व्यक्तिला ......... असे म्हणतात.

३) नोंदणी अर्जासोबत पोटनियमाच्या ............ प्रती जोडाव्या लागतात.

४) सहकारी संस्थेच्या नोंदणी अर्जाचा नमुना .......... मध्ये असावा लागतो.

### (फ) अचूक पर्याय निवडा.

| | |
|---|---|
| १) नोंदणी प्रमाणपत्र | |
| २) | प्रवर्तक |
| ३) ना हरकत प्रमाणपत्र | |
| ४) संस्थेची घटना | |
| ५) | नमुना 'अ' |

संस्था स्थापनेत पुढाकार, जागेच्या मालकाचा दाखला, नोंदणीचा पुरावा, नोंदणी अर्ज, उपविधी

### ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) प्रवर्तन अवस्था म्हणजे काय?

२) संस्था नोंदणीपूर्वीच्या अवस्थेला कोणती अवस्था म्हणतात?

३) इतिवृत्त म्हणजे काय?

४) नियोजित सहकारी संस्थेचे खाते कोणत्या बँकेत उघडावे लागते?

५) प्रकल्प अहवाल म्हणजे काय?

६) उपविधी म्हणजे काय?

### ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.

१) नोंदणी अर्ज नमुना 'क' मध्ये असावा लागतो.

२) सहकारी संस्थेची नोंदणी संचालक करतात.

३) सहकारी संस्था स्थापनेची कल्पना ज्या व्यक्तिच्या मनात येते तिला सचिव म्हणतात.

४) नोंदणी अर्जाची नोंद निंबधक नमुना 'अ' नोंदवहीत करतात.

**ई) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) अ) प्रवर्तक  ब) सभासद
   क) संचालक  ड) तलाठी

२) अ) प्रकल्प अहवाल  ब) प्राथमिक सभेचे इतिवृत्त
   क) उपविधी  ड) भाग प्रमाणपत्र

३) अ) साधनसामुग्री गोळा करणे  ब) संस्था स्थापनेची कल्पना सुचणे
   क) अनौपचारिक सभेचे आयोजन  ड) अंतिम सभेचे आयोजन

**ज) योग्य क्रम लावा.**

१) अ) पहिली सर्वसाधारण सभा  ब) प्रवर्तन अवस्था  क) नोंदणी अवस्था

२) अ) नमुना 'ब'  ब) नमुना 'अ'  क) नोंदणी प्रमाणपत्र

**प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.**

१) प्रवर्तक  २) उपविधी  ३) नोंदणी प्रमाणपत्र  ४) इतिवृत्त

**प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.**

१) "सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी विविध बाबींची पूर्तता करावी लागते''.

२) सहकारी संस्थेच्या प्रवर्तकाला संस्था नोंदणीसाठी कागदपत्रे जमा करणे आवश्यक आहे.

**प्र.४ फरक स्पष्ट करा.**

१) प्रवर्तन अवस्था व नोंदणी अवस्था

**प्र.५ टीपा लिहा.**

१) प्रवर्तन अवस्था  २) नोंदणी अवस्था  ३) प्रवर्तकाची कार्ये

**प्र.६ कारणे द्या.**

१) पहिली सर्वसाधारण सभा सहकारी संस्थेच्या नोंदणीनंतर घ्यावी लागते.

२) नोंदणी दाखला हा सहकारी संस्थेच्या नोंदणीचा पुरावा असतो.

३) प्रवर्तक सहकारी संस्थेची स्थापना करतो.

**प्र.७ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) प्रवर्तकाची कार्ये स्पष्ट करा.

२) सहकारी संस्थेची नोंदणी अवस्था स्पष्ट करा.

**प्र.८ दीर्घोत्तरी प्रश्न**

१) प्रवर्तन म्हणजे काय ? सहकारी संस्थेच्या प्रवर्तन अवस्थेतील टप्पे स्पष्ट करा.

२) प्रवर्तकाची व्याख्या सांगून प्रवर्तकाला कोणकोणती कार्ये करावी लागतात ते स्पष्ट करा.

३) नोंदणी अवस्था म्हणजे काय ? नोंदणी अवस्थेतील विविध टप्पे स्पष्ट करा.

# ५. सहकारी पतपुरवठा संस्था
(Credit Co-operative Society)

| | | | |
|---|---|---|---|
| ५.१ | प्रस्तावना | ५.५ | सारांश |
| ५.२ | अर्थ व व्याख्या | ५.६ | महत्त्वाच्या संज्ञा |
| ५.३ | वैशिष्ट्ये | ५.७ | स्वाध्याय |
| ५.४ | कार्ये | | |




सहकारी पतपुरवठा संस्था

## ५.१ प्रस्तावना (Introduction) :

भारतात सहकारी चळवळीची सुरुवात सहकारी पतपुरवठा संस्थांच्या स्थापनेद्वारे झाली. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज पुरविण्याच्या उद्देशाने या संस्थांची स्थापना केली गेली. पूर्वीच्या काळी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कर्जपुरवठा सावकारांकडून केला जात होता. मात्र सावकार शेतकऱ्यांचे शोषण व पिळवणूक करीत असत. अशा पिळवणूकीतून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी व शेतीक्षेत्राची कर्जविषयक गरज पूर्ण करण्यासाठी ब्रिटिश सरकारने सन १९०४ मध्ये सहकारी पतपुरवठा संस्थांच्या स्थापनेला गती दिली. सहकारी पतपुरवठा संस्थांची स्थापना ही ग्रामीण भागातील सावकारी वर्चस्वाला एक सक्षम पर्याय म्हणून करण्यात आली. ब्रिटीश सरकारने ''सहकारी पतपुरवठा संस्था कायदा १९०४'' संमत केला. या कायद्यातील तरतूदीनुसार पतपुरवठा सहकारी संस्थांची स्थापना प्रत्येक गाव व खेड्यामध्ये करण्यात आली.

### सहकारी पतपुरवठ्याची त्रिस्तरीय रचना

व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक यांना व्यापारी बँका, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, नागरी सहकारी पतसंस्था कर्ज पुरवठा करतात. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, कारागीर, लहान व्यावसायिक व इतर दुर्बल घटकांना कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी बँका कार्य करतात. सहकारी पतपुरवठ्याची रचना त्रिस्तरीय आहे. राज्य पातळीवर राज्य सहकारी बँक, जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, गावपातळीवर प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन झालेल्या आहेत. सावकारांकडून केले जाणारे आर्थिक शोषण, फसवणूक यापासून मुक्तता करण्याच्या हेतूने सहकारी पतपुरवठा संस्थाची स्थापना केली जाते.




## ५.२ अर्थ (Meaning) :

सहकारी तत्त्वावर शेती व्यवसायाच्या विकासासाठी योग्य व वाजवी व्याज दराने पुरेसा कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था म्हणजेच सहकारी पतपुरवठा संस्था होय.

ज्या गावात किंवा खेड्यामध्ये सहकारी पतसंस्था स्थापन केली जाते,ते गांव किंवा खेड्यापुरते त्या संस्थेचे कार्यक्षेत्र मर्यादित असते. त्या गावातील शेतकरी, कारागीर, लहान व्यावसायिक इत्यादी त्या संस्थेचे सभासद असतात. सभासदांना बचतीची सवय लावतात. शेतकरी सभासदांना कमीत कमी व्याजदराने वेळेवर कर्जपुरवठा करतात. कृषिक्षेत्राचा, शेतकऱ्यांचा आर्थिक विकास घडवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्नशील असतात. सहकारी पतपुरवठा संस्था प्राथमिक पातळीवर सभासदांची गरज लक्षात घेऊन त्यानुसार कर्जपुरवठा करतात, संस्थांचा कर्जव्यवहार प्रत्यक्ष सभासदांशी होतो, म्हणून त्यांना प्राथमिक सहकारी पतसंस्था असे म्हणतात. सहकारी पतपुरवठा संस्था ग्रामीण व शहरी भागात कार्य करतात.

### व्याख्या – (Definition) :

१) "संपत्तीचा किंवा आर्थिक स्थितीचा आधार न घेता आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तिंजवळील उपलब्ध तारण स्वीकारून आणि त्यांच्या सोयीस्कर अटींवर बँकिंग व्यवहार करणारी संस्था म्हणजे सहकारी पतपुरवठा संस्था होय."

**– हेन्री वुल्फ**

२) "शेतमालाचे उत्पादन वाढविण्यासाठी व शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज देण्याबरोबरच शेती उपयुक्त वस्तू, विविध सेवा, जीवनावश्यक वस्तू पुरविणे इत्यादी क्रिया करण्यासाठी लोकांनी स्वेच्छेने स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी पतपुरवठा संस्था होय.''

## ५.३ सहकारी पतपुरवठा संस्थेची वैशिष्ट्ये (Features of Co-operative Credit Society) :




सहकारी पतपुरवठा संस्थेची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे सांगता येतील.

१) **खुले व ऐच्छिक सभासदत्व :** सहकारी पतपुरवठा संस्थेचे सभासदत्व सर्वांसाठी खुले असते. ग्रामीण भागातील शेतकरी, कारागीर व दुर्बल घटक स्वेच्छेने एकत्रित येऊन त्यांच्या आर्थिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सहकारी पतपुरवठा संस्थेची स्थापना करतात. सभासदत्वासाठी कोणत्याही व्यक्तिला सक्ती केली जात नाही.

२) **संस्थेचा उद्‌देश :** सभासद शेतकऱ्यांना शेती उत्पादनासाठी अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करणे, कर्ज रकमेच्या वापरावर नियंत्रण ठेवणे, कृषी कार्यक्रमात सहभाग, बचतीला प्रोत्साहन, कर्ज वसुली, मार्गदर्शन, नवीन संशोधनाची सभासदांना माहिती देणे इत्यादी उद्‌देशाने सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन करतात.

३) **संस्थेचे कार्यक्षेत्र :** संस्था ज्या गावात स्थापन झालेली असते त्या गावापुरते संस्थेचे कार्यक्षेत्र असते. आता हे अंतर चार ते पाच कि.मी. परिसरात येणाऱ्या गावापुरते मर्यादित करण्यात आले आहे. परिसरातील तीन हजार व्यक्तिंना किंवा पाचशे शेतकरी कुटुंबांना संस्थेच्या सेवेचा फायदा व्हावा अशी अपेक्षा असते.

४) **मर्यादित भांडवल :** सहकारी पतपुरवठा संस्थांचे सभासद हे शेतकरी, शेतमजूर, लहान कारागीर या सारखे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक असल्यामुळे त्यांची भाग खरेदी क्षमता खूपच कमी असते. त्यामुळे संस्थेची भांडवल उभारणी क्षमता मर्यादित असते.

५) **कृषी उत्पादन साधनांच्या खरेदीसाठी कर्जपुरवठा :** शेतकरी सभासदांना बी-बियाणे, खते, किटकनाशके, तणनाशके इत्यादी कृषी उत्पादन साधनांच्या (Inputs) खरेदीसाठी या सहकारी पतपुरवठा संस्थांकडून कर्जपुरवठा केला जातो.

६) **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांशी संलग्न :** प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था ज्या जिल्ह्यामध्ये स्थापन झालेल्या असतात, त्याच जिल्ह्याच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांशी संलग्न असतात. सहकारी पतपुरवठा संस्था सभासदांना द्यावयाच्या कर्जाची योजना तयार करतात व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सादर करतात. या बँकेच्या मदतीने वा मार्गदर्शनाप्रमाणे सभासदांना कर्ज पुरवठा केला जातो.

७) **ग्रामीण पतपुरवठा रचनेत महत्त्वाचे स्थान :** सहकारी पतपुरवठा संस्थांचा प्रत्यक्ष संबंध शेतकरी सभासदांशी असतो. त्यामुळे राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेच्या (NABARD) कर्जवाटपाच्या धोरणानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडे येणाऱ्या कर्जपुरवठ्याचे वाटप प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत करण्यासाठी सहकारी पतपुरवठा संस्थांचे योगदान महत्त्वाचे आहे.

८) **तारणावर कर्जपुरवठा :** सहकारी पतपुरवठा संस्था आपल्या सभासदांना स्थायी आणि अस्थायी स्वरूपाच्या मालमत्तेच्या तारणावर कर्ज देतात. कर्ज मंजूर करताना कर्जफेडीची हमी म्हणून दोन सभासदांचा जामीन द्यावा लागतो. उत्पादन कार्यासाठी कर्ज देतांना पीक तारण महत्त्वाचे मानले जाते.

९) **मर्यादित कर्जपुरवठा :** सहकारी पतपुरवठा संस्थांकडील भांडवल मर्यादित असल्यामुळे सभासदांकडून जेवढ्या कर्ज रकमेची मागणी केली जाते तेवढ्या रकमेचा कर्ज पुरवठा या संस्था करू शकत नाहीत. याचाच अर्थ या संस्था सभासदांना मर्यादित प्रमाणात कर्जपुरवठा करतात.

## ५.४ सहकारी पतपुरवठा संस्थेची कार्ये (Functions of Credit Co-operative Society) :



१) **ठेवी स्वीकारणे** : सहकारी पतपुरवठा संस्था व्यापारी बँकांप्रमाणे चालू, बचत, मुदत वा आवर्ती ठेव खात्यावर ठेवी स्वीकारण्याचे कार्य करतात. बचतीला प्रोत्साहन देण्यासाठी ठेवींवर आकर्षक व्याज दिले जाते.

२) **कर्जपुरवठा करणे** : सहकारी पतपुरवठा संस्था शेतकरी व सभासदांना बी-बियाणे, खते, कीटकनाशके, यांत्रिक अवजारे, सिंचनाची साधने इत्यादी खरेदी करण्यासाठी कर्जपुरवठा करते.

३) **कर्जाच्या वापरावर नियंत्रण व कर्जवसुली** : सहकारी पतपुरवठा संस्था कर्जवसुली व कर्जाच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य करते. सभासदांना दिलेल्या कर्जाचा वापर योग्य कारणांसाठी होतो किंवा नाही यावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवते. तसेच दिलेल्या कर्ज रकमेची व्याजासह सुलभ हप्त्यामध्ये वसुली करते.

४) **भांडवल निर्मिती** : बचतीला प्रोत्साहन देऊन ठेवी स्वीकारणे, शेती उत्पादक कामांसाठी सभासदांना कर्जपुरवठा करणे, गरजेनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घेऊन सभासदांची भांडवलाची गरज पूर्ण करण्याचे कार्य पतपुरवठा संस्था करतात. यातूनच ग्रामीण भागातील बचतीचे भांडवलात रूपांतर होते.

५) **शासकीय योजनांमध्ये सहभाग** : केंद्र सरकार,राज्य सरकार तसेच नाबार्ड यांचेकडून कृषिक्षेत्राच्या विकासासाठी वेगवेगळ्या योजना आखल्या जातात. या योजनांच्या प्रत्यक्ष कार्यवाही मध्ये सहकारी पतपुरवठा संस्थांचा मोठा सहभाग असतो.

६) **आर्थिक सल्ला देणे** : सभासदांचे आर्थिक नुकसान होणार नाही या दृष्टीने आर्थिक कल्याण वा अधिकाधिक सुधारणा कशी होईल या अनुषंगाने सभासदांना आर्थिक मदती बरोबरच आर्थिक व्यवहारांच्या बाबतीत सल्ला देण्याचे कार्य सहकारी पतपुरवठा संस्था करते.

७) **समाज कल्याणकारी उपक्रमात सहभाग** : सहकारी पतपुरवठा संस्था त्यांच्या कार्यक्षेत्राच्या सामाजिक कल्याणाच्या दृष्टीकोनातून प्रयत्नशील असतात. ग्रामीण स्वच्छता, स्वच्छ पिण्याचे पाणी, प्रौढ साक्षरतेचा प्रसार, वृक्षारोपण, रक्तदान इत्यादी उपक्रमांना मदत करून परिसराच्या सामाजिक विकासासाठी योगदान देतात.

८) **लघु व कुटीर उद्योगांना सहाय्य** : ग्रामीण भागात स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या व्यक्तिंना लघु व कुटीर उद्योगांच्या उभारणीसाठी आवश्यक असणारे कर्ज अल्प व्याज दराने पुरविण्याचे कार्य या संस्था करतात.त्यामुळे ग्रामीण भागात लघु व कुटीरोद्योगांचा विकास होतो.

९) **सहकाराचे शिक्षण आणि प्रशिक्षण** : ग्रामीण भागात अजुनही निरक्षरता आहे. सहकारी पतपुरवठा संस्थांच्या कार्यामुळे सभासदांना सहकाराच्या तत्त्वांचे, सहकारी जीवन पद्धतीचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शिक्षण दिले जाते त्याचबरोबर व्यावहारिक शिक्षणसुद्धा दिले जाते.

१०) **कृषिआधारित व्यवसायात वाढ करणे** : कृषी उत्पादनासाठी भांडवल पुरवठा केल्यामुळे कृषी उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन साखर कारखाने, सूत गिरण्या, डाळ मिल, पोहा मिल या सारख्या कृषिआधारित व्यवसायात वाढ घडवून आणण्याचे कार्य सहकारी पतपुरवठा संस्था करतात.

११) **विपणन कार्यासंदर्भात सभासदांना मार्गदर्शन** : सहकारी पतपुरवठा संस्था सभासद शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीबाबत मदत व मार्गदर्शन करतात. तसेच शेतमालाची मागणी, पुरवठा, किंमतीतील बदल, निर्यातीची शक्यता, निर्यातीची केंद्रे, निर्यात वाढीसाठी गुणवत्ता वाढ इ.बाबत माहिती देतात.

सहकारी पतपुरवठा संस्था त्यांच्या कार्यक्षेत्राच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी महत्त्वाच्या आहेत.



**कृती–**

**१) तुमच्या परिसरातील सहकारी पतपुरवठा संस्थेला भेट देऊन संस्थेच्या कार्याची माहिती मिळवा.**

## ५.५ सारांश

ग्रामीण भागातील लहान शेतकऱ्यांना योग्य व वाजवी व्याज दराने पुरेसा कर्जपुरवठा करणारी सहकारी तत्वानुसार कार्य करणारी संस्था म्हणजे सहकारी पतपुरवठा संस्था होय.

“मर्यादित साधन सामुग्री असणाऱ्या लहान शेतकऱ्यांजवळील उपलब्ध तारण स्वीकारून आणि त्यांच्या सोयीस्कर अटींवर बँकिंग व्यवहार करणारी संस्था म्हणजे सहकारी पतपुरवठा संस्था होय.”

ग्रामीण भागातील लहान शेतकरी, शेतमजूर, लहान व्यावसायिक,कारागीर, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांना सहकारी पतपुरवठा संस्था कर्ज पुरवठा करतात. त्यामुळे सावकारांकडून केले जाणारे आर्थिक शोषण, फसवणूक यावर काही प्रमाणात पायबंद बसतो. केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विविध योजना लाभार्थी व्यक्तिपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने सहकारी पतपुरवठा संस्था महत्वपूर्ण कार्य करतात. देशातील शहरी आणि ग्रामीण भागाचा समतोल आर्थिक विकास घडवून आणण्यामध्ये सहकारी पतपुरवठा संस्थांचे महत्वाचे योगदान आहे.ग्रामीण भागाचे औद्योगीकीकरण आणि रोजगार निर्मितीच्या दृष्टीने सहकारी पतपुरवठा संस्थांचे कार्य महत्वपूर्ण आहे.

### ❑ सहकारी पतपुरवठा संस्थांची वैशिष्ट्ये

१) खुले व ऐच्छिक सभासदत्व

२) संस्थेचा उद्देश

३) संस्थेचे कार्यक्षेत्र

४) मर्यादित भांडवल

५) कृषी उत्पादन साधनांच्या खरेदीसाठी कर्जपुरवठा

६) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांशी संलग्न

७) ग्रामीण पतपुरवठा रचनेत महत्वाचे स्थान

८) तारणावर कर्जपुरवठा

९) मर्यादित कर्जपुरवठा.

### ❑ सहकारी पतपुरवठा संस्थांची कार्ये

१) ठेवी स्वीकारणे

२) कर्जपुरवठा करणे

३) कर्जाच्या वापरावर नियंत्रण व कर्ज वसुली

४) भांडवल निर्मिती

५) शासकीय योजनांमध्ये सहभाग

६) आर्थिक सल्ला देणे

७) समाजकल्याणकारी उपक्रमात सहभाग

८) लघु व कुटीरोद्योगांना सहाय्य

९) सहकाराचे शिक्षण आणि प्रशिक्षण

१०) कृषिआधारित व्यवसायात वाढ करणे

११) विपणन कार्यासंदर्भात सभासदांना मार्गदर्शन

## ५.६ महत्वाच्या संज्ञा

१) **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक –** राज्य सहकारी बँक आणि प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांना जोडणारा दुवा.

२) **राज्य सहकारी बँक / शिखर बँक –** सहकारी पतपुरवठ्याच्या रचनेतील सर्वोच्च बँक.

३) **राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (NABARD) –** राष्ट्रीय पातळीवर कृषी व ग्रामीण विकासाला कर्जपुरवठा करणारी बँक

## ५.७ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

१) प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था ----- बँकाशी संलग्न असतात.
अ) भूविकास ब) नागरी सहकारी क) जिल्हा मध्यवर्ती सहकारी

२) ब्रिटिश राजवटीमध्ये ----- साली "सहकारी पतपुरवठा संस्था कायदा" समंत झाला.
अ) १९१२ ब) १९२५ क) १९०४

३) प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांचे कार्यक्षेत्र ----- पुरते मर्यादित असते.
अ ) राज्या ब )जिल्हया क) गावा

४) पूर्वीच्या काळी ग्रामीण भागात कर्जपुरवठा करणारा ----- हा एकमेव स्रोत होता.
अ) बँक ब) सावकार क) शेतकरी

५) सहकारी पतपुरवठा संस्थांमुळे सभासदांची ------- पासून मुक्तता झाली.
अ) सावकार ब) मध्यस्थ क) व्यापारी

**ब)** **योग्य जोड्या जुळवा**

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| अ) सहकारी पतपुरवठा संस्थांचा कर्जपुरवठा | १) अनुत्पादक कार्यासाठी |
| ब) सहकारी पतपुरवठा संस्थांचे कार्यक्षेत्र | २) बचतीला प्रोत्साहन |
| क) सहकारी पतपुरवठा संस्थांचा कारभार | ३) फक्त शहरी भागात कार्य |
| ड) ठेवी स्वीकारणे | ४) उत्पादक कार्यासाठी |
| | ५) हुकूमशाही पद्धत |
| | ६) उधळपट्टीस प्रोत्साहन |
| | ७) ग्रामीण व शहरी भागात कार्य |
| | ८) लोकशाही पद्धत |

**क)** **खालील विधानांसाठी एक शब्द/शब्दसमूह लिहा.**

१) गरजू व्यक्तिंना कर्जपुरवठा करणारी सहकारी संस्था

२) दुर्बल घटकांना वाजवी व्याज दरात कर्जपुरवठा करणारी ग्रामीण भागातील सहकारी संस्था

३) सावकारांच्या फसवणूकीपासून शेतकऱ्यांना मुक्त करणारी सहकारी संस्था

४) सहकारी पतपुरवठ्याच्या रचनेतील सर्वोच्च बँक

**ड)** **खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.**

१) ग्रामीण भागात आजही शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणारा सावकार हा एकमेव स्रोत आहे.

२) सहकारी पतपुरवठा संस्था या आपल्या सभासदांना फक्त कर्जपुरवठा करतात.

३) ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासामध्ये सहकारी पतपुरवठा संस्थांना महत्त्व आहे.

४) सहकारी पतपुरवठा संस्था अमर्यादित प्रमाणात कर्जपुरवठा करतात.

**इ)** **खालील विधाने पूर्ण करा.**

१) भारतात सहकारी चळवळीची सुरुवात .............. संस्थांच्या स्थापनेद्वारे झाली.

२) सहकारी पतपुरवठ्याची रचना ............ स्तरीय आहे.

३) सहकारी पतपुरवठा संस्थांचे सभासदत्व सर्वांसाठी खुले व .......... असते.

४) शेतमजूर, लहान कारागीर, दुर्बल घटक यांची भाग खरेदी क्षमता खूपच ......... असते.

५) शिखर बँक .......... पातळीवर कार्य करते.

**(फ) अचूक पर्याय निवडा.**

| | |
|---|---|
| १) ______ | प्रत्यक्ष सभासदांशी व्यवहार |
| २) भाग खरेदी क्षमता कमी | ______ |
| ३) ______ | राज्य सहकारी बँक |
| ४) प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था व शिखर बँक यांच्यातील दुवा | ______ |
| ५) ______ | राष्ट्रीय पातळीवर कृषी कर्ज पुरवठा |

नाबार्ड,आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, शिखर बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, प्राथमिक पतपुरवठा संस्था

**ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सहकारी पतपुरवठा संस्था म्हणजे काय ?

२) सहकारी पतपुरवठ्याची त्रिस्तरीय रचना कशा प्रकारची असते ?

३) पूर्वीच्या काळी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा कोणाकडून केला जात होता ?

४) भारतात सहकारी पतपुरवठा संस्था कायदा कोणत्या वर्षी संमत झाला ?

५) सहकारी पतपुरवठा संस्था कोणत्या प्रकारच्या ठेवी स्वीकारतात ?

**ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करुन वाक्य पुन्हा लिहा.**

१) सहकारी पतपुरवठा संस्था <u>दीर्घ</u> मुदतीचा कर्जपुरवठा करतात.

२) पतपुरवठा सहकारी संस्थांची भांडवल उभारणी क्षमता <u>प्रचंड</u> असते.

३) सहकारी पतपुरवठा संस्था <u>विना तारणावर</u> कर्ज पुरवठा करतात.

**ई) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) अ) चालू ठेव  ब) बचत ठेव
   क) कर्ज  ड) मुदत ठेव

२) अ) राज्य सहकारी बँक  ब) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
   क) प्राथमिक पतपुरवठा संस्था  ड) स्टेट बँक ऑफ इंडिया

**ज) योग्य क्रम लावा.**

१) अ) प्राथमिक पतपुरवठा सहकारी संस्था  ब) राज्य सहकारी बँक
   क) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

## प्र. २ खालील संज्ञा स्पष्ट करा.

१) सहकारी पतपुरवठा संस्था

२) राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड)

## प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.

१) ''कृषी उत्पादनासाठी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणाऱ्या सहकारी पतपुरवठा संस्था महत्त्वाचे कार्य करतात''.

२) ''सहकारी पतपुरवठा संस्थांमुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे रोजगार उपलब्ध होतो''.

## प्र.४ टीपा लिहा.

१) सहकारी पतपुरवठा संस्था अर्थ व व्याख्या.

२) सहकारी पतपुरवठा संस्थेचे कार्ये

३) सहकारी पतपुरवठा संस्थेची वैशिष्ट्ये

## प्र.५ कारणे लिहा.

१) ग्रामीण पतपुरवठा रचनेमध्ये सहकारी पतपुरवठा संस्थांना महत्त्वाचे स्थान आहे.

२) सहकारी पतपुरवठा संस्थांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची मदत घ्यावी लागते.

३) लहान शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी पतपुरवठा संस्थांची गरज असते.

## प्र.६ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१) सहकारी पतपुरवठा संस्थेची वैशिष्ट्ये लिहा.

२) सहकारी पतपुरवठा संस्थेचा अर्थ व व्याख्या लिहा.

३) सहकारी पतपुरवठा संस्थेची कार्ये लिहा.

## प्र.७ दीर्घोत्तरी प्रश्न.

१) सहकारी पतपुरवठा संस्थेची व्याख्या लिहून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) सहकारी पतपुरवठा संस्थेची कार्ये स्पष्ट करा.

◆◆◆

# ६. सेवा सहकारी संस्था

(Service Co-operative Society)


६.१ प्रस्तावना

६.२ अर्थ व व्याख्या

६.३ वैशिष्ट्ये

६.४ कार्ये

६.५ सारांश

६.६ महत्वाच्या संज्ञा

६.७ स्वाध्याय


## ६.१. प्रस्तावना : (Introduction)

शेतकऱ्यांच्या आर्थिक व जीवनावश्यक गरजा भागविणे आणि शेती उत्पादन वाढविणे यासाठी विविध सेवा पुरविणाऱ्या संस्था म्हणजे सेवा सहकारी संस्था होय. सेवा सहकारी संस्थांना विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, शेतकरी सेवा सहकारी संस्था किंवा प्राथमिक सेवा सहकारी संस्था असेही म्हणतात. या संस्था सभासदांना फक्त कर्जपुरवठा न करता विविध सेवासुद्‌धा उपलब्ध करून देतात.

भारतात सेवा सहकारी संस्थांची वाटचाल सन १९५८ पासून सुरू झाली. सेवा सहकारी संस्थांचा विकास प्राथमिक पतपुरवठा सहकारी संस्था ते बहुउद्‌देशीय संस्था, बहुउद्‌देशीय संस्था ते मोठ्या आकाराच्या संस्था, मोठ्या आकाराच्या संस्था ते सेवा सहकारी संस्था या टप्प्यातून झालेला दिसून येतो.

भारतात सन १९०४ पासून प्राथमिक पतपुरवठा संस्था मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या त्या फक्त कर्जपुरवठा करणे या हेतूनेच स्थापन झालेल्या होत्या. पतपुरवठा व्यतिरिक्त इतर गरजा भागविण्याच्या दृष्टीने या संस्था असमर्थ ठरल्या. पतपुरवठा संस्थांची पुनर्रचना करून त्यांचे रुपांतर बहुउद्‌देशीय संस्थांमध्ये केले जावे असा विचार पुढे आला. सन १९४७ नंतर प्राथमिक पतपुरवठा संस्थांचे रुपांतर बहुउद्‌देशीय संस्थांमध्ये करण्यात आले.

बहुउद्‌देशीय संस्थांच्या कार्यात अनेक दोष दिसून आल्याने अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीने (१९५४) बहुउद्‌देशीय संस्थांऐवजी मोठ्या आकाराच्या संस्था स्थापन कराव्यात अशी सूचना केली. मोठ्या आकाराच्या संस्था एका खेड्यापुरत्या मर्यादित न ठेवता त्या परिसरातील इतर खेडी मिळून संस्थेची स्थापना करावी. जेणेकरून त्या अर्थक्षम होतील या विचाराने सरकारने मोठ्या आकाराच्या सहकारी संस्था स्थापनेला उत्तेजन दिले. परंतु मोठ्या आकाराच्या संस्थांऐवजी छोट्या आकाराच्या संस्था योग्य ठरतील असे मत एम. एल. डार्लिंग यांनी मांडले. सन १९५८ मध्ये राष्ट्रीय विकास महामंडळाने देखील अशाच प्रकारच्या संस्थांच्या स्थापनेवर भर दिला. वैकुंठलाल मेहता समितीनेदेखील सेवा सहकारी संस्थेची स्थापना गावपातळीवर करावी अशी सूचना केली. देशाच्या ग्रामीण विकासात सेवा सहकारी संस्थांना खूपच महत्त्व आले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आपण सेवा सहकारी संस्थेबाबत अभ्यास करणार आहोत.

## ६.२ अर्थ व व्याख्या : (Meaning and Definition)

**अर्थ –** ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या शेतीविषयक विविध प्रकारच्या गरजा असतात. उदा. शेतीला कर्जपुरवठा उपलब्ध होणे, सुधारीत बी बियाणे, खते, कीटकनाशके यांची सोय होणे त्याचबरोबर जीवनावश्यक अनेक वस्तूंचीही गरज असते. उदा. किराणा माल, कपडे, साखर, गहू, तांदूळ इ. शेतीविषयक आणि जीवनावश्यक गरजा भागविण्याच्या उद्‌देशाने ग्रामीण पातळीवर सहकारी तत्त्वावर या संस्था स्थापन झालेल्या आहेत त्यांना सेवा सहकारी संस्था असे म्हणतात.

❑ **व्याख्या :**


१) बी मुखर्जी – '' आपल्या समान गरजा भागविण्यासाठी आणि कृषी उत्पादन वाढविण्यासाठी ग्रामस्थांनी परस्पर सहाय्य आणि परस्पर सहकार्याने निर्माण केलेली सहकारी संघटना म्हणजे सेवा सहकारी संस्था होय.''

२) ''समान आर्थिक गरजांच्या पूर्ततेसाठी व शेती उत्पादन वाढविण्यासाठी शेतीपूरक वस्तू व सेवा उपलब्ध करण्याच्या उद्‌देशाने लोकांनी स्वेच्छेने स्थापन केलेली संस्था म्हणजे सेवा सहकारी संस्था होय.''

३) समाज कल्याण मंत्रालय यांनी केलेली व्याख्या– ''समान आर्थिक गरजांच्या पुर्ततेसाठी आणि कृषी उत्पादन वाढविण्यासाठी लोकांनी स्वेच्छेने परस्पर सहाय्यासाठी आणि परस्पर सहकार्यासाठी निर्माण केलेली संघटना म्हणजे सेवा सहकारी संस्था होय.''

वरील व्याख्येवरुन असे स्पष्ट होते की, प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली ही प्राथमिक संस्था होय. ग्रामीण जनतेशी या संस्थांचा प्रत्यक्ष संबंध असतो. शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी विविध सेवा या संस्था पुरवितात.

## ६.३ सेवा सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये : (Features of Service Co-operative Society)




१) **सभासदत्व :** संस्थेच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना सेवा सहकारी संस्थेचे सभासदत्व खुले व ऐच्छिक असते. साधारणपणे १००० लोकवस्तीच्या खेडयासाठी एक सेवा सहकारी संस्था स्थापन करण्याचे धोरण आहे. गावातील किंवा कार्यक्षेत्रातील कोणत्याही व्यक्तिला संस्थेचे सभासद होता येते. शेतकरी, कारागीर व लहान व्यावसायिकांना सभासदत्व दिले जाते.

२) **सभासदांची जबाबदारी :** सेवा सहकारी संस्थेतील सभासदांची जबाबदारी मर्यादित असते. संस्थेला काही कारणांमुळे आर्थिक नुकसान झाल्यास सभासदांची जबाबदारी त्यांनी खरेदी केलेल्या भागांच्या दर्शनी किंमती इतकी मर्यादित असते. सभासदाला त्याच्या खाजगी मालमत्तेतून झालेल्या नुकसानीची भरपाई करावी लागत नाही. या संस्था मर्यादित जबाबदारीच्या तत्त्वावर स्थापन झालेल्या असतात.

३) **भागाची दर्शनी किंमत :** सेवा सहकारी संस्थेच्या भागाची दर्शनी किंमत अल्प असते. साधारणत: रु १० किंमत असते. शेतकरी, कारागीर, लहान व्यावसायिक आदींना सभासद होता यावे या हेतूने भागाची किंमत अल्प ठेवली जाते.

४) **लोकशाही व्यवस्थापन :** सहकारी संस्थेचे संचालक मंडळ/कार्यकारी समिती/व्यवस्थापन समिती व्यवस्थापनाची जबाबदारी स्वीकारते. सभासदांमधून संचालक मंडळ निवडले जाते. कार्यालयीन कामकाजासाठी गटसचिवाची / सचिवाची नेमणूक केली जाते. संस्थेचे व्यवस्थापन हे लोकशाही पद्धतीने केले जाते. सर्व सभासदांची सर्वसाधारण सभा सर्वोच्च असते. या सभेतील घेतलेले निर्णय अंतिम असतात. इतर महत्त्वाचे निर्णय व संस्थेची धोरणे सर्वसाधारण सभेच्या संमतीने घेतली जातात.

५) **संस्थेची स्थापना :** सेवा सहकारी संस्थेची स्थापना इतर सहकारी संस्थेप्रमाणेच सहकारी कायद्यानुसार केली जाते. पूर्वीच अस्तित्वात असलेल्या एकउद्देशिय किंवा मोठया आकाराच्या प्राथमिक संस्थांची फेररचना करून सेवा सहकारी संस्था निर्माण करण्यात आलेल्या आहेत. एखाद्या गावाची लोकसंख्या कमी असल्यास दोन-तीन गावासाठी एक संस्था स्थापन केली जाते. काही वेळा स्वतंत्रपणे अशा संस्था स्थापन केल्या जातात.

६) **भांडवल उभारणी :** सेवा सहकारी संस्था या भांडवलाची उभारणी पुढील मार्गाने करतात. भागांची विक्री, ठेवी स्वीकारणे, सभासद प्रवेश फी, राखीव निधी, देणग्या व अनुदान, राज्यसरकार, व्यापारी बँका, ग्रामीण विकासासाठी कार्य करणाऱ्या वित्तीय संस्थांकडून भांडवल उभारणी केली जाते.

७) **जीवनावश्यक वस्तूंचे वितरण :** सेवा सहकारी संस्थेमार्फत सभासदांना जीवनावश्यक वस्तू उदा. धान्य, साबण इ. वस्तू सवलतीच्या दरात उपलब्ध करून देतात. तसेच आधुनिक काळात या संस्था ग्रामीण भागात विविध वस्तू भांडार म्हणून कार्य करतात. सभासदांना सवलतीच्या दराने अशा वस्तू मिळाल्यामुळे बचत वाढून जीवनमान उंचावण्यास मदत होते.

८) **मार्गदर्शन व सल्ला :** सेवा सहकारी संस्था सभासदांना कृषी उत्पादन, शेती जोडधंदा/उद्योग अशा बाबतीत सल्ला देण्याचे कार्य करतात. शेतीसाठी वापरावे लागणारे आधुनिक तंत्रज्ञान, खते, कीटकनाशके यांच्या वापरासाठी, देखभाल व दुरुस्तीसाठी माहिती व मार्गदर्शन या संस्था करतात.

९) **शेतीविषयक सेवा पुरविणे :** सेवा सहकारी संस्था शेतकऱ्यांना शेतीविषयक सेवा उपलब्ध करून देण्याचे कार्य करतात. उदा. खते, बी-बियाणे, कीटकनाशके, पशुखाद्य पुरविण्याचे कार्य संस्था करतात. तसेच गोदामांच्या सोयी पुरविणे, शेतमालाच्या विपणनाची व्यवस्था करणे, तांत्रिक मार्गदर्शन करणे यासारख्या सेवा या संस्था पुरवितात.


१०) **आधुनिक तंत्राचा वापर :** शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी सेवा सहकारी संस्था आपल्या सभासद शेतकऱ्यांना नवनवीन संशोधनाची माहिती पुरवितात. तसेच नवीन यंत्रसामुग्री व तंत्रज्ञान त्यांना उपलब्ध करून देतात. शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी यंत्रसामुग्री भाडे तत्त्वावर उपलब्ध करून देतात. शेतीची उत्पादकता वाढविणे हा उद्देश यामागे असतो.



**कृती–**

१) **आपल्या परिसरातील सेवा सहकारी संस्थेला भेट देऊन संस्थेच्या कामकाजाची माहिती मिळवा.**

## ६.४ सेवा सहकारी संस्थेची कार्ये – (Functions of Service Co-operative Society)




१) **कर्जपुरवठा करणे :** सेवा सहकारी संस्था शेतकरी व लहान व्यावसायिकांना त्यांच्या व्यावसायिक विकासासाठी आवश्यक असणारा अल्प व मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा करतात. सभासद शेतकऱ्यांना पिकांच्या तारणावर कर्ज पुरवठा करणे, रोख रक्कम देण्याऐवजी बी-बियाणे, खते, जंतुनाशके इत्यादी वस्तूंचा पुरवठा केला जातो. त्याचबरोबर शेतमालावर उचल रकमा या संस्था देतात.

२) **शेतीची साधने पुरविणे :** शेतकऱ्यांना शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी आवश्यक असणारी सुधारित बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, सुधारीत अवजारे व अन्य पूरक साधने सवलतीच्या दराने उपलब्ध करून देतात. याशिवाय यांत्रिक अवजारे भाडे तत्त्वावर उपलब्ध करून देतात आणि यांत्रिक अवजारांची दुरुस्ती व देखभाल करतात.

३) **जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा :** लहान गावांमध्ये शासन पुरस्कृत स्वस्त धान्यांची दुकाने चालविण्याची जबाबदारी सेवा सहकारी संस्थांकडे सोपविली जाते.त्यांच्याव्दारे सभासदांना जीवनावश्यक वस्तूंचा सवलतीच्या दराने पुरवठा करण्यात येतो. अशा सेवा पुरवल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीची कामे वेळेवर पार पाडता येतात. आणि शेती व्यवसायाकडे लक्ष देता येते.

४) **ग्रामीण विकासाला चालना :** सेवा सहकारी संस्था शेतकऱ्यांच्या शेती व्यवसायाच्या वाढीसाठी साहाय्य करतात. त्यांना लागणारा कच्चा माल व अवजारे उपलब्ध करून देतात. तसेच नवीन तंत्रज्ञानाची माहिती उपलब्ध करून देऊन त्यांच्या व्यवसायाची उत्पादकता व कार्यक्षमता वाढविण्यास साहाय्य करतात. याशिवाय ग्रामीण भागातील इतर कारागिरांना कच्च्या मालाचा पुरवठा करून, ग्रामीण विकासाला चालना दिली जाते. त्यातून रोजगार निर्मिती होते.

५) **कर्जवसुली करणे :** सेवा सहकारी संस्था सभासदांना दिल्या जाणाऱ्या कर्जावर लक्ष ठेवून असतात. दिलेल्या कर्जाचा वापर सभासद शेतकरी कशा पद्धतीने करतात यावर लक्ष दिले जाते. उत्पादक कार्यासाठी कर्जाचा वापर व्हावा यासाठी संस्थेकडून कर्जाच्या वापरावर नियंत्रण ठेवले जाते. तसेच कर्जाची वसुली योग्य पद्धतीने करण्यासाठी प्रयत्न केले जातात. शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाच्या रकमा त्यांनी अनुत्पादक कामासाठी वापरू नये यासाठी सेवा सहकारी संस्था विशेष प्रयत्न करतात.

६) **सभासदांची बचत वाढविणे :** सभासदांना दिलेले कर्ज शेती उत्पादन वाढविण्यासाठी दिले जाते. ग्रामीण भागात व्यवसाय करणारे शेतकरी, व्यावसायिक यांना काटकसरीची सवय लावून त्यांची बचत वाढविली जाते. यातून संस्थेलाही ठेवी जमा होण्यास मदत होते. परिणामी शेती उत्पादनात वाढ होऊन सभासदांचे व्यक्तिगत उत्पन्न वाढते.

७) **शेती विकासाचे कार्यक्रम व इतर योजना राबविणे :** सेवा सहकारी संस्थेच्या वतीने ग्रामीण भागात शेती व्यवसायाचा विकास घडवून आणण्यासाठी, शेती विकासाचे विविध कार्यक्रम राबविले जातात. उदा. पडीक जमीन सुधारणे, सामुदायिकरित्या जमीन लागवडीखाली आणणे, सुधारीत बी-बियाणे,उत्पादनात वाढ करणे, कंपोस्ट खत निर्माण करणे इ. विविध कार्यक्रम राबवून शेतीचा विकास करता येतो.

८) **प्राथमिक खरेदी विक्री संघाचा प्रतिनिधी म्हणून कार्य :** प्राथमिक सहकारी संस्थेचा प्रतिनिधी म्हणून सेवा सहकारी संस्था अनेक प्रकारची कार्य करतात. उदा. मालाचे एकत्रीकरण करणे, प्रतवारी, साठवणूक करणे इ. कार्ये या संस्था करीत असतात.

९) **छोट्या उद्योगांना चालना :** ग्रामीण विकासाशी संबंधित छोट्या उद्योगांना चालना देण्याचे कार्य ही संस्था करते. दुग्ध व्यवसाय, शेळी मेंढी पालन, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग यासारख्या छोट्या उद्योगांना कर्जपुरवठा केला जातो. या उद्योगांना चालना मिळाल्याने ग्रामीण भागातील लोकांचे शेतीवरील अवलंबित्व कमी होते व रोजगारात वाढ होते.

१०) **बाजारातील गैरव्यवहारांना आळा घालणे :** शेतमालासाठी चांगल्या किंमती मिळवून देऊन त्याद्वारे सभासदांची उत्पादन क्षमता वाढविण्याचे कार्य या संस्था करतात. शेतकरी सभासदांचा माल एकत्र करून सेवा सहकारी संस्थेमार्फत विकला जातो. परिणामी बाजारातील दलाल व मध्यस्थांची साखळी नष्ट होते. त्यांच्याकडून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक थांबते आणि बाजारातील गैरव्यवहारांना आळा बसतो.



कृती–

**२) सेवा सहकारी संस्था ग्रामीण विकासात कशा उपयुक्त ठरतात याबाबत आपल्या शिक्षकांशी चर्चा करा.**

**फरक : सेवा सहकारी संस्था व सहकारी पतपुरवठा संस्था**

| अ.क्र. | मुद्दे | सेवा सहकारी संस्था | सहकारी पतपुरवठा संस्था |
|---|---|---|---|
| १ | अर्थ | ग्रामीण भागात शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या शेती उत्पादन वाढीसाठी शेतीपूरक वस्तू व सेवांचा पुरवठा करण्यासाठी स्थापन झालेली संस्था म्हणजे सेवा सहकारी संस्था होय. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तिंकडून तारण स्वीकारून त्यांना कर्जपुरवठा करणारी संस्था म्हणजे सहकारी पतपुरवठा संस्था होय. |
| २ | स्थापना | ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी स्थापन झालेली असते. | ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कारागिरांना कर्जपुरवठा करण्यासाठी स्थापन झालेली असते. |
| ३ | सभासदत्व | संस्थेच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी सभासद असतात. | संस्थेच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी, शेतमजूर, लघुउद्योजक, कारागीर सभासद असतात. |
| ४) | उद्देश | शेतकरी व सभासदांना विविध सेवा पुरविणे. | सभासदांना वाजवी व्याजदराने कर्जपुरवठा करणे. |
| ५) | कार्यक्षेत्र | सेवा सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र एक किंवा दोन गावापुरते मर्यादित असते. | सहकारी पतपुरवठा संस्थेचे कार्यक्षेत्र गावपातळी अथवा चार ते पाच कि.मी. परिसरात येणाऱ्या गावापुरते मर्यादित असते. |
| ६) | कार्ये | शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणे, सुधारीत बी-बियाणे, खते कीटकनाशके व जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा इ. कार्ये करतात. | कर्जपुरवठा करणे, ठेवी स्वीकारणे, कर्जाच्या वापरावर नियंत्रण इ. कार्ये करतात. |

## ६.५ सारांश

**सेवा सहकारी संस्था –** जीवनावश्यक व शेतीविषयक गरजा भागविण्याच्या उद्देशाने ग्रामीण पातळीवर सहकारी तत्वानुसार ज्या संस्था स्थापन झालेल्या असतात त्यांना सेवा सहकारी संस्था असे म्हणतात.

- **सेवा सहकारी संस्थेची वैशिष्टये**

१) सभासदत्व
२) सभासदाची जबाबदारी
३) भागाची दर्शनी किंमत
४) लोकशाही व्यवस्थापन
५) संस्थेची स्थापना
६) भांडवल उभारणी
७) जीवनावश्यक वस्तूंचे वितरण

८) मार्गदर्शन व सल्ला
९) शेतीविषयक सेवा पुरविणे
१०) आधुनिक तंत्राचा वापर

### ❑ सेवा सहकारी संस्थेची कार्ये

१) कर्जपुरवठा करणे
२) शेतीची साधने पुरविणे
३) जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा
४) ग्रामीण विकासाला चालना
५) कर्जवसुली करणे
६) सभासदांची बचत वाढविणे
७) शेती विकासाचे कार्यक्रम व इतर योजना राबविणे
८) प्राथमिक खरेदी विक्री संघाचा प्रतिनिधी म्हणून कार्य
९) छोट्या उद्योगांना चालना
१०) बाजारातील गैरव्यवहारांना आळा घालणे

## ६.६ महत्त्वाच्या संज्ञा

१) **व्यवस्थापन समिती –** सभासदांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचा समूह.
२) **भाग भांडवल –** भागांची विक्री करून जमा झालेली रक्कम.
३) **अल्प मुदतीचे कर्ज –** ३ ते १५ महिने मुदतीसाठी दिले जाणारे कर्ज.
४) **मध्यम मुदतीचे कर्ज –** १ ते ५ वर्षे मुदतीसाठी दिले जाणारे कर्ज.
५) **भाग –** सहकारी संस्थेच्या एकूण भांडवलातील लहान हिस्सा किंवा अंश.

## ६.७ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

१) सेवा सहकारी संस्थेचे व्यवस्थापन ----- पद्धतीने चालते.
अ) लोकशाही ब) हुकूमशाही क) भांडवलशाही

२) सेवा सहकारी संस्था ----- पातळीवर कार्य करतात.
अ) जिल्हा ब) गाव क) तालुका

३) ज्या गावाची लोकसंख्या किमान ----- आहे त्या गावात एक सेवा सहकारी संस्था असावी.
अ) ५०० ब) १००० क) २०००

४) भारतात सेवा सहकारी संस्थेची वाटचाल .........साली सुरू झाली.

अ) १९५८ ब) १९६० क) १९६२

५) सेवा सहकारी संस्थेतील सभासदांची जबाबदारी .......असते.

अ) मर्यादित ब) अमर्यादित क) सामुदायिक

## ब) योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| अ) सेवा सहकारी संस्था | १) औद्योगिक सेवा पुरविणे. |
| ब) शेती उत्पादकतेत वाढ | २) जुनाट तंत्राचा वापर |
| क) सेवा सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र | ३) शेती विषयक सेवा पुरविणे |
| | ४) गाव पातळी |
| | ५) जिल्हा पातळी |
| | ६) आधुनिक तंत्राचा वापर |

## क) खालील विधानांसाठी एक शब्द / शब्दसमूह लिहा.

१) सभासदांना सेवा पुरविण्यासाठी स्थापन झालेली संस्था

२) सेवा सहकारी संस्थांचा कारभार ज्या तत्वानुसार चालतो ते तत्त्व

३) सेवा सहकारी संस्था सभासदांना या मुदतीचा कर्जपुरवठा करतात

४) सेवा सहकारी संस्था सभासदांना या वस्तूंचा पुरवठा करतात

## ड) खालील विधाने चूक किंवा बरोबर ते लिहा.

१) सेवा सहकारी संस्था दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करतात.

२) सेवा सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र गावपातळीवर असते.

३) जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे हे सेवा सहकारी संस्थेचे कार्य असते.

४) सेवा सहकारी संस्थेमुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत.

## इ) खालील विधाने पूर्ण करा.

१) सेवा सहकारी संस्था .......... पातळीवर कार्य करतात.

२) शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी .......... तंत्राचा वापर केला जातो.

३) सेवा सहकारी संस्थेमुळे बाजारातील .......... ला आळा बसतो.

४) सेवा सहकारी संस्थेतील सभासदांची जबाबदारी ............. असते.

५) सेवा सहकारी संस्था सभासदांना जीवनावश्यक वस्तू ........... दरात उपलब्ध करून देतात.

**(फ) अचूक पर्याय निवडा.**

| | |
|---|---|
| १) गावपातळीवर स्थापना | |
| २) | सेवा सहकारी संस्थांची वाटचाल |
| ३) सभासदांची जबाबदारी | |

मर्यादित, सेवा सहकारी संस्था, १९५८

**ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सेवा सहकारी संस्था म्हणजे काय?

२) सेवा सहकारी संस्थेचे भांडवल उभारणीचे मार्ग कोणते?

३) सेवा सहकारी संस्थेची व्यवस्थापन पद्धती कोणती?

४) सेवा सहकारी संस्था शेतीविषयक कोणत्या सेवा पुरविते?

५) सेवा सहकारी संस्थेचे सभासदत्व कोणत्या व्यक्तिंना दिले जाते?

**ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) सेवा सहकारी संस्था दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करतात.

२) सेवा सहकारी संस्था जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा जास्त किंमतीला करतात.

३) सेवा सहकारी संस्थेची स्थापना राज्य पातळीवर केली जाते.

**प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.**

१) सेवा सहकारी संस्था

२) भागभांडवल

३) अल्प मुदतीचे कर्ज

**प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.**

१) सेवा सहकारी संस्थेमुळे रोजगारात वाढ झाली आहे.

२) सेवा सहकारी संस्थेमुळे शेती क्षेत्रात आधुनिक तंत्राचा वापर वाढला आहे.

**प्र.४ फरक स्पष्ट करा.**

१) पतपुरवठा सहकारी संस्था व सेवा सहकारी संस्था

**प्र.५ टीपा लिहा.**

१) सेवा सहकारी संस्था

२) सेवा सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये

**प्र.६ कारणे द्या.**

१) सेवा सहकारी संस्थांमुळे शेतीची उत्पादकता वाढते.

**प्र.७ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) सेवा सहकारी संस्थेचा अर्थ व व्याख्या लिहा.

२) सेवा सहकारी संस्थेची कार्ये लिहा.

**प्र.८ दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) सेवा सहकारी संस्थेची व्याख्या सांगून सेवा सहकारी संस्थेची कार्ये स्पष्ट करा.

२) सेवा सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

◆◆◆

# ७. प्रक्रिया सहकारी संस्था

## (Processing Co-operative Society)


| | |
|---|---|
| ७.१ प्रस्तावना | ७.५ सहकारी प्रक्रिया उद्योग |
| ७.२ अर्थ व व्याख्या | ७.६ सारांश |
| ७.३ वैशिष्ट्ये | ७.७ महत्वाच्या संज्ञा |
| ७.४ कार्ये | ७.८ स्वाध्याय |


### ७.१ प्रस्तावना : (Introduction)

भारत हा कृषी प्रधान देश असल्यामुळे कृषी क्षेत्राच्या विकासावर आर्थिक विकास अवलंबून असतो. त्या दृष्टीने शेतमालाला योग्य किंमत व बाजारपेठ मिळवून देणे ही महत्त्वाची बाब आहे. शेतमाल मूळ स्वरूपात विकल्यास त्यास योग्य किंमत मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्याला अपेक्षेप्रमाणे आर्थिक फायदा होत नसल्याने दलाल, व्यापारी व व्यावसायिक शेतमालाची खरेदी व त्यावर प्रक्रिया करून तो माल जास्त किंमतीला विकून भरपूर फायदा मिळवित होते. उपभोक्ता व शेतकरी या दोघांचीही पिळवणूक व फसवणूक होत असल्याचे दिसून आले. ही परिस्थिती बदलण्याच्या प्रेरणेतून सहकारी प्रक्रिया संस्थांचा उगम झाला.

### ७.२ प्रक्रिया संस्थेचा अर्थ व व्याख्या : (Meaning and Definition)

#### अर्थ

शेतीमध्ये उत्पादित केलेला सर्वच माल ग्राहकांना लगेच उपयोगात आणता येत नाही. काही शेतमालावर तो माल ग्राहकांच्या हाती पडण्यापूर्वी विशिष्ट प्रक्रिया करणे आवश्यक असते. उदा.ऊसापासून गुळ व साखर बनविणे, कापूस पिंजून त्याचे गठ्ठे बनविणे, कापसापासून सूत तयार करून नंतर कापड तयार करणे, तेल बियांपासून खाद्यतेल निर्मिती करणे, फळांचे रस काढणे, खोबऱ्यापासून तेल काढणे, चहा, कॉफी इ.वर प्रक्रिया करून त्या ग्राहकांना उपभोग्य बनविण्याचे कार्य सहकारी प्रक्रिया संस्था करतात.

#### व्याख्या

१) **''ग्राहकांना अंतिम समाधान देण्याच्या दृष्टीने अन्नधान्य व इतर व्यापारी पिकांवर आवश्यक त्या प्रक्रिया करून ते ग्राहकांच्या उपयोगात आणण्याच्या उद्देशाने सहकारी तत्त्वावर स्थापन झालेल्या संस्थांना प्रक्रिया सहकारी संस्था म्हणतात.''**

२) **महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६०–''मालावर प्रक्रिया करणे हा ज्या संस्थेचा मुख्य उद्देश असतो ती संस्था म्हणजे प्रक्रिया सहकारी संस्था होय.''**

## ७.३ प्रक्रिया संस्थेची वैशिष्ट्ये : ( Features of Processing Co-operative Society)




१) **ऐच्छिक संघटन :** सहकारी प्रक्रिया संस्था ही शेतकरी सभासदांनी स्वेच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेली संस्था आहे. सभासदत्व स्वीकारणे किंवा त्याचा त्याग करणे हा निर्णय शेतकरी स्वत:च्या इच्छेनुसार घेत असतात. त्याबाबत त्यांच्यावर कोणतीही सक्ती केली जात नाही.

२) **भांडवल उभारणी :** प्रक्रिया सहकारी संस्थेच्या भांडवलाची उभारणी परिसरातील शेतमाल उत्पादक व शेतकऱ्यांना भागांच्या विक्रीव्दारे करण्यात येते. भाग भांडवल उभारणीत राज्य शासनाचा सहभाग असतो. राज्य शासनाच्या हमीवर सहकारी बँका भांडवली खर्चाच्या उभारणीसाठी दीर्घकालीन कर्ज उपलब्ध करून देतात.

३) **लोकशाही व्यवस्थापन :** सहकारी प्रक्रिया संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीने करण्यात येतो. दैनंदिन व्यवस्थापनासाठी सभासद संचालक मंडळाची/व्यवस्थापन समितीची निवड करतात. संस्थेच्या व्यवहारासंबंधीचे सर्व निर्णय सभासदांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत घेतले जातात.

४) **जोड व्यवसायांचा विकास :** सहकारी प्रक्रिया उद्योग आपल्या सभासदांना शेतीशी संलग्न व्यवसाय हाती घेण्यास प्रोत्साहन देतात. त्यासाठी लागणारे भांडवल संस्था उपलब्ध करून देते. त्यामुळे प्रक्रिया संस्थांच्या कार्यक्षेत्रात दुग्ध व्यवसाय, भाजीपाला लागवड, कुक्कुटपालन इ. जोड व्यवसाय विकसित होतात. त्यामुळे ग्रामीण भागात रोजगाराची संधी उपलब्ध होते आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर पडते व शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावते.

५) **प्रक्रिया क्षेत्राचा विकास :** शेतमालाची शेतकऱ्यांच्या उत्पादन स्थळापासून प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतूक करण्यासाठी वाहतूकीची सुविधा संस्थेमार्फत उपलब्ध करून दिली जाते. कार्यक्षम वाहतुकीसाठी पक्के रस्ते, वीज, पाणी, टपाल कार्यालये, शाळा, दवाखाने अशा अनुषंगिक सेवा प्रक्रिया संस्था ज्या क्षेत्रात कार्य करतात त्या ठिकाणी उपलब्ध करून देतात. त्यामुळे सहकारी प्रक्रिया संस्थांच्या कार्यक्षेत्राचा विकास होतो.

६) **शेतमाल उत्पादन परिसरात स्थापना :** शेतमाल उत्पादित केल्यानंतर त्याची वाहतूक करणे, साठवणूक करणे अशी महत्वाची कार्ये संस्थेलाच करावी लागतात. त्यामुळे प्रक्रिया संस्थांची स्थापना उत्पादन परिसरातच केली जाते. प्रक्रिया करण्यासाठी आसपासच्या परिसरातून कच्चा शेतमाल मिळविणे, मालाचे एकत्रीकरण करणे सुलभ होते. उत्पादित मालाच्या प्रक्रियेसाठी लागणारा वेळ व वाहतूक खर्च यांची बचत होते. उदा. ऊस उत्पादक क्षेत्रामध्ये सहकारी साखर कारखाने स्थापन केले जातात.

७) **सहकार प्रशिक्षण व मार्गदर्शन :** शेतकरी वर्गाचे सर्व दृष्टीने कल्याण व्हावे यासाठी प्रक्रिया सहकारी संस्था प्रयत्नशील असतात. त्यासाठी संस्थेमार्फत सभासदांना शासकीय योजना, उद्योग विकास प्रशिक्षण, मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठ मिळविणे, नवीन तंत्राचा वापर इ. बाबतीत शिक्षण, प्रशिक्षण व मार्गदर्शन केले जाते. असे सहकार प्रशिक्षण व मार्गदर्शन सभासदांना अत्यंत उपयुक्त ठरते.

८) **उत्पादक सभासदांना सेवा सुविधा :** प्रक्रिया संस्थेच्या स्थापनेसाठी लागणारे भांडवल उत्पादक सभासदांकडून गोळा करण्यात येते. नाशवंत शेतमालावर प्रक्रिया करण्यात आल्याने त्यांचे मूल्य संवर्धन होत असते. उत्पादित मालाच्या विक्रीसाठी उत्पादन आणि बाजारपेठेची सांगड घातली जाते. उत्पादक शेतकऱ्यांना शेतमालाच्या उत्पादनासाठी मार्गदर्शन व मालाच्या तारणावर कर्ज उपलब्ध करून देते. त्यामुळे शेतीच्या विकासाला चालना मिळते.

९) **ग्रामीण औद्योगिकीकरणास चालना :** ग्रामीण भागात स्थानिक पातळीवर सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, तेलबिया प्रक्रिया उद्योग इ.स्थापन करण्यात आल्याने ग्रामीण औद्योगिकीकरणास चालना मिळते. शासनाने सहकारी तत्वावर कार्य करणाऱ्या प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन दिले आहे. ग्रामीण भागाचे औद्योगिकीकरण झाल्याने अतिरिक्त श्रमशक्ती या उद्योगात सामावून घेता येते. त्यामुळे ग्रामीण दारिद्र्य व बेरोजगाराची तीव्रता कमी करण्यास साहाय्य होते.

१०) **रोजगाराच्या संधी :** शेतमालावर प्रक्रिया केल्यानंतर अनुषंगिक कार्ये करावी लागतात. उदा. प्रमाणीकरण, प्रतवारी, मालाची साठवणूक, वाहतूक, विक्री व्यवस्था इ.कार्य पूर्ण करण्यासाठी मोठया प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता असते. परिणामी बेरोजगारांना रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होतात.

११) **मध्यस्थांचे उच्चाटन :** सहकारी प्रक्रिया संस्थाना लागणाऱ्या कच्च्या मालाची खरेदी थेट उत्पादक शेतकऱ्यांकडून करतात. तसेच उत्पादित मालाची प्रत्यक्ष विक्री बाजारपेठेत करतात. त्यामुळे या व्यवहारात मध्यस्थांचा सहभाग नसतो. मालाच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारात मध्यस्थांचे उच्चाटन झाल्याने उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक व पिळवणूक थांबते. ग्राहकांना चांगल्या दर्जाच्या उत्पादित वस्तू रास्त दराने मिळतात.



**कृती–**

**१) तुमच्या परिसरातील प्रक्रिया कराव्या लागणाऱ्या शेती उत्पादनांची यादी तयार करा.**

## ७.४ प्रक्रिया सहकारी संस्थेची कार्ये : (Functions of Processing Co-operative Society)

१) **शेतमालाचे एकत्रीकरण :** सहकारी प्रक्रिया उद्योग विशिष्ट प्रकारच्या शेतमालावर प्रक्रिया करण्याचे कार्य करतात. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाचे उत्पादन उत्पादक सभासद करतात. त्यांच्या मार्फत उत्पादित मालाचे एकत्रीकरण किंवा संकलन करणे आणि त्याची उत्पादन केंद्रापर्यंत वाहतूक करणे ही कार्ये संस्था करते.

२) **शेतमालावर प्रक्रिया करणे :** सहकारी प्रक्रिया संस्थेचे मुख्य कार्य म्हणजे विशिष्ट प्रकारच्या शेतमालावर प्रक्रिया करणे आणि विशिष्ट गुणवत्ता असणाऱ्या मालाचे उत्पादन करणे हे असते. त्यामुळे मालाच्या गुणवत्तेत वाढ होते. परिणामी उत्पादित मालास चांगला भाव मिळतो आणि ग्राहकांना चांगला माल रास्त दरात उपलब्ध होतो.




३) **उत्पादित मालाची विक्री :** प्रक्रिया संस्थेव्दारे उत्पादित मालाची विक्री करण्यासाठी मालाचे प्रमाणीकरण, प्रतवारी, साठवण आणि वाहतुकीची व्यवस्था करणे, खुल्या बाजारपेठेत उत्पादित मालाची विक्री करणे अशी महत्वाची जबाबदारी संस्था पार पाडते. त्यामुळे सभासदांची माल विक्रीच्या अडचणीतून मुक्तता होऊन त्यांच्या उत्पादित मालास योग्य किंमत मिळते.

४) **शिक्षणाच्या सोयी :** सहकारी प्रक्रिया संस्थेच्या कार्यक्षेत्रात शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक शिक्षण, तंत्र शिक्षण संस्थांची स्थापना करून त्या भागातील जनतेस तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाच्या सोयी संस्थेमार्फत उपलब्ध करून दिल्या जातात. व्यावसायिक कौशल्य असणारे मनुष्यबळ प्रक्रिया उद्योगास स्थानिक पातळीवर उपलब्ध करून दिले जाते. त्या भागातील जनतेस रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर सामाजिक विकासाला हातभार लागतो.

५) **पीक संरक्षणाबाबत मार्गदर्शन :** प्रक्रिया संस्थेचे कार्य हे शेतीमालाच्या उत्पादनावर अवलंबून असते. पिकांचे वेगवेगळ्या कारणाने होणाऱ्या नुकसानीपासून संरक्षण कसे करावे, पिकांना कीड लागू नये, उत्पादकतेवर परिणाम होऊ नये तसेच पिकांच्या लागवडी बाबतही सभासदांना संस्थांकडून मार्गदर्शन केले जाते.

६) **बी-बियाणे,खते पुरविणे :** शेती उत्पादनांची गुणवत्ता व उपयोगिता वाढविण्यासाठी, अधिक पीक येण्यासाठी उत्तम प्रतीचे बी-बियाणे व रासायनिक खते इ.वस्तूंचा पुरवठा कमी किंमतीत सभासदांना पुरविण्याचे कार्य प्रक्रिया संस्थेमार्फत केले जाते.

७) **उप-उत्पादनाच्या विकासाला चालना :** सहकारी प्रक्रिया संस्थेमुळे उप-उत्पादनाच्या विकासाला चालना मिळते. उदा. कापसावर प्रक्रिया करून सरकीपासून खाद्यतेल, मळीपासून अल्कोहोल निर्मिती, ऊसाच्या चिपाडापासून कागद निर्मिती केली जाते.

८) **शेतमालाच्या उत्पादनासाठी कर्जपुरवठा :** शेतमालाच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या पैशाची गरज संस्थेमार्फत सोडविली जाते. शेतमालाच्या तारणावर किंवा मालाच्या विक्रीमधून कर्ज वसूली केली जात असल्यामुळे उत्पादकांना कर्ज फेडीची चिंता राहत नाही व कर्ज मिळविण्यासाठी सावकारांवर अवलंबून राहावे लागत नाही. असे महत्त्वाचे कार्य प्रक्रिया संस्था करतात.

९) **उत्पादन वाढीसाठी विकास योजना तयार करणे :** सहकारी प्रक्रिया संस्थेचे मुख्य कार्य म्हणजे उत्पादन वाढीसाठी अनेक योजना निर्माण करणे असते. या संस्थांचे यश कच्च्या मालाच्या म्हणजेच शेती मालाच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. अधिक प्रमाणात कच्चा माल उपलब्ध होण्यासाठी तसेच उत्पादन वाढीसाठी प्रक्रिया क्षेत्रात विकासाच्या योजना हाती घेतल्या जातात व त्या योजनांच्या अंमलबजावणीकडे अधिक लक्ष दिले जाते.

१०) **मार्गदर्शन व प्रशिक्षण :** शेतमालाचे नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करणे तसेच पिकांच्या वाढीसाठी प्रयत्न करणे, त्यांना मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्याचे काम सहकारी प्रक्रिया संस्था करतात. त्यामुळे सभासद शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान समजते. बाजारपेठेतील स्पर्धेत टिकून राहणे, मालाला योग्य किंमत मिळवून देणे, ग्राहकांना उत्तम प्रतीचा माल योग्य किंमतीत पुरविणे यासाठी प्रक्रिया संस्था प्रयत्न करते. सभासद शेतकऱ्यांना चांगले मार्गदर्शन मिळाल्यामुळे सभासदांचा आर्थिक आणि सामाजिक विकास होतो.

## ७.५ सहकारी प्रक्रिया उद्योग :

शेतमालावर प्रक्रिया करून त्याचे पक्क्या मालात रूपांतर करणाऱ्या व सहकार तत्त्वावर कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांना सहकारी प्रक्रिया संस्था असे म्हणतात. उदा. ऊसापासून साखर बनविणे, कापसापासून गासड्या व सूत बनविणे, तेलबियांपासून खाद्यतेल निर्मिती इत्यादी. शेतीमालावर प्रक्रिया करून विक्री केल्यास त्याचा शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळतो म्हणून सहकारी प्रक्रिया संस्थांची स्थापना करणे अत्यंत गरजेचे आहे.

भारतात सन १९१७ मध्ये म्हैसूर राज्यात पहिली कापूस पिंजणी संस्था स्थापन करण्यात आली. सन १९२१ मध्ये तशाच प्रकारची संस्था गुजरात राज्यात स्थापन झाली. भारतामध्ये सन १९५१ मध्ये पहिली सूत गिरणी सुरू करण्यात आली. त्यानंतरच्या काळात वेगवेगळ्या प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या.

अ) **सहकारी साखर कारखाने :** सहकारी साखर उद्योग हा प्रक्रिया उद्योगातील एक महत्वाचा सहकारी प्रक्रिया उद्योग आहे. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी फार मोठया प्रमाणावर मदत केली आहे. भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना रावबहाददूर स्व. सी. व्ही. एस. नरसिंह राजू यांनी सन १९३३ मध्ये आंध्र प्रदेशातील 'इटिकोपक्का' येथे स्थापन केला. त्यावेळी त्याची गाळप क्षमता ७५ टन ऊस प्रति दिन एवढी होती. हा कारखाना आजही चांगल्या स्थितीत आहे. महाराष्ट्रात पहिला सहकारी साखर कारखाना अहमदनगर जिल्हयातील प्रवरानगर येथे सन १९५१ मध्ये पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या प्रयत्नाने सुरू झाला. आधुनिक प्रगत तंत्रज्ञानाच्या आधारे उभारलेला हा कारखाना आहे. भारतातील ३१६ साखर कारखान्यांपैकी १२२ सहकारी साखर कारखाने महाराष्ट्रात आहेत. या सहकारी प्रक्रिया उद्योगाचे भागधारक सभासद हे कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी असतात. तसेच प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांनाही सभासदत्व दिले जाते. भांडवल उभारणीत राज्य सरकारचा सहभाग असतो. या उद्योगात ऊसावर प्रक्रिया करून साखरेची निर्मिती केली जाते. साखर उत्पादनाबरोबरच साखर कारखान्यांनी उप उत्पादन निर्मिती प्रकल्प सुरू केलेले आहेत. उदा. मळी प्रकल्प, गॅस अल्कोहल निर्मिती, सहवीज निर्मिती प्रकल्प, इथेनॉल इंधन निर्मिती, पेपर पार्टिकल बोर्ड इ. ज्या ठिकाणी ऊसापासून साखर निर्माण करण्याच्या सोयी नसतात त्या ठिकाणी ऊसावर प्रक्रिया करून गूळ तयार केला जातो. गुळाला सुद्धा चांगली मागणी असते. त्यामुळे सहकारी पद्धतीने गूळ तयार करण्याचा उद्योग हाती घेता येतो. सहकारी साखर कारखान्यांचा मुख्य उद्देश सहकारी तत्त्वावर ऊसापासून साखर तयार करणे व उप उत्पादनासाठी कार्यशाळा स्थापन

करून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारणे हा आहे. सहकारी साखर कारखान्यांचे व्यवस्थापन संचालक मंडळाद्वारे लोकशाही पद्धतीने केले जाते. साखर कारखान्यांना शासन भाग भांडवलाच्या स्वरूपात भांडवल पुरविते. औद्योगिक आर्थिक विकास महामंडळ योजनेच्या खर्चाच्या ६० टक्के दीर्घमुदतीचे कर्ज देते. केंद्र व राज्य सरकार ५०-५० टक्के कर्जाला हमी देते. महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त सहकारी साखर कारखाने आहेत.



सहकारी साखर कारखाना



गूळ उत्पादन



कृती–

२) नजीकच्या सहकारी साखर कारखान्यास भेट देऊन कारखान्याच्या कामकाजाची माहिती गोळा करा.

ब) **सहकारी सूत गिरण्या –** कापूस या नगदी पिकावर प्रक्रिया करून कापडाच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या सूताचे उत्पादन करणारी सहकारी प्रक्रिया संस्था म्हणजे सहकारी सूत गिरणी होय. सहकारी सूत गिरणी सहकारी प्रक्रिया संस्थामध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहेत. सहकारी चळवळीमध्ये साखर कारखान्यांइतकेच त्यांचे स्थान महत्त्वाचे असते. भारतात पहिली सूत गिरणी सन १९५१ मध्ये सुरू झाली. नियोजन काळात सूत गिरण्यांची संख्या मोठया प्रमाणावर वाढली. महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू या कापूस उत्पादन करणाऱ्या राज्यात प्रामुख्याने सहकारी सूत गिरण्या स्थापन करण्यात आल्या. शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या कापसाचे पिंजण करणे, कापसाच्या गासड्या बांधणे, बांधलेल्या गासड्यांचे सूत तयार करणे ते सूत कापड गिरण्यांना विकणे इ.कार्य सूत गिरण्या करीत असतात. त्याशिवाय कापसाच्या सरकीपासून खाद्यतेल आणि पेंड तयार करण्याचा उद्योगही सहकार क्षेत्रात चालतो. सूतापासून तयार केलेल्या कापडाची निर्यात मोठ्या प्रमाणावर केली जाते.



सहकारी सूत गिरण्या

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशाचा अनेक प्रकारच्या कापडाची निर्मिती करण्यात वरचा क्रमांक आहे. मलमल आणि प्रिंट असलेले कापड भारतात प्राचीन काळापासून तयार केले जाते. त्यासाठी लागणारा कापूस हा शेतीमधून उत्पादित होतो. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कापसाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी कापसावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची स्थापना करण्यावर भर दिला जातो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सरकारने देशातील हातमाग व यंत्रमागावरील कापड उत्पादनाला उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारले. त्यामुळे ग्रामीण भागातील असंख्य विणकरांना उपजिविकेचे

साधन उपलब्ध होऊ शकले. कापूस उत्पादकांना हमीभाव मिळावा म्हणून महाराष्ट्र शासनाने १९७२ साली कापूस खरेदीच्या संदर्भात 'कापूस एकाधिकार खरेदी योजना' सुरू केली. सरकीपासून तेल काढण्याचे कारखाने सुरू करण्यात आले आहेत. भारतातून परदेशात कापडाची निर्यात केली जाते. भारताच्या निर्यात व्यापारात कापड उद्योग सर्वोच्च स्थानी आहे.




सहकारी सूत गिरणी

भारतात पहिली सूत गिरणी आंध्र प्रदेशामध्ये विणकरांनी स्थापन केली आहे. सूत गिरण्या तसेच जिनिंग-प्रेसिंग सहकारी संस्था आपल्या सभासदासाठी सूताचे उत्पादन आणि पुरवठा करण्यासाठी विणकरांनी एकत्र येऊन सूत गिरण्या स्थापन केल्या. महाराष्ट्रामध्ये गेल्या ५० वर्षात सहकारी सूत गिरण्यांनी उल्लेखनीय प्रगती केली आहे. महाराष्ट्रात मार्च २०१८ अखेर सूत गिरण्यांची संख्या ११६ असून कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ''महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ'' ही शिखर संस्था नागपूर येथे स्थापन केली आहे.

क) **दुग्ध सहकारी संस्था –** दुग्ध उत्पादक सहकारी संस्था या ग्रामीण भागात स्थापन होतात. दूध व्यवसायाशी निगडीत गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या इ.मुळे दुग्ध निर्मिती होते. दुधापासून पेढे, चीज, तूप, लोणी, दही, श्रीखंड इ.पदार्थ तयार केले जातात. याशिवाय शेण, लेंड्यांमुळे खत निर्मिती होते. काही दूध उत्पादक संघ दुधाची पावडर (भुकटी) तयार करतात. गुजरातमध्ये खेडा जिल्ह्यात सहकारी तत्वावर पहिला ''जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ'' स्थापन झाला. देशामध्ये राज्य पातळीवर २२ दूध संघ स्थापन झाले असून 'अमुल'(AMUL) या दूध संघाचे प्रमुख वर्गीस कुरीयन यांच्या सहकार्याने सन १९६५ मध्ये नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाची (NDDB) स्थापना करण्यात आली. या बोर्डामार्फत दुधाचा महापूर योजना सुरू करण्यात आली. महाराष्ट्रात दूध महापूर योजनेस चांगले यश मिळाले आहे.

दुग्ध उत्पादन हा शेतीला पूरक व्यवसाय आहे. दुधाचे संकलन, शीतकरण आणि विक्रीचे उपक्रमही हाती घेतले जातात. सभासदांना दुधाच्या गुणवत्तेच्या आधारे किंमत दिली जाते. सभासदांनी पुरविलेल्या दुधाच्या किंमतीच्या प्रमाणात नफ्याचे वाटप करण्यात येते. मार्च २०१८ अखेर महाराष्ट्रात १२६९० प्राथमिक दूधपुरवठा संस्था आणि ६३ मध्यवर्ती दूधपुरवठा संघ अस्तित्वात होते. महाराष्ट्र राज्य पातळीवर मुंबई येथे महाराष्ट्र राज्य दुग्ध सहकारी महासंघ (महानंद डेअरी) आहे. शासन व दुग्ध सहकारी संस्था यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य ही संस्था करते.







दुग्ध सहकारी संस्था

भारताने शेती क्षेत्रातील हरितक्रांती प्रमाणे दुग्ध व्यवसायात धवलक्रांती केलेली आहे. महाराष्ट्रात सहकारी संस्थांकडून जवळपास ८५% दुधाचे संकलन केले जाते. दुधाचे उत्पादन वाढवून प्रक्रिया करण्यासाठी 'दूध महापूर योजना' शासनाने अंमलात आणली आहे. दुधावर प्रक्रिया करून प्रक्रिया केलेल्या मालाची विक्री करण्याचे कार्य दुग्ध विकास सहकारी संस्था करतात. सभासदाने संस्थेशी एकनिष्ठ राहून आपले विक्रीयोग्य सर्व दूध संस्थेस पुरवावे अशी अपेक्षा असते.

शेतकरी सभासदांसाठी या संस्था दुभती जनावरे खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य करतात. त्यांना लागणारा चारा व सरकी पेंड अल्पदरात पुरवितात. महाराष्ट्र शासनाने ''गो पैदास'' कार्यक्रम राबविला असून धवलक्रांतीविषयक धोरण जाहीर केले आहे.

दुग्ध व्यवसाय हा शेती व्यवसायाला पुरक व्यवसाय आहे. ग्रामीण भागात अनेक लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे. हा व्यवसाय शेतीशी निगडीत आहे.

## ७.६ सारांश

शेतमालावर प्रक्रिया करून वापरण्यायोग्य शेतमाल ग्राहकांना उपलब्ध करणे, उत्पादकांना त्यांच्या शेतमालाचे योग्य मूल्य मिळवून देणे तसेच प्रक्रिया केलेल्या मालास योग्य बाजारपेठ मिळवून देण्याचे कार्य प्रक्रिया सहकारी संस्था करतात.

**व्याख्या –**

''मालावर प्रक्रिया करणे हा ज्या संस्थेचा मुख्य उद्देश असतो ती संस्था म्हणजे प्रक्रिया सहकारी संस्था होय.''

### ❑ प्रक्रिया सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये–

१) ऐच्छिक संघटन
२) भांडवल उभारणी
३) लोकशाही व्यवस्थापन
४) जोड व्यवसायांचा विकास
५) प्रक्रिया क्षेत्राचा विकास
६) शेतमाल उत्पादन परिसरात स्थापना
७) सहकार प्रशिक्षण व मार्गदर्शन
८) उत्पादक सभासदांना सेवा सुविधा
९) ग्रामीण औद्योगिकीकरणास चालना
१०) रोजगाराच्या संधी
११) मध्यस्थांचे उच्चाटन

### ❑ प्रक्रिया सहकारी संस्थेची कार्ये

१) शेतमालाचे एकत्रीकरण
२) शेतमालावर प्रक्रिया करणे
३) उत्पादित मालाची विक्री
४) शिक्षणाच्या सोयी
५) पीक संरक्षणाबाबत मार्गदर्शन
६) बी-बियाणे,खते पुरविणे
७) उप उत्पादनाच्या विकासाला चालना
८) शेतमालाच्या उत्पादनासाठी कर्जपुरवठा
९) उत्पादन वाढीसाठी विकास योजना तयार करणे
१०) मार्गदर्शन व प्रशिक्षण

### ❑ सहकारी प्रक्रिया उद्योग

अ) सहकारी साखर कारखाने

ब) सहकारी सूत गिरणी

क) दुग्ध सहकारी संस्था

वरील सर्व संस्थांचे ग्रामीण विकासासाठी, रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी सामाजिक विकासात महत्त्वाचे स्थान आहे.

## ७.७ महत्त्वाच्या संज्ञा

१) **कापूस एकाधिकार खरेदी योजना –** कापूस उत्पादकांना हमीभाव मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनाने सुरू केलेली योजना.

२) **उप–उत्पादन –** शेतमालावर प्रक्रिया केल्यावर जो माल शिल्लक राहतो त्या उप पदार्थाचा वापर करून नवीन वस्तू तयार करणे.

३) **जोड व्यवसाय –** शेतीबरोबर इतर व्यवसाय करणे.

४) **मध्यस्थांचे उच्चाटन –** खरेदी विक्री व्यवहारात मध्यस्थांचा (दलाल/एजंट/अडत्या) सहभाग नसणे.

५) **दूध महापूर योजना–** दुधाचे उत्पादन वाढवून प्रक्रिया करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सुरू केलेली योजना.

## ७.८ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

१) महाराष्ट्रात पहिला सहकारी साखर कारखाना ----- येथे स्थापन करण्यात आला.

अ) प्रवरानगर ब) पुणे क) सातारा

२) महाराष्ट्र राज्य दुग्ध सहकारी महासंघ ----- येथे आहे.

अ) पुणे ब) मुंबई क) कोल्हापूर

३) प्रक्रिया सहकारी संस्थेचे मुख्य कार्य ----- आहे.

अ) उत्पादन ब) विपणन क) प्रक्रिया

४) शेतमालावर प्रक्रिया केल्यामुळे मूळ उत्पादनाचे मूल्य -----

अ) कमी होते ब) वाढते क) स्थिर राहते

५) भारतात पहिली सूत गिरणी ----- साली स्थापन झाली.

अ) १९४९ ब) १९५० क) १९५१

**ब)  योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| अ) पहिली कापूस पिंजणी संस्था | १) प्रवरानगर |
| ब) भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना | २) हरितक्रांती |
| क) दुग्ध सहकारी संस्था | ३) १९१७ |
| ड) महानंद डेअरी | ४) इटिकोपक्का |
| ई) प्रक्रिया उद्योग | ५) १८१७ |
| | ६) गृहनिर्माण सहकारी संस्था |
| | ७) दूध महापूर योजना |
| | ८) कोल्हापूर |
| | ९) ऊसापासून साखर तयार करणे |
| | १०) मुंबई |

**क)  खालील विधानांसाठी एक शब्द / शब्दसमूह लिहा.**

१) साखर उत्पादनांसाठी आवश्यक असलेला कच्चा माल
२) दुधाचा दर्जा टिकविण्यासाठी आवश्यक असलेली एक सुविधा
३) कापूस उत्पादकांना हमीभाव मिळविण्यासाठी शासनाने सुरू केलेली योजना
४) दुग्ध व्यवसायात झालेली क्रांती

**ड)  खालील विधाने चूक किंवा बरोबर ते लिहा.**

१) सहकारी प्रक्रिया संस्थेमुळे रोजगाराची संधी उपलब्ध होते.
२) कापसावर प्रक्रिया करण्याची गरज नसते.
३) प्रक्रियेनंतर मूळ पदार्थांची किंमत कमी होत जाते.
४) प्रक्रिया सहकारी संस्थेची पतपुरवठ्याशी सांगड घालून कर्जाची वसुली करता येते.
५) प्रक्रिया संस्थेचा कारभार हुकूमशाही पद्धतीने चालतो.

**इ)  खालील विधाने पूर्ण करा.**

१) प्रक्रिया संस्थेचे कार्य प्रामुख्याने .......... उत्पादनावर अवलंबून असते.
२) दुग्ध उत्पादक सहकारी संस्था विशेषतः ............. भागात स्थापन केल्या जातात.
३) भारतात .............. येथे पहिली कापूस पिंजणी संस्था स्थापन करण्यात आली.
४) सहकारी सूत गिरणी सहकारी प्रक्रिया संस्थांमध्ये .................. क्रमांकावर आहे.
५) सहकारी सूत गिरणीसाठी लागणारा कच्चा माल म्हणजे ............ होय.

(फ) अचूक पर्याय निवडा.

| | |
|---|---|
| १) महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना | |
| २) दुग्ध व्यवसायातील क्रांती | |
| ३) | शेतीला पूरक व्यवसाय |
| ४) प्रक्रिया सहकारी संस्था | |

प्रवरानगर, दुग्ध व्यवसाय, धवल क्रांती, सहकारी सूत गिरणी

ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) प्रक्रिया सहकारी संस्था म्हणजे काय?

२) कापूस एकाधिकार खरेदी योजना म्हणजे काय?

३) उपउत्पादन म्हणजे काय?

४) साखर उत्पादनासाठी आवश्यक असलेला कच्चा माल कोणता?

ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.

१) प्रक्रिया संस्थेचा कारभार हुकूमशाही पद्धतीने चालतो.

२) सहकारी सूत गिरणी ऊसावर प्रक्रिया करते.

३) प्रक्रिया सहकारी संस्थेचे मुख्य कार्य तयार मालावर प्रक्रिया करणे होय.

४) महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना पुणे येथे स्थापन झाला.

ई) गटात न बसणारा शब्द शोधा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | अ) तेलबिया | ब) दूध | क) साखर | ड) कापूस |
| २) | अ) सूत गिरण्या | ब) शीतगृहे | क) साखर कारखाने | ड) तेल गिरण्या |
| ३) | अ) मळी | ब) अल्कोहोल | क) इथेनॉल | ड) सरकी |

ज) योग्य क्रम लावा.

अ) सूत  ब) गासड्या

क) कापड  ड) कापूस पिंजणी

प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.

१) दूध महापूर योजना

२) उप उत्पादन

३) जोड व्यवसाय

४) कापूस एकाधिकार खरेदी योजना

## प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.

१) सहकारी प्रक्रिया संस्थेमुळे रोजगारात वाढ होते.

२) सहकारी प्रक्रिया संस्थेमुळे ग्रामीण विकासाला चालना मिळते.

## प्र.४ फरक स्पष्ट करा.

१) प्रक्रिया सहकारी संस्था आणि सेवा सहकारी संस्था

२) प्रक्रिया सहकारी संस्था आणि सहकारी पतपुरवठा संस्था

## प्र.५ टीपा लिहा.

१) सहकारी साखर कारखाने

२) सहकारी सूत गिरण्या

३) सहकारी दुग्ध संस्था

४) प्रक्रिया सहकारी संस्था

## प्र.६ कारणे द्या.

१) सहकारी साखर कारखान्यामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळाली आहे.

२) सहकारी प्रक्रिया संस्थेमुळे ग्रामीण उद्योगात वाढ झाली आहे.

३) शेतमालावर प्रक्रिया केल्यास त्याला चांगली किंमत मिळते.

४) प्रक्रिया सहकारी संस्था उत्पादन क्षेत्राच्या परिसरात स्थापन करतात.

## प्र.७ खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.

१) प्रक्रिया सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) प्रक्रिया सहकारी संस्थेची कार्ये स्पष्ट करा.

## प्र.८ दीर्घोत्तरी प्रश्न.

१) प्रक्रिया सहकारी संस्थेची व्याख्या लिहून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) प्रक्रिया सहकारी संस्थेची कार्ये स्पष्ट करा.

◆◆◆

# ८. सहकारी विपणन संस्था (सहकारी खरेदी-विक्री संस्था)
(Marketing Co-operative Society)


| | | | |
|---|---|---|---|
| ८.१ | प्रस्तावना | ८.५ | संघटन रचना |
| ८.२ | अर्थ आणि व्याख्या | ८.६ | सारांश |
| ८.३ | वैशिष्ट्ये | ८.७ | महत्त्वाच्या संज्ञा |
| ८.४ | कार्ये | ८.८ | स्वाध्याय |




सहकारी विपणन संस्था

## ८.१ प्रस्तावना:- (Introduction)

भारत हा कृषिप्रधान देश असून शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असे म्हटले जाते. सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य भाव मिळवून देण्यासाठी व मध्यस्थापासून मुक्तता करण्यासाठी सहकारी खरेदी विक्री संस्था स्थापन झालेल्या आहेत. शेतकऱ्यांकडील शेतमाल खरेदी करून तो ग्राहक व व्यापाऱ्यांना विक्री करण्याची व्यवस्था ही संस्था करीत असते. या संस्था खरेदी विक्री संस्था अथवा विपणन संस्था या नावानेही ओळखल्या जातात.

शेतीमालाच्या विक्री व्यवस्थेत अनेक दोष दिसून येतात. शेतीमालाची विक्री दलालामार्फत केल्याने शेतकऱ्यांची वजनमापात फसवणूक केली जाते. शेतमालाला कमी किंमत देऊन शेतकऱ्यांचे नुकसान होते. यामुळे शेती उत्पादनात वाढ व सुधारणा करण्यास त्यांना वाव राहत नाही.शेतकऱ्यांचे अज्ञान, दारिद्र्य, अशिक्षितपणा, बाजारपेठेचे अपुरे ज्ञान, साठवणूकीचा अभाव, सततची नापिकी, कर्जबाजारीपणा, शेतीमालास पुरेसा भाव न मिळणे या सारख्या कारणांमुळे जी किंमत मिळेल त्याच किंमतीला शेतकरी शेतमालाची विक्री करतो.

शेतमालास योग्य भाव मिळावा व शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करण्यासाठी शेतमाल खरेदी – विक्री संबंधी आवश्यक कार्य सहकारी तत्वावर पार पाडण्याच्या हेतूने शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या संस्थांना "विपणन सहकारी संस्था" अथवा "सहकारी खरेदी – विक्री संस्था" असे म्हणतात.

शेती क्षेत्राच्या विकासात सहकारी विपणन संस्थांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या प्रकरणात आपण सहकारी विपणन संस्थेचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

**सहकारी विपणन संस्थेची स्थापना :**

उत्पादक ते ग्राहकापर्यंत माल विक्रीस प्रोत्साहन देणे, शेतकऱ्यांच्या शेतीमालाची विक्री तसेच निर्यातक्षम उत्पादनास साहाय्य करण्यासाठी सहकारी विपणन संस्थांची स्थापना करण्यात आली आहे. भारतातील पहिली सहकारी विपणन संस्था मुंबई प्रांतातील हुबळी येथे १९१५ मध्ये स्थापन झाली. सध्या महाराष्ट्रात मार्च २०१८ अखेर १२०७ सहकारी विपणन संस्था आहेत.

## ८.२ अर्थ आणि व्याख्या:– (Meaning & Definition) :

**अर्थ:**

'विपणन' ही संज्ञा अतिशय व्यापक अर्थाने वापरली जाते. विपणनामध्ये वस्तूची खरेदी व विक्री आणि विविध व्यावसायिक सेवा इ. चा समावेश होतो. या संस्था उत्पादकांकडून शेतमालाची खरेदी करतात व ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आवश्यक ती कार्ये पार पाडतात.

सहकारी विपणन संस्था ही शेतकऱ्यांनी स्वेच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेली असते. सभासद शेतकऱ्यांचा माल किफायतशीरपणे विकून देणारी ही संघटना असते. या संस्था सभासद शेतकऱ्यांच्या शेतमालाचे एकत्रीकरण, वाहतूक व साठवणूक करणे, शेतमालाचे प्रमाणीकरण करून त्याची प्रतवारी ठरविणे, शेतीमालाला चांगली बाजारपेठ मिळवून देणे इ. कार्ये करतात. या संस्थांमार्फत शेती उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने उच्च प्रतीची बी–बियाणे, खते, कीटकनाशके व अवजारे पुरविणे यासारख्या सेवा पुरवून शेतकऱ्यांची बाजारात होणारी पिळवणूक थांबविली जाते. शेती क्षेत्राशिवाय विणकर, मच्छिमार, दोरखंड उत्पादन अशा अन्य क्षेत्रातही सहकारी खरेदी – विक्री संस्था स्थापन झालेल्या दिसून येतात. आदर्श व्यापारी प्रथा निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून या संस्थांची भूमिका खूप महत्त्वाची असते.

**व्याख्या :**

सहकारी विपणन संस्थेच्या व्याख्या अनेक विचारवंत व तज्ज्ञांनी केलेल्या आहेत. त्या सर्वांच्या व्याख्यांमध्ये शेतमालाच्या खरेदी विक्री कार्यावर भर दिला आहे. काळानुरूप सहकारी विपणन संस्थांची भूमिका अधिक व्यापक झाली आहे. विपणन सहकारी संस्थांच्या विविध व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.


१) **भारतीय रिझर्व्ह बँकेने केलेल्या व्याख्येनुसार :** "खाजगी व्यापाऱ्यांपेक्षा अधिक किफायतशीरपणे शेतमालाची खरेदी – विक्री करण्याच्या कार्यात सभासदांना मदत करावी या हेतूने शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी तत्वावर स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी खरेदी – विक्री संस्था होय."

२) **मार्गारेट डिग्बी–अन्न अणि शेती संघटनेच्या तज्ज्ञ यांच्या मतानुसार :** "उत्पादक ते उपभोक्त्यापर्यंत आवश्यक असणाऱ्या शेतमालाची विपणन क्रिया सहकारी तत्वावर करणारी संस्था म्हणजे सहकारी खरेदी – विक्री संस्था होय."

३) **डॉ.बी.एस.माथुर यांच्या मते :** "विपणन सहकारी संस्था ही शेतकऱ्यांनी सहकारी तत्वावर विपणन कार्ये करण्यासाठी स्थापन केलेली संस्था होय."

वरील व्याख्या विचारात घेतल्यास असे लक्षात येते की, सहकारी विपणन संस्था शेतकऱ्यांनी स्वेच्छेने स्थापन केलेली व सभासद शेतकऱ्यांचा शेतमाल रास्त किमंतीत विकून देणारी संघटना असते. उत्पादकांपासून थेट ग्राहकांपर्यंत सर्व क्रिया करून शेतकऱ्यांचे हितसंबंध जपते.

## ८.३ सहकारी खरेदी – विक्री/विपणन संस्थेची वैशिष्ट्ये : (Characteristics of Marketing Co-operative Society):




सहकारी विपणन संस्था या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन त्यांच्या आर्थिक विकासासाठी स्थापन केलेल्या असतात. या संस्थांची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

१) **शेतकऱ्यांचे ऐच्छिक संघटन :** सहकारी खरेदी विक्री संस्था शेतकऱ्यांच्या विकासासाठी स्वेच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेली संस्था होय. संस्था ज्या भागासाठी स्थापन झालेली आहे तेथील सज्ञान शेतकऱ्यांना संस्थेचे सभासद होता येते. कोणत्याही व्यक्तिवर सभासद होण्यासाठी सक्ती केली जात नाही. सभासदत्व रद्द करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणला जात नाही. आपल्या इच्छेनुसार सभासदत्व रद्द केले जाऊ शकते.

२) **शेतमालाचे विपणन –** सहकारी खरेदी विक्री संस्था या शेतकरी सभासदांकडून विपणनासाठी शेतमाल प्राप्त करतात. मालाचे एकत्रीकरण, वर्गीकरण, साठवणूक करणे व मालास योग्य किंमत मिळवून देणे, शेतमालाची विक्री करणे तसेच रास्त दरात शेती उपयोगी व जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे यासारखी कामे करतात. जेणेकरून अनिष्ट व्यापारी प्रथांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही याबाबत काळजी घेतली जाते.

३) **विस्तृत कार्यक्षेत्र :** सहकारी विपणन संस्थांचे कार्यक्षेत्र खूपच विस्तृत असते, सभासद अनेक भागातून एकत्र आलेले असतात. प्राथमिक विपणन संस्थांचे कार्य मर्यादित असते. जिल्हा विपणन संस्थांचे कार्यक्षेत्र एका जिल्ह्यापुरते मर्यादित असते. आणि राज्य विपणन संघाचे विशिष्ट राज्यापुरते मर्यादित असते व राष्ट्रीय विपणन महासंघाचे कार्य संपूर्ण देशभर चालते.

४) **भांडवल उभारणी :** सहकारी विपणन संस्था आपल्या सभासदांना भाग विकून भांडवलाची उभारणी करीत असतात. याशिवाय संस्थांना लागणारे भांडवल वेगवेगळ्या वित्तीय संस्थांकडून कर्जरूपात मिळविले जाते.

५) **लोकशाही कारभार :** विपणन सहकारी संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो. या संस्थांच्या दैनंदिन कामकाजासाठी संचालक मंडळ किंवा कार्यकारी समिती असते. संचालक मंडळ हे सभासदांमधून निवडले जाते. संस्थेचे महत्वाचे निर्णय सभासदांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत घेतले जातात.

६) **पतपुरवठा व विक्रीत सांगड :** सहकारी विपणन संस्थांमुळे पतपुरवठा आणि शेतीमाल विक्री यात सांगड घालता येते. शेतकरी पतपुरवठा संस्थेकडून कर्ज घेतात. हंगामानंतर शेतमाल विकल्यावर पतपुरवठा संस्था शेतकऱ्यांकडून येणे असलेल्या रकमा वसूल करून घेतात व उरलेली रक्कम शेतकऱ्यास परत करतात. अशाप्रकारे पतपुरवठा संस्थांच्या थकबाकीचे प्रमाण कमी होते. तसेच वसुलीचे प्रमाण वाढल्याने अन्य सभासदांच्या आर्थिक गरजा भागविता येतात.

७) **शासनास धान्य खरेदी कार्यात मदत :** देशातील जनतेला अन्नधान्य व अन्य वस्तूंचा आवश्यक तितका पुरवठा व्हावा म्हणून केंद्र सरकार देशाच्या विविध बाजारपेठांमधून धान्य खरेदी करीत असते. विविध राज्यातील विपणन संस्था सरकारला या कामात मदत करतात, सहकारी विपणन संस्थांचे ग्रामीण भागापर्यंत पसरलेले जाळे आणि शेतकरी वर्गाशी असणाऱ्या संबंधामुळे सरकार धान्य खरेदी करू शकते.

८) **संघीय रचना :** भारतात सहकारी विपणन संस्थांची रचना संघीय स्वरूपाची आहे. प्राथमिक/ गाव किंवा तालुका पातळीवर प्राथमिक सहकारी विपणन संस्था स्थापन केली जाते. जिल्हा पातळीवर जिल्हा सहकारी विपणन संस्था, राज्य पातळीवर राज्य सहकारी विपणन संस्था व राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय सहकारी विपणन संघ (नाफेड) कार्यरत आहे. अशाप्रकारे सहकारी विपणन संस्थांची रचना ही संघीय स्वरूपाची आहे.

९) **सभासदांच्या क्रयशक्तीत वाढ :** सहकारी विपणन संस्था आपल्या सभासदांच्या क्रयशक्तीत वाढ करण्यासाठी मदत करीत असतात. उदा. सभासदांच्या शेतमालास योग्य भाव मिळवून देणे, उत्पादनात वाढ करणे, शेतमालाच्या तारणावर आगाऊ रक्कम उचल देणे, सभासदांची खरेदीशक्ती व सौदाशक्ती वाढविणे. सभासदांच्या सौदाशक्तीत वाढ झाल्याने त्यांना आर्थिक अडचणीच्या प्रसंगी आपला माल कमी किंमतीत मध्यस्थांना विकण्याची वेळ येत नाही.

१०) **बाजारपेठेविषयी माहिती व अन्य सुविधा :** शेतकऱ्यांना बाजारपेठांविषयी माहिती देणे, उत्पादन वाढीच्या योजना आखणे, बी-बियाणे, खते, कीटकनाशके पुरविणे, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे इ. सुविधा संस्थेमार्फत पुरविल्या जातात.

११) **मध्यस्थांचे उच्चाटन :** विपणन सहकारी संस्था शेतीमालाचे विपणन स्वत:च करीत असल्याने शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या मध्यस्थांचे उच्चाटन होते. शेतमाल खरेदी विक्रीमध्ये मुख्यत: वजनमापे, हिशेब, बाजारभाव इ. बाबत फसवणूक होते. मध्यस्थांचे उच्चाटन झाल्याने उचित व्यापारी पद्धतीमुळे शेतकऱ्यांना ग्राहकांकडून योग्य किंमत मिळते व त्याचा आर्थिक फायदा विपणन संस्थेला होतो.




**कृती–**

**१) ''सहकारी विपणन संस्था शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत'' चर्चा करा.**

## ८.४ सहकारी विपणन संस्थांची कार्ये :– (Functions of Marketing Co-operative Soeiety)

सहकारी खरेदी विक्री संस्थांची कार्ये शेतमालाच्या खरेदी विक्री संबधित आहेत. त्यामुळे शेतमालाच्या खरेदी विक्री पर्यंतच्या सर्व बाबींचा समावेश या संस्थाच्या कार्यांत होतो. सहकारी विपणन संस्थांची कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.




१) **शेतमालाचे एकत्रीकरण व प्रतवारी करणे :** विपणन सहकारी संस्थेकडून शेतमालाचे एकत्रीकरण केले जाते. कारण प्राथमिक सहकारी विपणन संस्थेचे कार्यालय मुख्यत: तालुक्याच्या ठिकाणी असते. त्यांचे सभासद शेतकरी ग्रामीण भागात विखुरलेले असतात. सर्व शेतकऱ्यांचा शेतमाल सारख्या प्रतीचा, दर्जाचा, गुणधर्माचा अणि वजनाचा नसतो. म्हणून शेतमालाचे एकत्रीकरण करून त्या मालाची प्रतवारी केल्यास चांगली किंमत प्राप्त होते.

२) **साठवणुकीच्या सोयी :** शेतमालाच्या साठवणुकीच्या सोयी शेतकऱ्यांकडे उपलब्ध असल्यास शेतमालाची नासधूस होत नाही.योग्य किंमत मिळेपर्यंत शेतमाल साठवणूक करण्यासाठी विपणन सहकारी संस्था शेतकऱ्यांना सोयी पुरवितात. बऱ्याच शेतकऱ्यांकडे साठवणुकीची सुविधा नसते. साठवणुकीची योग्य व्यवस्था असल्यास मालाची गुणवत्ता टिकून राहते. ही सेवा शेतकऱ्यांना अल्प दरात पुरविली जाते.

३) **मालाची बांधणी करणे :** शेतमालाची बाजारपेठेपर्यंत किंवा गोदामात वाहतूक करण्यासाठी नीट हाताळणी करता यावी व माल साठविणे सोपे जावे यासाठी मालाच्या स्वरूपाप्रमाणे त्याची बांधणी केली जाते. मालाची बांधणी केल्यामुळे वस्तूतील गुणधर्म टिकून राहतात. बांधणी व्यवस्थित असल्यास माल कमी जागेत साठविता येतो व कमी खर्चात मालाची वाहतूक करता येते.

४) **मालाची वाहतूक करणे :** शेतमालाची वाहतूक वेळोवेळी करावी लागते. शेतकऱ्यांकडील शेतमाल गोदामात आणणे, वर्गीकरण केलेला माल गोदामात नेणे आणि मागणीनुसार मालाची वाहतूक करून त्याचा पुरवठा केला तरच शेती मालाला चांगली किंमत मिळते.

५) **शेतमालाची विक्री करणे :** सहकारी खरेदी-विक्री संस्थेचे प्रमुख कार्य म्हणजे शेतमालाची विक्री करणे हे होय. या संस्था सभासद शेतकऱ्यांचा शेतमाल वाजवी दराने विकतात. सहकारी संस्था अभावी शेतकऱ्यांचा शेतमाल विकतांना त्यांची फसवणूक केली जाते. खोटी वजनमापे, कमी किंमत, मध्यस्थ इ. मुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होण्याऐवजी पिळवणूक होते. काही संस्था मालाची विक्री ग्राहक भांडारे स्थापन करून करतात.

६) **शेतमालाच्या तारणावर उचल देणे :** सहकारी खरेदी-विक्री संस्थांना आपल्या शेतमालाची विक्री तत्काळ करणे शक्य नसते. शेतकऱ्यास आर्थिक गरज भासल्यास सहकारी खरेदी विक्री संस्था ह्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत शेतमालाच्या तारणावर किमान ६०% ते ७०% पर्यंत रक्कम उचल देतात. या उचलीमुळे शेतकऱ्यांची अर्थिक गरज पूर्ण होते.अशा वेळेस शेतमालास योग्य किंमत मिळेपर्यंत शेतकरी वाट पाहू शकतात.

७) **सरकारच्या वतीने शेतमालाची खरेदी :** शेतमालाची किमान आधारभूत किंमत शासन ठरविते, जेव्हा बाजारपेठेतील किंमत आधारभूत किंमतीपेक्षा कमी होते तेंव्हा सरकार सभासद शेतकऱ्यांकडून माल खरेदी करते. अशी खरेदी सरकारच्या वतीने सहकारी खरेदी-विक्री संस्था करीत असतात. उदा. महाराष्ट्रातील एकाधिकार कापूस खरेदी, नाफेड मार्फत कांदा खरेदी यासाठी तालुका स्तरावरील प्राथमिक सहकारी खरेदी विक्री संस्था मदत करीत असतात.

८) **सभासदांना आवश्यक माहिती पुरविणे :** सहकारी विपणन संस्थेकडून सभासदांना आवश्यक माहिती दिली जाते. नवनवीन उत्पादन तंत्राविषयी माहिती पुरविणे. बाजारपेठांविषयी माहिती देणे व मार्गदर्शन करणे, मालाच्या किमंती, आवक, नवीन बदल, बाजारपेठांतील घडामोडी, मालाची मागणी, पुरवठा, निर्यात इ. संदर्भात या संस्था सभासद शेतकऱ्यांना सविस्तर माहिती देतात.

९) **किंमतीवर नियत्रंण ठेवणे :** सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतमालाचे एकत्रीकरण, प्रतवारी, साठवणूक, प्रक्रिया इ. कार्य करतात. त्यामुळे मध्यस्थ वर्गास वाव मिळत नाही. ग्राहकांच्या मागणी प्रमाणे वाजवी किमंतीत मालाचा पुरवठा केला जातो. त्यामुळे मालाच्या किमंतीत चढउतार होत नाही व बाजारपेठांतील किमंतीवर आपोआपच नियत्रंण राहते.

१०) **शेतमालाची निर्यात करणे :** सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतमालाच्या निर्यातीचे कार्य करतात. सभासद शेतकऱ्यांनी निर्यातक्षम योग्य शेतमालाचे उत्पादन केल्यास त्यासाठी मालाची बांधणी करणे, मुद्रीकरण, चिन्हांकन, बिले तयार करणे इ. सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. प्राथमिक सहकारी विपणन संस्था, राज्य सहकारी विपणन संघ ह्या संस्था राष्ट्रीय सहकारी विपणन संघ (नाफेड) यांच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर खरेदी-विक्री करण्याचे कार्य करतात.




**कृती-**

**२) तुमच्या परिसरातील खरेदी विक्री सहकारी संस्थांची माहिती संकलित करा.**

## ८.५ सहकारी खरेदी विक्री संस्थांची संघटन रचना : (Organisational Structure of Marketing Co-operative Societies) :

सहकारी खरेदी-विक्री संस्थांची रचना पिरॅमिड प्रमाणे असून महाराष्ट्रामध्ये ती पुढीलप्रमाणे असते.



१) **प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था : (Primary Co-operative Marketing Societies) :** या संस्था तालुका किंवा ग्रामीण/गाव पातळीवर स्थापन झालेल्या असतात. या संस्था शेतमालाचे एकत्रीकरण करणे, प्रतवारी लावणे, मालाची साठवणूक, वाहतूक करणे, शेतमालाची विक्री करणे, सभासदांना बी-बियाणे, खते, कीटकनाशके पुरविणे, शेतमालाच्या तारणावर कर्ज देणे इ. कार्य करतात. या संस्थांचे कार्यक्षेत्र तालुक्यापुरते किंवा २ते ४ बाजारपेठांपुरते मर्यादित असते. त्या परिसरातील कारागीर, शेतकरी, कुटीरोद्योग करणारे या संस्थांचे सभासद असतात.

२) **जिल्हा सहकारी मध्यवर्ती खरेदी-विक्री संघ : (District Central Co-operative Marketing Federation) :** प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्थांद्वारे जिल्हा सहकारी विपणन संस्थांची स्थापना केली जाते. या संघाचे कार्यक्षेत्र संपूर्ण जिल्हा असते. त्या जिल्ह्यातील सर्व प्राथमिक खरेदी विक्री संस्था या संघाच्या सभासद असतात. प्राथमिक संघाच्या कार्यात सुसूत्रता व समन्वय घडवून आणणे. प्राथमिक संघाच्या खरेदी विक्री व माल साठवणूक या कार्यात मार्गदर्शन करणे तसेच शेतीमालाची खरेदी-विक्री व उपभोग्य वस्तूंचे वाटप या संस्थेद्वारे केले जाते.

३) **राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ : (State Co-operative Marketing Federation :** राज्य पातळीवरील ही सर्वोच्च विपणन संस्था होय. राज्यातील जिल्हा सहकारी विपणन संघ एकत्र येऊन या संस्थेची स्थापना करतात. निर्यात व्यापाराबरोबर सरकारच्या वतीने धान्य वसुली कार्यासही हातभार लावते. राज्यातील खरेदी विक्री संघाच्या कार्यात एकसूत्रता आणणे. सरकारला व सहकारी संस्थांना शेतमालाच्या खरेदी विक्रीबाबत मार्गदर्शन करणे. जिल्हा व प्राथमिक सहकारी संस्थांना कर्ज पुरवठा करण्याचे कार्य राज्य खरेदी विक्री संघ करतो. राज्यातील सर्व जिल्हा खरेदी विक्री संघ याचे सभासद असतात.

४) **राष्ट्रीय सहकारी खरेदी विक्री संघ/ नाफेड : (National Agricultural Marketing Federation) :** देशातील विविध राज्यातील राज्य खरेदी-विक्री किंवा राज्य सहकारी विपणन संस्थांनी राष्ट्रीय पातळीवर एकत्र येऊन स्थापन केलेला हा संघ असतो. यास 'नाफेड' असेही म्हणतात. या संघाची स्थापना २ ऑक्टोबर, १९५८ रोजी झाली. नाफेडचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे आहे. ही संस्था आंतरराष्ट्रीय व्यापारात भाग घेते. राज्य सहकारी खरेदी विक्री संस्थांचा संघ म्हणून नाफेड कार्य करते. राज्य स्तरावरील संस्थांच्या कार्यात समन्वय व सुसूत्रता निर्माण करणे. व आंतरराज्य व आंतरराष्ट्रीय व्यापारात मदत करण्याचे कार्य नाफेड करते. ज्या राज्यात एखाद्या विशिष्ट शेतमालाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर झाले आहे. अशा राज्यातून शेतमालाची खरेदी नाफेड करत असते. तसेच शेतमालाच्या किंमत स्थिरीकरणाचे काम ही संस्था करते. अंतर्गत व्यापाराबरोबर शेतमालाची निर्यात नाफेड मार्फत केली जाते. सध्या नाफेड विपणन संशोधन व विपणनाची माहिती गोळा करते. या संघाने बाजार संशोधन व समाचार प्रसारण विभाग व कृषी आदान विभाग स्थापन केला आहे. आधारभूत किंमत योजनेची अंमलबजावणी नाफेड मार्फत केली जाते.

थोडक्यात, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारणे, शेतकऱ्याला प्रतिष्ठा मिळवून देणे, शेतीचा विकास साधण्यासाठी ग्रामीण विकासाला चालना देणे. यासाठी सहकारी विपणन संस्थांचे महत्त्व आहे.




नाफेड

**फरक – प्रक्रिया सहकारी संस्था व सहकारी विपणन संस्था**

| अ.नं | मुद्दे | प्रक्रिया सहकारी संस्था | सहकारी विपणन संस्था |
|---|---|---|---|
| १ | **अर्थ** | शेतमालावर प्रक्रिया करून तो शेतमाल ग्राहकांसाठी उपभोग योग्य बनवून अंतिम वस्तू म्हणून बाजारात विक्री करणाऱ्या संस्था म्हणजे प्रक्रिया सहकारी संस्था होय. | शेतमालास योग्य भाव मिळावा व शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण व्हावे या हेतूने शेतमालाच्या खरेदी-विक्री संबधी आवश्यक कार्ये सहकारी तत्त्वावर पार पाडण्याच्या हेतूने शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन स्थापन केलेल्या संस्थांना विपणन सहकारी संस्था असे म्हणतात . |
| २) | कार्य | कापूस, ऊस, तेलबिया, फळे यासारख्या शेतमालावर प्रक्रिया करणे, प्रक्रिया केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देणे, तसेच मुख्य उत्पादनाबरोबर उप वस्तूंचे उत्पादन करणे. | शेतमालाचे एकत्रीकरण, प्रतवारी, प्रमाणीकरण, बांधणी, वाहतूक व्यवस्था करणे, शेतमालाची खरेदी विक्री करणे, शेतमालाला योग्य किंमत मिळवून देणे. |
| ३) | उद्‌देश | प्रक्रिया सहकारी संस्थेचा मुख्य उद्‌देश मालावर प्रक्रिया करणे हा असतो. | विपणन सहकारी संस्थेचा मुख्य उद्‌देश शेतमालाची खरेदी विक्री करून योग्य किंमत मिळवून देणे हा असतो. |
| ४) | सभासदत्व | शेतमालाचे उत्पादक शेतकरी सभासद असतात. | शेतमालाची विक्री करणाऱ्या व्यक्ती सभासद असतात. |
| ५) | कार्यक्षेत्र | प्रक्रिया सहकारी संस्था या प्रामुख्याने ग्रामीण भागात कार्य करताना आढळून येतात. | या संस्था ग्रामीण व नागरी भागात कार्य करतात. |
| ६) | मदत | उपउत्पादनाच्या विकासास चालना देण्यासाठी शेतीपूरक व्यवसायाच्या विकासास मदत करतात. | दर्जेदार शेतमालाच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन देतात व मार्गदर्शन करतात. |

## ८.६ सारांश

भारताची अर्थव्यवस्था आजही बहुतांश शेतीवर अवलंबून आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालास रास्त भाव मिळण्यासाठी, मध्यस्थांपासून सुटका होण्यासाठी सहकारी खरेदी विक्री संस्थांची आवश्यकता असते. या संस्थांना विपणन संस्था असेही म्हणतात. शेतमालाची खरेदी-विक्री करणे हे संस्थेचे प्रमुख कार्य असते. शेतीक्षेत्राचा विकास व ग्रामीण विकास या दृष्टीने संस्था खूप उपयुक्त असतात.

**व्याख्या :** ''विपणन सहकारी संस्था म्हणजे शेतकऱ्यांनी शेतमालाची सहकारी तत्वावर खरेदी-विक्रीचे कार्य करण्यासाठी स्थापन केलेली संस्था होय.''

❑ **वैशिष्ट्ये :**

१. शेतकऱ्यांचे ऐच्छिक संघटन
२. शेतमालाचे विपणन
३. विस्तृत कार्यक्षेत्र
४. भांडवल उभारणी
५. लोकशाही कारभार
६. पतपुरवठा व विक्रीत सांगड
७. शासनास धान्य खरेदी कार्यात मदत
८. संघीय रचना
९. सभासदांच्या क्रयशक्तीत वाढ
१०. बाजारपेठांविषयी माहिती व अन्य सुविधा
११. मध्यस्थांचे उच्चाटन

**कार्ये:**

१) शेतमालाचे एकत्रीकरण व प्रतवारी करणे
२) साठवणुकीच्या सोयी
३) मालाची बांधणी करणे
४) मालाची वाहतूक करणे
५) शेतमालाची विक्री करणे
६) शेतमालाच्या तारणावर उचल देणे
७) सरकारच्या वतीने शेतमालाची खरेदी
८) सभासदांना आवश्यक माहिती पुरविणे
९) किंमतीवर नियंत्रण ठेवणे
१०) शेतमालाची निर्यात करणे

**सहकारी खरेदी विक्री संस्थाची संघटन रचना / संघीय रचना :**

१) प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था

२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी खरेदी-विक्री संघ

३) राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ

४) राष्ट्रीय सहकारी खरेदी-विक्री संघ(नाफेड)

## ८.७ महत्त्वाच्या संज्ञा

**१) राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन संघ (नाफेड) - (National Agricultural Co-operative Marketing Federation)**

राष्ट्रीय पातळीवर सहकार तत्वावर खरेदी-विक्रीचे कार्य करणारी संघीय संस्था.

## ८.८ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

१) शेतमालाची प्रतवारी व प्रमाणीकरण हे ----- सहकारी संस्थेचे कार्य असते.
अ) विपणन ब) ग्राहक क) पतपुरवठा

२) भारतातील पहिली सहकारी विपणन संस्था ----- येथे स्थापन झाली.
अ) गदग ब) हुबळी क) चेन्नई

३) शेतकऱ्यांना आपला शेतमाल ----- अभावामुळे मिळेल त्या किंमतीला विकावा लागतो.
अ) साठवणूक ब) मध्यस्थ क) अभिकर्ते

४) सहकारी खरेदी विक्री संस्थांचा मुख्य उद्देश ----- तत्वावर शेतमालाची खरेदी-विक्री करणे हा होय.
अ) व्यापारी ब) धार्मिक क) सहकारी

५) विपणन सहकारी संस्था शेतमालाच्या खरेदी-विक्री कार्याबरोबर ----- क्रिया पार पाडते.
अ) आर्थिक ब) विपणन क) उत्पादन

६) विपणन सहकारी संस्था सभासद शेतकऱ्यांना शेतीमालाच्या तारणावर ठरावीक रक्कम ----- म्हणून देतात.
अ) उचल ब) व्याज क) देणगी

७) सहकारी विपणन संस्थामुळे शेतकऱ्यांची ----- पासून मुक्तता होते.
अ) सरकार ब) ग्राहक क) मध्यस्थ

८) शेतमालाच्या बाजारातील किंमती ----- ठेवण्यासाठी विपणन सहकारी संस्था कार्यरत असतात.
अ) स्थिर ब) अस्थिर क) अत्यल्प

ब) **जोडया लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| अ) नाफेडची स्थापना | १) सभासदांना आगाऊ रक्कम |
| ब) विपणन सहकारी संस्था | २) गाव पातळीवर कार्य |
| क) प्राथमिक सहकारी विपणन संस्था | ३) शेतमाल खरेदी-विक्री |
| ड) शेतीमालाचे तारण | ४) १९५१ |
| इ) नाफेडचे मुख्य कार्यालय | ५) मुंबई |
| | ६) ग्राहकांना महाग माल |
| | ७) जिल्हा पातळीवर कार्य |
| | ८) औद्योगिक मालाचे उत्पादन व विक्री |
| | ९) १९५८ |
| | १०) दिल्ली |

क) **खालील विधानांसाठी एक शब्द/शब्दसमूह लिहा.**

१) राष्ट्रीय स्तरावर सहकारी तत्त्वावर खरेदी-विक्रीचे कार्य करणारी संघ संस्था

२) शेतकऱ्यांच्या शेतीमालास रास्त भाव मिळवून देणारी सहकारी संस्था

३) विपणन सहकारी संस्थांच्या कार्यामुळे बाजारातून उच्चाटन झालेला घटक.

४) शेतीमालाच्या खरेदी विक्रीसह एकत्रीकरण, प्रतवारी, प्रमाणीकरण, बांधणी, साठवणूक, वाहतूक इ. सेवा पुरविणारी संस्था.

५) शेती पतपुरवठा व मालविक्री यांची सांगड घालण्याचे कार्य करणारी संस्था.

ड) **खालील विधाने चूक किंवा बरोबर ते लिहा.**

१) पतपुरवठयाची विक्रीशी सांगड घातल्यास कर्जवसुलीला मदत होत नाही.

२) विपणन सहकारी संस्था शेतमालाच्या बाजारातील किंमती स्थिर ठेवतात.

३) सहकारी विपणन संस्था शेतकऱ्यांची सौदाशक्ती वाढवितात.

४) सहकारी विपणन संस्थांपेक्षा दलालांकडून शेतमालास योग्य किंमत मिळते.

५) विपणन सहकारी संस्था केवळ शेतीमालाच्या खरेदी विक्रीचे कार्य सरकारी तत्त्वावर करतात.

६) विपणन सहकारी संस्था शेतकऱ्यांना शेतीमालाच्या तारणावर अर्थसहाय्य करतात.

७) सहकारी विपणन संस्थेमुळे शेतमालाला योग्य किंमत मिळत नाही.

इ) **खालील विधाने पूर्ण करा.**

१) सहकारी विपणन संस्थेमुळे ...........चे उच्चाटन होते.

२) सहकारी खरेदी-विक्री संस्था जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत शेतमालाच्या तारणावर ......... देतात.

३) नाफेडचे मुख्य कार्यालय ............ येथे आहे.

४) शेतमालाची प्रतवारी व प्रमाणीकरण हे ........... सहकारी संस्थेचे कार्य असते.

५) शेतमालाच्या बाजारातील किंमती ........... ठेवण्यासाठी सहकारी विपणन संस्था कार्यरत असतात.

६) सहकारी विपणन संस्था .............. ची सौदाशक्ती वाढवितात.

७) सहकारी खरेदी विक्री संस्थांचा मुख्य उद्‌देश ............ तत्वावर शेतमालाची खरेदी-विक्री करणे होय.

८) भारतातील पहिली सहकारी विपणन संस्था ................ साली स्थापन झाली.

(फ) **अचूक पर्याय निवडा.**

| | |
|---|---|
| १) जिल्हा विपणन संघ | |
| २) | राज्य स्तर |
| ३) पतपुरवठा व विक्रीत सांगड | |
| ४) तेलबियांपासून तेल | |
| ५) | शेतमालाचे तारण |
| ६) नाफेडचे मुख्य कार्यालय | |

राज्य विपणन संघ, जिल्हा स्तर, विपणन सहकारी संस्था, शेतमालावर प्रक्रिया, दिल्ली, उचल

ग) **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) विपणन म्हणजे काय?

२) विपणन सहकारी संस्था शेतकऱ्यांना कोणत्या तारणावर अर्थसहाय्य करतात?

३) विपणन सहकारी संस्था शेतमालाच्या खरेदी विक्री कार्याबरोबरच कोणती कार्ये पार पाडते?

४) शेतकऱ्यांना आपला शेतमाल कशाच्या अभावामुळे मिळेल त्या किंमतीला विकावा लागतो?

५) नाफेड म्हणजे काय?

ह) **खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) विपणन सहकारी संस्थांमुळे शेतकऱ्यांची ग्राहकांपासून मुक्तता होते.

२) सहकारी विपणन संस्था मध्यस्थांची सौदाशक्ती वाढवितात.

३) भारतात पहिली विपणन संस्था मद्रास प्रांतात स्थापन झाली.

४) विपणन सहकारी संस्थांचा कारभार हुकूमशाही पद्‌धतीने चालतो.

५) शेतमालाच्या बाजारातील किंमती अस्थिर ठेवण्यासाठी विपणन सहकारी संस्था कार्य करतात.

### ई) गटात न बसणारा शब्द शोधा.

१) अ) शेतमालाचे एकत्रीकरण ब) घरबांधणी
क) शेतमालाची बांधणी ड) शेतमालाची वाहतूक

२) अ) नाफेड ब) भागीदारी संस्था
क) राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ ड) जिल्हा मध्यवर्ती सहकारी खरेदी-विक्री संघ

### ज) योग्य क्रम लावा.

अ) बांधणी ब) शेतमाल विक्री
क) प्रतवारी ड) एकत्रीकरण

### प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.

१) नाफेड
२) विपणन सहकारी संस्था
३) राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ
४) जिल्हा मध्यवर्ती सहकारी खरेदी-विक्री संघ
५) प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था

### प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.

१) दलाल व मध्यस्थांकडून शेतकऱ्यांचे शोषण होते.
२) सहकारी विपणन संस्थांची उपयुक्तता वाढत आह.
३) ''विपणन सहकारी संस्थेच्या स्थापनेमुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा झाली आहे''.

### प्र.४ फरक स्पष्ट करा.

१) प्रक्रिया सहकारी संस्था आणि सहकारी विपणन संस्था
२) पतपुरवठा सहकारी संस्था आणि सहकारी विपणन संस्था
३) सेवा सहकारी संस्था आणि सहकारी विपणन संस्था

### प्र.५ टीपा लिहा.

१) सहकारी विपणन संस्थेची वैशिष्टये.
२) नाफेड (राष्ट्रीय शेती सहकारी खरेदी-विक्री संघ )
३) विपणन सहकारी संस्था.
४) सहकारी विपणन संस्थेची कार्ये.

### प्र.६ कारणे लिहा.

१) विपणन सहकारी संस्था या शेती विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात.

२) सहकारी विपणन संस्थेमुळे मध्यस्थांचे उच्चाटन होते.

३) सहकारी विपणन संस्था शेतकऱ्यांच्या दृष्टीने गरजेची आहे.

४) शेतमालाला योग्य भाव मिळवून देणे या उद्‌देशाने सहकारी विपणन संस्था कार्य करतात.

५) सहकारी विपणन संस्था शेतकऱ्यांची सौदाशक्ती वाढवितात.

६) खाजगी व्यापाऱ्यांकडून होणारे आर्थिक शोषण सहकारी विपणन संस्थामुळे टाळले जाते.

### प्र.७ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१) विपणन सहकारी संस्थेची कार्ये लिहा.

२) विपणन सहकारी संस्थेचा अर्थ व व्याख्या लिहा.

३) सहकारी विपणन संस्थेची वैशिष्ट्ये लिहा.

### प्र.८ दिर्घोत्तरी प्रश्न

१) सहकारी विपणन संस्था म्हणजे काय? या संस्थेची वैशिष्टये स्पष्ट करा.

२) सहकारी विपणन संस्थेची व्याख्या लिहून विविध कार्ये सविस्तर स्पष्ट करा.

◆◆◆

# ९. सहकारी गृहनिर्माण संस्था
## (Housing Co-operative Society)


९.१ प्रस्तावना
९.२ अर्थ व व्याख्या
९.३ वैशिष्ट्ये
९.४ कार्ये
९.५ सारांश
९.६ महत्वाच्या संज्ञा
९.७ स्वाध्याय




सहकारी गृहनिर्माण संस्था

### ९.१ प्रस्तावना : (Introduction)

औद्योगीकरणामुळे शहरीकरण, नागरीकरण होत आहे. त्याचबरोबर वाढत्या लोकसंख्येमुळे मोठ्या प्रमाणावर निवाऱ्याची गरज निर्माण झाली आहे. प्रामुख्याने शहरी भागात वाढत्या लोकसंख्येच्या केंद्रीकरणामुळे घरांच्या मागणी पुरवठ्यात असमतोल, जागा व बांधकाम साहित्याच्या वाढत्या किंमती, विभक्त कुटुंब पद्धती यामुळे घरांच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्यामुळे अल्प व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्तिंना स्वतःच्या वैयक्तिक उत्पन्नाच्या माध्यमातून घर बांधणे शक्य होत नाही. यातून घर बांधणीची समस्या निर्माण झाली आहे.

घर बांधण्याच्या सामायिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी बेघर व्यक्ती एकत्रित येऊन गृहनिर्माण सहकारी संस्था स्थापन करतात. त्यासाठी बँका आणि वित्तीय संस्था यांच्याकडून कर्जे घेणे,जागेची खरेदी, बांधकाम आणि त्यानंतर बांधकामाची दुरुस्ती व देखभाल हे सर्व व्यवहार सहकारी संस्थेच्या माध्यमातून केल्यास सर्वसामान्य व्यक्तिला योग्य व कमी खर्चात आपले घर किंवा निवाऱ्यासंबंधीचा प्रश्न सोडविता येतो. घर घेण्याच्या समस्येवर सहकारी गृहनिर्माण संस्था हा खात्रीशीर उपाय आहे. भारतात इ.स. १९०९ मध्ये म्हैसूर प्रांतात 'बेंगलोर को-ऑप. सोसायटी लिमिटेड' ही पहिली गृहनिर्माण सहकारी संस्था स्थापन झाली. नियोजन काळात गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या विकासाला वेग आला.

'भारतीय राष्ट्रीय सहकारी गृहनिर्माण महासंघ' (National Co-operative Housing Federation of India) ही राष्ट्रीय शिखर संस्था देशातील एकूण सहकारी गृहनिर्माण चळवळीला दिशा देण्याचे कार्य करते.तिची स्थापना सप्टेंबर १९६९ मध्ये झाली. एप्रिल १९७० मध्ये स्थापन झालेले 'गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ' (Housing and Urban Development Corporation-HUDCO) हे नागरी भागातील सहकारी गृहनिर्माण प्रकल्पांना कर्ज पुरवठा करते.

## ९.२ अर्थ व व्याख्या : Meaning and Definition

### ❑ अर्थ : Meaning

निवाऱ्याची समान गरज असणाऱ्या व्यक्ती एकत्र येऊन गृहनिर्माण सहकारी संस्थेची स्थापना करतात. घरासाठी आवश्यक असलेली जागा किंवा जमीन सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत खरेदी केली जाते किंवा सरकारकडून सवलतीच्या दरात मिळविली जाते. घरांचे आराखडे, बांधकाम साहित्य, मजुरी, दुरुस्ती, देखभाल असे सर्व व्यवहार संस्थेमार्फत केले जातात. अशा सहकारी संस्थांना गृहनिर्माण सहकारी संस्था असे म्हणतात.

### ❑ व्याख्या : Definition

"मर्यादित उत्पन्न असलेल्या व्यक्तिंनी एकत्र येऊन आपल्या राहण्यासाठीच्या घराची गरज पूर्ण करण्यासाठी सहकारी तत्वानुसार स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय."

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० नुसार "आपल्या सभासदांना राहण्यासाठी घरे किवा सदनिका बांधून देणे, तसेच सभासदांना समान सुखसोयी आणि सेवा पुरविणे या उद्‌देशाने सहकारी तत्त्वावर स्थापन झालेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय."

## ९.३ सहकारी गृहनिर्माण संस्थेची वैशिष्ट्ये (Features of Housing Co-operative Society) :



१) **ऐच्छिक संघटना :** मर्यादित उत्पन्न असलेल्या अल्प व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्ती स्वेच्छेने एकत्र येऊन,आपल्या निवाऱ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापना करतात.संस्थेचे सभासद होण्यासाठी कोणालाही सक्ती केलेली नसते. जमीन खरेदीपासून प्रत्यक्ष घरे किंवा सदनिका तयार होईपर्यंत सर्व कार्ये सभासद परस्पर सहकार्याने पूर्ण करतात. ज्या व्यक्तिंची स्वत:ची घरे नाहीत अशा व्यक्तिंना सभासद होता येते.

२) **वाजवी किंमतीमध्ये घर बांधणी :** सहकारी गृहनिर्माण संस्था मोठ्या प्रमाणात जमीन,बांधकाम साहित्य, इतर सेवा खरेदी करतात.अनावश्यक मध्यस्थ कमी होतात. त्यामुळे कमीत कमी किंमतीमध्ये सभासदांना घरे उपलब्ध होतात. सहकार तत्त्वानुसार घरबांधणीचे कार्य चालत असल्याने मोठ्या प्रमाणावर खरेदीचे फायदे मिळत असतात त्यामुळे येणारा घर खरेदी खर्च कमी येतो.

३) **भांडवल उभारणी :** भागांची विक्री, सभासद प्रवेश शुल्क तसेच बँका आणि विविध वित्तीय संस्था यांच्याकडून कर्ज घेऊन भांडवल उभारणी केली जाते.भारतीय आर्युविमा महामंडळ,सार्वजनिक व व्यापारी बँका,सहकारी बँका, गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ (HUDCO), गृहनिर्माण विकास वित्तीय महामंडळ (HDFC) इत्यादीकडून कर्ज उपलब्ध करून दिले जाते. सहकारी गृहनिर्माण संस्थेला शासन भांडवल पुरवठा करून अनुदान देते.

४) **लोकशाही व्यवस्थापन :** लोकशाही व्यवस्थापन हे सहकारचे एक मूलभूत तत्त्व आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था या तत्त्वानुसारच काम करतात. संस्थेचा कारभार हा सभासदांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फत चालविला जातो. वर्षातून एकदा सर्व सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा बोलविली जाते व त्या सभेमध्ये गृहनिर्माण सहकारी संस्थेबाबत महत्त्वाचे आणि धोरणात्मक निर्णय घेतले जातात.

५) **मध्यस्थांचे उच्चाटन :** घरांची बांधणी, विक्री अशा व्यवहारात अनेक मध्यस्थ व दलाल असतात. हे मध्यस्थ व दलाल ग्राहकांचे आर्थिक शोषण व फसवणूक करतात. सहकारी गृहनिर्माण संस्थांमुळे असे अनावश्यक मध्यस्थ व दलाल टाळले जातात. ही संस्था सभासदांबरोबर प्रत्यक्ष व्यवहार करते . त्यामुळे सभासदांना वाजवी किमतींमध्ये घरे मिळतात.

६) **बांधकाम, दुरुस्ती व देखभाल खर्चात बचत :** मोठ्या प्रमाणात बांधकाम साहित्याची खरेदी केल्यामुळे खर्चात बचत होते. कारण हा खर्च सर्वांसाठी सामुदायिकपणे केला जातो. ही सर्व कामे एकत्रितरित्या होत असल्याने खर्चात बचत होते.

७) **सभासदांच्या बचत सवयीमध्ये वाढ :** गृहनिर्माण सहकारी संस्था सभासदांना दीर्घ मुदतीचे कर्ज अल्प व्याजदराने उपलब्ध करून देतात.या कर्जाच्या परतफेड हप्त्यासाठी आणि दुरुस्ती देखभाल खर्चासाठी काही रक्कम दर महिन्याला संस्थेकडे जमा करावी लागते. यामधून सभासदांना बचतीची सवय लागते.

८) **समूह जीवनाचा आनंद :** सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सभासदत्व सर्वांसाठी खुले असते.सर्व सभासद भेदभाव विसरून एकत्र राहतात. त्यांच्यामध्ये सलोख्याचे सबंध निर्माण होतात. एकमेकांच्या सुखदु:खात ते सहभागी होतात यामुळे सभासदांना समूहजीवनाचा आनंद मिळतो.

९) **शहरी भागाचा विकास :** लोकसंख्येच्या केंद्रीकरणामुळे शहरात जागेची टंचाई निर्माण होते. जागेचे भाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने सर्वसामान्यांना आपल्या मर्यादित उत्पन्नातून जागा घेणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत सहकारी गृहनिर्माण संस्था या सभासदांचे घर बांधणीचे स्वप्न पूर्ण करतात.त्यामुळे शहरी भागाचा विकास होतो.

१०) **कर्ज पुरवठ्याची तरतूद :** सहकारी गृहनिर्माण संस्था आपल्या सभासदांना घरबांधणीसाठी आवश्यक असलेले कर्ज मिळविण्यास मदत करतात.बँका आणि वित्तीय संस्थांकडून कर्ज मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता करतात.उदा. जागेचे खरेदीखत, नकाशा, ७/१२ उतारा, घराची अंदाजे किंमत इ. वित्तीय संस्थांकडून कमी व्याजदराने सुलभ परतफेडीच्या हप्त्याने कर्जपुरवठा केला जात असल्याने सर्वसामान्यांचे घरबांधणीचे स्वप्न पूर्ण होते.

## ९.४ सहकारी गृहनिर्माण संस्थेची कार्ये (Functions of Housing Co-operative Society)




१) **गृहनिर्माण संस्थेसाठी जागा मिळविणे :** सध्याच्या काळात मोकळ्या जागेच्या किंमती भरमसाठ असल्याने सामान्य माणसाला घरासाठी जागा खरेदी करणे शक्य होत नाही. अशा स्थितीत सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापना केली जाते. गृहनिर्माण संस्थेला बांधकाम करण्यासाठी जागा मिळविणे हे अत्यंत महत्त्वाचे कार्य करावे लागते. शासन किंवा अधिकृत प्राधिकरण अथवा खाजगी व्यक्तिकडून आवश्यक कायदेशीर व इतर बाबींची पूर्तता करून संस्था घरांसाठी जागा मिळविते.

२) **संस्थेच्या नोंदणीसाठी आवश्यक ती पूर्तता करणे :** सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी करण्यासाठी आवश्यक कागद पत्रे व इतर गोष्टींची पूर्तता करून जिल्हा उपनिबंधक यांचेकडे अर्ज सादर करतात संस्था नोंदणी करून नोंदणीचे प्रमाणपत्र मिळवितात. निवाऱ्याची गरज असणाऱ्या किमान दहा व्यक्ती एकत्र येऊन संस्थेची नोंदणी करू शकतात.

३) **बांधकाम परवानगी मिळविणे :** गृहनिर्माण सहकारी संस्थेची नोंदणी करणे व जागा मिळविण्याबरोबरच संस्था ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या किंवा प्राधिकरणाच्या अधिकार कक्षेमध्ये आहे, अशा सर्व संबंधीत कार्यालयाकडून बांधकाम करण्यासाठी आवश्यक त्या परवानग्या मिळवाव्या लागतात.

४) **बांधकाम व्यावसायिकांबरोबर करार :** गृहनिर्माण सहकारी संस्था खाजगी व्यावसायिकाकडून बांधकाम करणार असेल तर, योग्य व चांगली विश्वासार्हता असणाऱ्या बांधकाम व्यावसायिकाबरोबर कायद्यानुसार करार करतात.

५) **बांधकाम साहित्याची खरेदी :** बांधकामासाठी आवश्यक साहित्य उदा. सिमेंट, वाळू , विटा, लोखंड इ. च्या किंमती भरमसाठ असतात. सहकारी गृहनिर्माण संस्था बांधकाम साहित्याची घाऊक दराने खरेदी करतात. त्यामुळे सभासदांना

वाजवी किंमतीत बांधकाम साहित्य उपलब्ध होते. बांधकामासाठी खर्च कमी येतो. यामुळे सभासदांच्या खर्चात बचत होते.

६) **आवश्यक सुविधा मिळविणे :** सहकारी गृहनिर्माण संस्था सभासदांसाठी आवश्यक नागरी व सामुदायिक सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न करतात. उदा. वीजपुरवठा, पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था, अंतर्गत रस्ते इत्यादी.

७) **दुरुस्ती व देखभाल :** सहकारी गृहनिर्माण संस्था घरांची, इमारतीची दुरुस्ती व देखभाल करण्याचे महत्त्वाचे कार्य करतात. सामुदायिक सुविधांसाठी, दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी सभासदांकडून योग्य तो देखभाल खर्च घेतला जातो. दुरुस्ती व देखभालीची कामे एकत्रितपणे केली जात असल्याने खर्चात बचत होते.

८) **हिशेब लेखन :** गृहनिर्माण सहकारी संस्थेंच्या जमा खर्चाची नोंद नियमानुसार ठेवण्याचे कार्य संस्थेमार्फत केले जाते. सभासदांना त्याचा तपशील सादर करणे, आवश्यकतेनुसार हिशोबाचे अंकेक्षण (Audit) करून घेणे इ. कार्ये करावी लागतात.

९) **गरजू सभासदांना तयार घरे पुरविणे :** काही गृहनिर्माण सहकारी संस्थेमार्फत तयार असणारी घरे गरजू व्यक्तिंना पुरविण्याचे कार्यही केले जाते. ज्या व्यक्तिंना गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या घरबांधणी प्रक्रियेमध्ये वेळ देणे शक्य नसते. अशा व्यक्तिंची घराची गरज यामधून पूर्ण होते.

१०) **सभासदांना शिक्षण :** सहकारी गृहनिर्माण संस्था सभासदांना शिक्षण देण्याचे महत्त्वाचे कार्य करतात. सहकारी गृहनिर्माण संस्थांची कार्यपद्धती याबाबत असणारे कायदे व नियम, सहकारी जीवनपद्धती, पर्यावरण संवर्धन व खर्चातील काटकसरी इ. बाबतचे व्यावहारिक शिक्षण सभासदांना मिळते.

**फरक – १) सहकारी पतपुरवठा संस्था व सहकारी गृहनिर्माण संस्था**

| अ.नं. | मुद्दे | सहकारी पतपुरवठा संस्था | सहकारी गृहनिर्माण संस्था |
|---|---|---|---|
| १) | अर्थ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तिंजवळील तारण स्वीकारून त्यांच्या सोयीस्कर अटींवर बँकिंग व्यवहार करणारी संस्था म्हणजे सहकारी पतपुरवठा संस्था होय. | राहण्यासाठीच्या घरांची गरज पूर्ण करणारी सहकारी तत्वावर स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय. |
| २) | स्थापना | प्रामुख्याने ग्रामीण भागात केली जाते. | प्रामुख्याने शहरी भागात केली जाते. |
| ३) | सभासदत्व | शेतकरी,शेतमजूर,लहान कारागीर यांना सभासदत्व दिले जाते. | अल्प व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्तिंना सभासदत्व दिले जाते. |
| ४) | उद्देश | सभासदांना योग्य व्याजदराने कर्ज पुरवठा करणे. | सभासदांचा घरांचा प्रश्न सोडवणे. |
| ५) | कार्यक्षेत्र | ग्रामीण व शहरी भागापुरते असते. | शहरापुरते मर्यादित असते. |
| ६) | कार्य | सभासदांना शेती उत्पादनासाठी कर्ज पुरवठा करणे. | सभासदांना राहण्यासाठी घरे उपलब्ध करून देणे. |

**फरक – २) सहकारी प्रक्रिया संस्था व सहकारी गृहनिर्माण संस्था**

| अ.नं. | मुद्दे | सहकारी प्रक्रिया संस्था | सहकारी गृहनिर्माण संस्था |
|---|---|---|---|
| १ | अर्थ | शेतमालावर प्रक्रिया करणे हा ज्या संस्थेचा मुख्य उद्देश असतो. तिला प्रक्रिया सहकारी संस्था असे म्हणतात. | निवाऱ्यासाठी घरांची गरज पूर्ण करणारी सहकारी तत्वावर स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय. |
| २ | स्थापना | प्रामुख्याने ग्रामीण भागात केली जाते. | प्रामुख्याने शहरी भागात केली जाते. |
| ३ | सभासदत्व | संबधित शेतमाल उत्पादक शेतकऱ्यांना सभासदत्व दिले जाते. | अल्प व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्तिंना सभासदत्व दिले जाते. |
| ४ | उद्देश | शेतमालावर प्रक्रिया करून योग्य किंमत मिळवून देणे. | सभासदांचा राहण्यासाठीच्या घरांचा प्रश्न सोडवणे. |
| ५ | कार्यक्षेत्र | प्रामुख्याने ग्रामीण भागात असते. | प्रामुख्याने शहरापुरते मर्यादित असते. |
| ६ | कार्य | शेतमालावर प्रक्रिया करणे व जोडव्यवसायाला चालना देणे. | सभासदांना राहण्यासाठी घरे उपलब्ध करून देणे. |



**कृती–**

**१) एखाद्या सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष किंवा सचिव यांच्या मुलाखतीच्या आधारे संस्थेच्या कार्याबाबत माहिती मिळवा.**

## ९.५ सारांश

निवाऱ्याची गरज असणाऱ्या व्यक्तींनी एकत्र येऊन घरांचे बांधकाम, दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी सहकार कायद्यानुसार स्थापन केलेली संस्था म्हणजेच सहकारी गृहनिर्माण संस्था होय.

"मर्यादित उत्पन्न असलेल्या व्यक्तींनी एकत्र येऊन आपल्या घराची गरज पूर्ण करण्यासाठी सहकारी तत्वानुसार स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय." महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० नुसार "आपल्या सभासदांना राहण्यासाठी घरे किवा सदनिका बांधून देणे,तसेच सभासदांना समान सुखसोयी आणि सेवा पुरविणे या उद्देशाने सहकारी तत्वावर स्थापन झालेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय."

- **सहकारी गृहनिर्माण संस्थेची वैशिष्ट्ये**

१. ऐच्छिक संघटन

२. वाजवी किंमतीमध्ये घर बांधणी

३. भांडवल उभारणी

४. लोकशाही व्यवस्थापन

५. मध्यस्थांचे उच्चाटन

६. बांधकाम, दुरुस्ती व देखभाल खर्चात बचत
७. सभासदांच्या बचत सवयीमध्ये वाढ
८. समूह जीवनाचा आनंद
९. शहरी भागांचा विकास
१०. कर्ज पुरवठ्याची तरतूद

◆ **सहकारी गृहनिर्माण संस्थेची कार्ये**

१. गृहनिर्माण संस्थेसाठी जागा मिळविणे
२. संस्थेच्या नोंदणीसाठी आवश्यक ती पूर्तता करणे
३. बांधकाम परवानगी मिळविणे
४. बांधकाम व्यावसायिकांबरोबर करार
५. बांधकाम साहित्याची खरेदी
६. आवश्यक सुविधा मिळवणे
७. दुरुस्ती व देखभाल
८. हिशेब लेखन
९. गरजू सभासदांना तयार घरे पुरविणे
१०. सभासदांना शिक्षण

## ९.६ महत्त्वाच्या संज्ञा

१) **गृहनिर्माण विकास वित्तीय महामंडळ – (HDFC)** सभासदांना घर बांधणीसाठी दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करणारे महामंडळ.

२) **गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ – (HUDCO)** नागरी भागातील सहकारी गृहनिर्माण प्रकल्पांना कर्जपुरवठा करते.

३) **भारतीय राष्ट्रीय सहकारी गृहनिर्माण महासंघ – (National Co-operative Housing Federation of India.)** ही राष्ट्रीय शिखर संस्था देशातील एकूण सहकारी गृहनिर्माण चळवळीला दिशा देण्याचे कार्य करते.

## ९.७ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) सहकारी गृहनिर्माण संस्था ही घरांची गरज असणाऱ्या व्यक्तिंकडून स्थापन केलेली ----- संस्था आहे.

अ) ऐच्छिक  ब) सक्तीची  क) अनावश्यक

२) मर्यादित उत्पन्न असलेल्या व्यक्तिंना सहकारी तत्त्वावर योग्य किंमतीत घरे पुरविणारी संस्था म्हणजे ----- संस्था होय.

अ) सहकारी विपणन  ब) शेती सहकारी  क) सहकारी गृहनिर्माण

३) मानवाची ----- ही एक मूलभूत गरज आहे.
   अ) नावलौकिक   ब) करमणूक   क) निवारा

४) सहकारी गृहनिर्माण संस्था सभासंदाना ----- मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देतात.
   अ) अल्प   ब) दीर्घ   क) मध्यम

## ब) योग्य जोड्या जुळवा

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| अ) पहिली गृहनिर्माण सहकारी संस्था | १) १९६९ |
| ब) राष्ट्रीय सहकारी गृहनिर्माण महासंघ स्थापना | २) गृहनिर्माण सहकारी संस्था |
| क) गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ स्थापना | ३) १९६० |
| ड) निवाऱ्याची सोय | ४) बेंगलोर को-ऑप सोसायटी लिमिटेड |
| | ५) १९४७ |
| | ६) १९७० |
| | ७) रॉश्डेल इक्विटेबल पायोनिअर्स सोसायटी लिमिटेड |
| | ८) सहकारी विपणन संस्था |

## क) खालील विधानांसाठी एक शब्द/शब्द समूह लिहा.

१) अन्न, वस्त्र या बरोबरच मानवाची तिसरी मूलभूत गरज
२) सभासदांना वाजवी किंमतीत घर उपलब्ध करून देणारी सहकारी संस्था
३) सहकारी गृहनिर्माण संस्थांचे कामकाज ज्या तत्वानुसार चालते ते तत्त्व
४) निवाऱ्याची सोय उपलब्ध करून देणारी सहकारी संस्था

## ड) खालील विधाने चूक किंवा बरोबर ते लिहा.

१) सहकारी गृहनिर्माण संस्था सभासदांना अल्प मुदतीचा कर्जपुरवठा करतात.
२) सहकारी गृहनिर्माण संस्था ही एक ऐच्छिक संघटना आहे.
३) शहरी भागात सहकारी गृहनिर्माण संस्थेला फारसे महत्त्व नाही.
४) सहकारी गृहनिर्माण संस्थाचे कार्य हुकूमशाही तत्वानुसार चालते.

## इ) खालील विधाने पूर्ण करा.

१) सहकारी तत्वावर घरबांधणी करणारी संस्था म्हणजे ......... संस्था होय.
२) सहकारी गृहनिर्माण संस्थांमुळे सभासदांना ............ किंमतीत घरे उपलब्ध होतात.
३) सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सर्व निर्णय ................ पद्धतीने घेतले जातात.
४) गृहनिर्माण सहकारी संस्था प्रामुख्याने ......... भागात स्थापन केल्या जातात.
५) गृहनिर्माण सहकारी संस्था सभासदांना ............ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देतात.

**(फ) अचूक पर्याय निवडा.**

| | |
|---|---|
| १) पहिली गृहनिर्माण सहकारी संस्था | |
| २) | राष्ट्रीय शिखर संस्था |
| ३) | घरबांधणीला कर्ज पुरवठा |
| ४) सहकारी गृहनिर्माण संस्था | |
| ५) | सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी |

जिल्हा उपनिबंधक, वाजवी किंमतीत घर, गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ, राष्ट्रीय सहकारी गृहनिर्माण महासंघ, बेंगलोर को. ऑप. सोसायटी लि.

**ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सहकारी गृहनिर्माण संस्था प्रामुख्याने कोणत्या भागात स्थापन होतात?

२) सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापनेचा मुख्य हेतू कोणता?

३) गृहनिर्माण सहकारी संस्था म्हणजे काय?

४) सहकारी गृहनिर्माण संस्था कोणत्या सुविधा उपलब्ध करून देतात?

**ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करुन वाक्य पुन्हा लिहा.**

१) सहकारी गृहनिर्माण संस्था प्रामुख्याने खेड्यात स्थापन केल्या जातात.

२) जास्त उत्पन्न गटातील व्यक्तिंना सहकारी गृहनिर्माण संस्था गरजेच्या असतात.

३) सहकारी गृहनिर्माण संस्था सभासदांना अल्प मुदतीचा कर्जपुरवठा करतात.

४) सहकारी विपणन संस्था निवाऱ्याची गरज पूर्ण करतात.

५) भारतात पहिली गृहनिर्माण सहकारी संस्था रॉश्डेल इक्विटेबल पायोनिअर्स सोसायटी लिमिटेड या नावाने स्थापन झाली.

**ई) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) अ) भारतीय आर्युविमा महामंडळ  ब) गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ
क) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया  ड) गृहनिर्माण विकास वित्तीय महामंडळ

**प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.**

१) सहकारी गृहनिर्माण संस्था

२) भारतीय राष्ट्रीय सहकारी गृहनिर्माण महासंघ

**प्र.३ स्वमत लिहा. / उपयोजनावर आधारित प्रश्न.**

१) ''सहकारी गृहनिर्माण संस्था सर्वसामान्य व्यक्तिंच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत''.

२) ''सहकारी गृहनिर्माण संस्थांमुळे मध्यमवर्गीय व्यक्तिंची स्वमालकीच्या निवाऱ्याची समस्या दूर झालेली आहे.

**प्र.४ फरक स्पष्ट करा.**

१) सहकारी पतपुरवठा संस्था आणि सहकारी गृहनिर्माण संस्था

२) सहकारी विपणन संस्था आणि सहकारी गृहनिर्माण संस्था

३) सहकारी गृहनिर्माण संस्था आणि सहकारी प्रक्रिया संस्था

४) सहकारी गृहनिर्माण संस्था आणि सेवा सहकारी संस्था

**प्र.५ टीपा लिहा.**

१) सहकारी गृहनिर्माण संस्था

२) सहकारी गृहनिर्माण संस्थेची वैशिष्ट्ये

३) सहकारी गृहनिर्माण संस्थेची कार्ये

**प्र.६ कारणे लिहा.**

१) सहकारी गृहनिर्माण संस्थांमुळे सामान्य व्यक्तिंना घर खरेदी करणे सुलभ झाले आहे.

२) शहरी भागात सहकारी गृहनिर्माण संस्थांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

३) गृहनिर्माण सहकारी संस्थांमुळे मध्यस्थांचे उच्चाटन होण्यास मदत होते.

४) गृहनिर्माण सहकारी संस्थेमुळे घराचे स्वप्न पूर्ण होते.

**प्र.७ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) सहकारी गृहनिर्माण संस्थांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) सहकारी गृहनिर्माण संस्थेची कार्ये लिहा.

**प्र.८ दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) सहकारी गृहनिर्माण संस्थेची व्याख्या सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) सहकारी गृहनिर्माण संस्थेचा अर्थ सांगून कार्ये सविस्तर लिहा.

# १०. ग्राहक सहकारी संस्था

## Consumers Co-operative Society

| | | | |
|---|---|---|---|
| १०.१ | प्रस्तावना | १०.५ | प्रकार |
| १०.२ | अर्थ आणि व्याख्या | १०.६ | सारांश |
| १०.३ | वैशिष्ट्ये | १०.७ | महत्त्वाच्या संज्ञा |
| १०.४ | कार्ये | १०.८ | स्वाध्याय |



ग्राहक सहकारी संस्था

### १०.१ प्रस्तावना (Introduction)

जागतिक सहकारी चळवळीचा उगम मुळातच सहकारी ग्राहक संस्थांच्या स्थापनेतून झालेला दिसून येतो. इ.स. १८४४ मध्ये इंग्लंडमधील रॉश्डेल येथे २८ विणकरांनी एकत्र येऊन 'रॉश्डेल इक्विटेबल पायोनिअर्स सोसायटी लिमिटेड' ची स्थापना केली. भारतामध्ये पहिले सहकारी ग्राहक भांडार २०सप्टेंबर, १९०५ रोजी चेन्नई (मद्रास) येथे स्थापन झाले. 'ट्रिप्लिकेन अर्बन को. ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड' या नावाच्या संस्थेने भारतातील पहिल्या ग्राहक सहकारी संस्थेची मुहूर्तमेढ रोवली.

दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या काळात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाली. त्या वेळी शासनाने नियंत्रित दरात अन्नधान्य व इतर वस्तूंच्या वितरणाची जबाबदारी सहकारी ग्राहक संस्थांवर सोपविली.

ग्राहकांना चांगल्या प्रतीचा माल योग्य किंमतीत मिळावा म्हणून ग्राहक भांडाराची स्थापना केली जाते. ग्राहक सहकारी संस्था आपल्या सभासदांना लागणारा माल थेट उत्पादकांकडून खरेदी करते. त्यामुळे मालाच्या वितरणात असणारे मध्यस्थ, व व्यापाऱ्यांचे उच्चाटन होते. थेट उत्पादकांकडून माल खरेदी केल्याने ग्राहक भांडाराला माल कमी किंमतीत मिळतो. त्यामुळे

या संस्था आपल्या सभासदांना वाजवी किंमतीत माल पुरवितात. ग्राहक सहकारी संस्था नफा मिळविण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या नसतात, म्हणून ते भेसळ करीत नाहीत. ग्राहकांना चांगल्या प्रतीचा माल वाजवी किंमतीत व आवश्यक त्यावेळी मिळू शकतो. ग्राहक सहकारी भांडारातून मिळणाऱ्या फायद्यामधून ग्राहक सहकारी संस्थेचा विकास झाला.

सर्वसामान्य ग्राहकांना त्यांच्या दैनंदिन गरजेच्या वस्तू व सेवा रास्तदराने उपलब्ध करून देण्यासाठी सहकारी ग्राहक संस्थांची भूमिका खूप महत्त्वाची आहे. त्यादृष्टीने ग्राहकांच्या संरक्षणासाठी व हितासाठी भारत सरकारने इ.स.१९८६ मध्ये ग्राहक संरक्षण कायदा लागू केला आहे. २४ डिसेंबर हा दिवस "राष्ट्रीय ग्राहक दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. तसेच १५ मार्च हा 'जागतिक ग्राहक दिन' म्हणून पाळला जातो. महाराष्ट्रात मार्च २०१८ अखेर ग्राहक सहकारी संस्थांची संख्या २,१२५ इतकी होती.

ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असतो. ग्राहक बाजारपेठेचा राजा असला तरी त्याचे होणारे शोषण ही नित्याची बाब झाली आहे. या प्रकरणात आपण ग्राहक सहकारी संस्थेचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

## १०.२ अर्थ व व्याख्या : Meaning and Definition

### अर्थ :

ग्राहकांनी स्वेच्छेने एकत्र येऊन लोकशाही पद्धतीने सहकारी तत्त्वावर आपल्या आर्थिक हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी एकत्र येऊन स्थापन केलेली संस्था म्हणजे ग्राहक सहकारी संस्था होय.

ग्राहक सहकारी संस्थेचा मुख्य हेतू उत्पादकापासून अंतिम उपभोक्त्यांपर्यत असलेल्या वितरण साखळीतील घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, मध्यस्थ, दलाल, यांचे उच्चाटन करणे. आणि ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणे हा असतो. ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार निर्भेळ व दर्जेदार वस्तू रास्त किमतींला उपलब्ध करून दिल्या जातात.

बहुतेक ग्राहक सहकारी संस्था या रॉश्डेल प्रणित सहकारी तत्त्वानुसार कार्य करतात. खाजगी व्यापाऱ्यांच्या मक्तेदारी, साठेबाजी, भेसळ इ. सारख्या वाईट प्रवृत्तींना आळा घालून ग्राहकांची होणारी पिळवणूक थांबवून ग्राहकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी या संस्था सतत प्रयत्नशील असतात.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील मालाच्या वितरणात असणारे दोष दूर करण्याकरिता ग्राहकांना संघटितपणे प्रयत्न करावे लागतात. ग्राहकांना चांगल्या मालाचा योग्य किंमतीत पुरवठा व्हावा म्हणून ग्राहक सहकारी संस्थांची स्थापना केली जाते.

### व्याख्या :

ग्राहक सहकारी संस्थेच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) ''ग्राहकांना निर्भेळ व दर्जेदार जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा व्हावा या उद्देशाने स्वेच्छेने व परस्पर सहकार्याने सहकारी तत्त्वावर स्थापन केलेली संस्था म्हणजे ग्राहक सहकारी संस्था होय.''

२) ''ग्राहकांनी स्वेच्छेने एकत्र येऊन परस्परांच्या हितांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी लोकशाही आणि सहकारी तत्त्वावर स्थापन केलेली ग्राहकांची आर्थिक संघटना म्हणजे ग्राहक सहकारी संस्था होय.''

३) ''ग्राहकांनी आपल्या गरजा भागविण्यासाठी उपभोग्य वस्तू व सेवा मिळविण्यासाठी स्वेच्छेने स्थापन केलेले संघटन म्हणजे सहकारी ग्राहक संस्था होय.''

## १०.३ ग्राहक सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये. (Features of Consumer Co-operative Society)

❑ **ग्राहक सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.**

**१) स्थापना :** ग्राहक सहकारी संस्था आपल्या ग्राहकांना जीवनावश्यक व उपभोग्य वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी स्थापन केलेल्या असतात. ग्राहक हे विविध भागात विखुरलेले असल्याने ग्राहक सहकारी संस्था ह्या ग्रामीण व शहरी भागात स्थापन झालेल्या आढळून येतात.

**• ग्राहक सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये**

१) स्थापना
२) ग्राहकांचे स्वेच्छा संघटन
३) रोखीने व्यवहार
४) ग्राहकांना दर्जेदार व निर्भेळ वस्तूंचा पुरवठा
५) लोकशाही पद्धतीने कारभार
६) नफेखोरीला आळा
७) राहणीमानात सुधारणा
८) रास्त किंमत
९) संघटनात्मक संरचना
१०) उत्पादकाकडून मालाची खरेदी

२) **ग्राहकांचे स्वेच्छा संघटन :** ग्राहक सहकारी संस्था ग्राहकांनी त्यांच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी स्वेच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेली असते. भांडवलदाराकडून ग्राहकांचे होणारे शोषण व खाजगी व्यापाऱ्यांच्या पिळवणूकीपासून ग्राहकांना मुक्त करण्यासाठी या संस्था स्थापन केल्या जातात.

३) **रोखीने व्यवहार :** ग्राहक सहकारी भांडारामध्ये मालाची विक्री केवळ रोखीनेच केली जाते. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी उधारीवर माल विकण्याची किंवा अधिक नफा मिळविण्याची कार्यपद्धती या संस्थांमार्फत स्वीकारली जात नाही. रोखीने व्यवहार केल्यास संस्थेची आर्थिक स्थिती चांगली राहते.

४) **ग्राहकांना दर्जेदार व निर्भेळ वस्तूंचा पुरवठा :** ग्राहक सहकारी संस्थेमार्फत ग्राहकांसाठी आवश्यक वस्तूची खरेदी उत्पादकांकडून केली जाते, त्यामुळे मध्यस्थांचे उच्चाटन झाल्याने मालाचा थेट पुरवठा उपभोक्त्यांना होतो. बऱ्याचदा व्यापारी वर्गाकडून मालात भेसळ केली जाते. ग्राहकांची होणारी फसवणूक टाळली जाते व उत्तम दर्जाच्या निर्भेळ व दर्जेदार वस्तू वाजवी किंमतीत पुरविल्या जातात .

५) **लोकशाही पद्धतीने कारभार :** ग्राहक सहकारी संस्था ग्राहकांनी एकत्र येऊन स्वेच्छेने स्थापन केलेले सहकारी तत्वावरील लोकशाही संघटन असते. संस्थेचा दैनंदिन कारभार चालविण्यासाठी तसेच संस्थेचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सभासदांमधून संचालक मंडळाची निवड केली जाते. हे संचालक मंडळ संस्थेचा दैनंदिन कारभार लोकशाही पद्धतीने चालवितात.

६) **नफेखोरीला आळा :** ग्राहक सहकारी संस्था सेवेला प्राधान्य देतात. नफा कमविणे हा त्यांचा हेतू नसतो. संस्थांच्या वतीने विकल्या जाणाऱ्या वस्तूच्या खरेदी किंमतीमध्ये अल्प नफा मिळविला जातो. त्यातून केवळ दैनंदिन खर्च व व्यवस्थापकीय खर्च वसूल होऊन अल्पसा नफा मिळेल अशाच किंमती आकारल्या जातात. या

संस्था नफेखोरीला आळा घालण्याचा प्रयत्न करतात. संस्थेला झालेला नफा सभासदांमध्ये त्यांनी संस्थेबरोबर केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात वाटला जातो.

७) **राहणीमानात सुधारणा :** ग्राहक सहकारी संस्था सभासदांना उच्च प्रतीच्या निर्भेळ व दर्जेदार मालाचा पुरवठा करीत असल्याने ग्राहकांचे आरोग्य व राहणीमानाचा दर्जा सुधारतो.

८) **रास्त किंमत :** खाजगी व्यापारी वस्तूंची साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण करतात आणि वस्तूंचा काळाबाजार करून जास्तीत जास्त दराने वस्तूंची विक्री करून अवास्तव नफा कमवितात. हे थांबविण्यासाठी ग्राहक सहकारी संस्थांची स्थापना केली जाते. दैनंदिन गरजेच्या वस्तू वाजवी किंमतीला पुरविण्याचे काम या संस्था करतात.

९) **संघटनात्मक संरचना :** भारतातील ग्राहक सहकारी संस्थांची संघीय रचना ही चार स्तरीय आहे. राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघ, राज्य स्तरावर राज्य सहकारी ग्राहक संघ, जिल्हा स्तरावर घाऊक/केंद्रिय सहकारी ग्राहक भांडारे व प्राथमिक स्तरावर प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारे कार्य करतात.

१०) **उत्पादकाकडून मालाची खरेदी :** समाजाला अथवा सभासदांना जीवनावश्यक व उपभोग्य वस्तूचा पुरवठा करण्यासाठी मालाची थेट उत्पादक किंवा कारखानदारांकडून खरेदी केली जाते. काही वस्तूंचे उत्पादन संस्था स्वत: करते त्यामुळे मालाच्या खरेदी किंमतीत बचत होऊन वाजवी किंमतीमध्ये ग्राहकांना मालाचा पुरवठा केला जातो.



**कृती–**

**१) तुमच्या परिसरातील ग्राहक सहकारी संस्थेबाबत माहिती गोळा करा.**

## १०.४ ग्राहक सहकारी संस्थांची कार्ये (Functions of Consumers Co-operative Societies) :

**• ग्राहक सहकारी संस्थांची कार्ये**

१) ग्राहकांचे हित जोपासणे
२) जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन
३) अनिष्ट व्यापारी प्रथांचे उच्चाटन
४) निर्भेळ व दर्जेदार मालाचा पुरवठा
५) उचित व्यापारी प्रथांची जोपासना
६) मध्यस्थांचे उच्चाटन
७) मक्तेदारीला आळा
८) किंमत पातळीत स्थिरता
९) सभासद शिक्षण
१०) शासनाचे प्रतिनिधीत्व करणे

- **ग्राहक सहकारी संस्थांची कार्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.**

१) **ग्राहकांचे हित जोपासणे :** ग्राहकाचे हित जोपासणे हे महत्त्वाचे कार्य आहे. आपल्या सभासदांना उत्तम दर्जाच्या वस्तू रास्त दरात पुरविणे तसेच निर्भेळ माल व दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा नियमितपणे पुरवठा करणे.

२) **जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन :** ग्राहक सहकारी संस्थांनी केवळ वस्तू विक्रीचे कार्य केले तर ते वस्तूंच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्यास उपयुक्त ठरणार नाही. म्हणून या संस्थांनी जीवनावश्यक वस्तूंचेही उत्पादन करण्यास सुरुवात केली आहे. वस्तूंचे उत्पादन कमीत कमी किंमतीत कशा प्रकारे करता येईल याचा विचार या संस्था करीत असतात.

३) **अनिष्ट व्यापारी प्रथांचे उच्चाटन :** वस्तूंच्या वाटप व्यवस्थेत खाजगी व्यापाऱ्यांद्वारे केली जाणारी फसवणूक, मालातील भेसळ, काळा बाजार, कृत्रिम टंचाई, खोटी वजन मापे, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती इ. अनिष्ट प्रथांचे उच्चाटन ग्राहक सहकारी संस्था करतात आणि थेट उत्पादकांकडून मालाची खरेदी करून त्याची विक्री ग्राहकांना करतात.

४) **निर्भेळ व दर्जेदार मालाचा पुरवठा :** व्यापारी बऱ्याचदा जास्त नफा कमविण्यासाठी मालामध्ये भेसळ करतात. तसेच ते वस्तूच्या दर्जाविषयी व गुणवत्तेविषयी खात्री देत नाहीत. तेव्हा ग्राहक सहकारी संस्था उच्च गुणवत्ता व दर्जा असणाऱ्या वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी प्रत्यक्ष उत्पादकांकडून मालाची खरेदी करतात. त्यामुळे मालातील भेसळीला पायबंद बसतो. ग्राहकांना निर्भेळ व दर्जेदार वस्तूंचा पुरवठा करतात.

५) **उचित व्यापारी प्रथांची जोपासना :** ग्राहक सहकारी संस्था समाजाला योग्य निर्भेळ व दर्जेदार मालाचा पुरवठा करतात. मागणीनुसार मालाचा पुरवठा करणे, योग्य किंमत आकारणे, कृत्रिम टंचाई व काळा बाजार टाळणे इ. द्वारे उचित व्यापारी प्रथा जोपासल्या जातात.

६) **मध्यस्थांचे उच्चाटन :** अनेक आर्थिक व्यवहारात मध्यस्थांची संख्या खूप मोठी असते. मध्यस्थ वर्ग उत्पादक व ग्राहक या दोघांची फसवणूक करीत असतो. ग्राहक सहकारी संस्था वस्तू वितरणाच्या साखळीतील घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी आणि इतर मध्यस्थांशी संबंध न ठेवता प्रत्यक्ष उत्पादकाकडून वस्तूची खरेदी करते. अशी वस्तू प्रत्यक्ष ग्राहकांना व सभासदांना विकल्यामुळे मध्यस्थांचे उच्चाटन होते.

७) **मक्तेदारीला आळा :** ग्राहक सहकारी संस्था आपल्या सभासदांचे हित डोळ्यासमोर ठेवून कार्य करतात. काही जीवनावश्यक व दुर्मिळ वस्तूचे स्वबळावर उत्पादन करून त्या वस्तू ग्राहकांना उपलब्ध करून देतात. त्यामुळे साहजिकच बाजारातील मक्तेदारीवर नियंत्रण ठेवणे शक्य होते व ग्राहकांच्या हिताचे संरक्षण होते.

८) **किंमत पातळीत स्थिरता :** खाजगी व्यापारी मोठया प्रमाणावर नफा मिळवितात आणि वस्तूंची कृत्रिम टंचाई निर्माण करून वस्तूंची किंमत वाढवितात. त्यामुळे ग्राहकांच्या खर्चात वाढ होते. ग्राहक सहकारी संस्था वस्तूंचे योग्य प्रकारे वितरण करण्याचा व किंमत पातळी स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करतात.

९) **सभासद शिक्षण :** सभासदांना काटकसरीचे व बचतीचे महत्त्व पटवून देणे, लोकशाही मूल्यांचे शिक्षण देणे, सहकाराचे महत्त्व पटवून देणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना संरक्षण देणे व त्यांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणणे इ. कार्ये सभासद शिक्षणाच्या माध्यमातून केली जातात.

१०) **शासनाचे प्रतिनिधीत्व करणे :** ग्राहक सहकारी संस्था या शासन, सार्वजनिक क्षेत्र आणि सहकारी क्षेत्र या मधील संस्थांचे प्रतिनिधीत्व करतात. त्यासाठी प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था नियंत्रित व जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करणे, संलग्न संस्थांच्या वतीने ग्राहकांच्या गरजेनुसार मालाची आयात करणे इ. कार्ये करतात. तेंव्हा सामान्य व्यक्तिंना नियंत्रित दराने वस्तू देऊन सामाजिक न्यायाचेही कार्य करतात.



कृती–

२) खाजगी व्यापारी ग्राहकांचे कशाप्रकारे शोषण करतात याबाबत शिक्षकांशी चर्चा करा.

## १०.५ ग्राहक सहकारी संस्थाचे प्रकार (Types of Consumer Co-operative Society) :

१) **प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था :** वास्तविक ग्राहक संस्था याचा अर्थ प्राथमिक ग्राहक संस्था असाच आहे. ज्या संस्था ग्राहकास वस्तू विकण्याचे कार्य करतात. त्या संस्थांना प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था असे म्हणतात. ग्राहकांनी एकत्र येऊन या संस्था स्थापन केलेल्या असतात. या संस्थांना वस्तूंचा पुरवठा मुख्यत: घाऊक सहकारी भांडारातून केला जातो. किरकोळ विक्री ही या संस्थाचे महत्वाचे कार्य आहे. या संस्था आपल्या सभासदांना पूरक सेवा पुरवितात. या संस्थाची स्थापना ग्रामीण व शहरी भागात केली जाते. ग्राहकांना दैनंदिन गरजेच्या निर्भेळ वस्तू वाजवी किमंतीत व वेळेवर पुरविणे हे प्राथमिक ग्राहक सहकारी भांडाराचे उद्दिष्ट असते.

२) **मध्यवर्ती ग्राहक भांडारे/सुपर बाजार/जनता बाजार/विभागीय भांडारे :** मोठमोठ्या शहरांमध्ये ग्राहकांना विविध प्रकारच्या सर्व वस्तू एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी अनेक विभाग असलेली मोठी भांडारे असतात. त्यांना मध्यवर्ती ग्राहक भांडारे/सुपर बाजार/जनता बाजार/विभागीय भांडार असे म्हणतात. सहकारी ग्राहक संस्था म्हणूनच भांडाराची नोंदणी झालेली असते.




भारतात पहिला सुपर बाजार दिल्ली येथे १५ जुलै, १९६६ रोजी स्थापन झाला. अशा प्रकारच्या भांडाराची स्थापना मुंबई, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई, बेंगलोर, पुणे, नागपूर अशा शहरामध्ये दिसून येते. परंतु आता जिल्ह्याच्या ठिकाणी सुद्धा असे बाजार सुरू झाले आहेत. दिल्लीतील सुपर बाजार हा भारतातील सर्वात मोठा सुपर बाजार आहे. या भांडारातून एकाच छताखाली कापड, औषधे, स्वयंचलित यंत्राचे सुट्टे भाग, सौंदर्यप्रसाधने, दूरचित्रवाणी, इलेक्ट्रिकल उपकरणे, तयार कपडे, किराणामाल इ. वस्तूंचा पुरवठा केला जातो.

३) **विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडारे :** शाळा, महाविद्यालये अथवा विद्यापीठ पातळीवर विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन सहकारी तत्वावर स्थापन केलेल्या संस्थेस 'विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार' असे म्हणतात. सन १९६७ पासून या भांडाराच्या स्थापनेचा कार्यक्रम सुरू करण्यात आला. त्यासाठी राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाकडून कर्ज व अनुदान दिले जाते. या भांडारातून विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पाठ्यपुस्तके, संदर्भ पुस्तके, शास्त्रीय उपकरणे, पुस्तक पेढी योजना, शैक्षणिक साहित्य इ. साहित्य सवलतीच्या दराने दिले जाते. या भांडाराच्या सभासदत्वासाठी वयाची अट नसते. विद्यापीठातून व महाविद्यालयांतून सहकारी तत्त्वावर ग्राहक भांडारे स्थापन करण्यास सरकारने उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारले आहे.

याशिवाय औद्योगिक कामगारांच्या सहकारी संस्था व ग्रामीण जनतेसाठी ग्राहक भांडारे इ. ग्राहक संघटना दिसून येतात.

ग्राहक व उत्पादक यांचा थेट संबंध आल्याशिवाय व त्यांच्यातील व्यावसायिक अंतर कमी झाल्याशिवाय ग्राहक सहकारी संस्थांचा अपेक्षित विकास होऊ शकत नाही.

**फरक – १) सहकारी पतपुरवठा संस्था व ग्राहक सहकारी संस्था**

| अ.न. | मुद्दे | सहकारी पतपुरवठा संस्था | ग्राहक सहकारी संस्था |
|---|---|---|---|
| १) | **अर्थ** | सहकारी पतपुरवठा संस्था म्हणजे सहकारी तत्त्वावर शेती व्यवसायाच्या विकासासाठी कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था होय. | ग्राहकांना त्यांच्या दैनंदिन जीवनावश्यक वस्तू व सेवा रास्त दराने उपलब्ध करून देण्यासाठी सहकारी तत्वावर ग्राहक स्वेच्छेने एकत्र येऊन ज्या संस्थेची स्थापना करतात तिला ग्राहक सहकारी संस्था असे म्हणतात. |
| २) | **उद्देश** | ग्रामीण भागातील सभासद शेतकऱ्यांची सावकारी पाशातून मुक्तता करणे. | खाजगी व्यापाऱ्यांकडून अनिष्ट मार्गाने होणारे ग्राहकांचे शोषण थांबविणे. |
| ३) | **स्थापना** | प्रामुख्याने ग्रामीण भागात स्थापन केली जाते. | प्रामुख्याने शहरी भागात स्थापन केली जाते |
| ४) | **कार्यक्षेत्र** | एका गावापुरते किंवा ४ ते ५ कि.मी कार्यक्षेत्र असते. | नागरी व ग्रामीण अशा दोन्ही भागात कार्यक्षेत्र असते. |
| ५) | **सभासदत्व** | कार्यक्षेत्रातील सीमांत व अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर व समाजातील दुर्बल घटकांना सभासदत्व दिले जाते | सर्वसामान्य ग्राहक स्वेच्छेने एकत्र येऊन अशा संस्थांचे सभासद होतात. |
| ६) | **कार्ये** | आपल्या सभासदांना व्यावसायिक व दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदी करण्यासाठी कर्ज पुरवठा करणे व सावकारी पाशातून शेतकऱ्यांची मुक्तता करणे. | वस्तूच्या किंमतीत स्थिरता, मक्तेदारीस आळा, अनिष्ट व्यापारी प्रथांचे उच्चाटन व ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करून दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे. |

### फरक– २) विपणन सहकारी संस्था व गृहनिर्माण सहकारी संस्था व ग्राहक सहकारी संस्था

| अ.न. | मुद्दे | विपणन सहकारी संस्था | गृहनिर्माण सहकारी संस्था | ग्राहक सहकारी संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | अर्थ | शेतमालास योग्य भाव मिळावा व शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण व्हावे या हेतूने शेतमालाच्या खरेदी-विक्री संबंधित आवश्यक कार्ये सहकारी तत्त्वावर पार पाडण्याच्या हेतूने शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या संस्थांना विपणन सहकारी संस्था म्हणतात. | राहण्यासाठी घरांची गरज पूर्ण करणारी सहकारी तत्त्वावर स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय. | ग्राहकांना त्यांच्या दैनंदिन जीवनावश्यक वस्तू व सेवा रास्त दराने उपलब्ध करून देण्यासाठी व ग्राहकांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी सहकारी तत्त्वावर ग्राहक स्वेच्छेने एकत्र येऊन ज्या संस्थेची स्थापना करतात तिला ग्राहक सहकारी संस्था म्हणतात. |
| २ | सभासदत्व | मुख्यत: शेतकरी हे विपणन सहकारी संस्थेचे सभासद असतात. | निवाऱ्याची गरज असलेल्या अल्प व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्ति सभासद असतात. | सर्वसामान्य ग्राहक हे या संस्थेचे सभासद असतात. |
| ३ | उद्‌देश | शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला रास्त किंमत मिळवून देणे हा संस्थेचा मुख्य उद्‌देश असतो. | सर्वसामान्य व्यक्तिंच्या घराचा प्रश्न सोडविणे त्यांना वाजवी किंमतीत घरे उपलब्ध करून देणे हा या संस्थेचा उद्‌देश असतो. | ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करणे हा या संस्थेचा मुख्य उद्‌देश असतो. |
| ४ | स्थापना | विपणन सहकारी संस्था शहरी व ग्रामीण भागात स्थापन केल्या जातात. | गृहनिर्माण सहकारी संस्था शहरी व निमशहरी भागात स्थापन केल्या जातात. | शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागात ग्राहक संस्था स्थापन केल्या जातात. |
| ५ | कार्ये | मालाचे एकत्रीकरण, प्रतवारी, प्रमाणीकरण, बांधणी, वाहतूक व्यवस्था करणे, शेतमालाची खरेदी विक्री करणे, योग्य किंमत मिळवून देणे. इ. कार्ये करतात. | सभासदांना राहण्यासाठी घरे उपलब्ध करून देणे हे गृहनिर्माण सहकारी संस्थेचे कार्य आहे. | वस्तूंच्या किंमतीत स्थिरता, मक्तेदारीस आळा, अनिष्ट प्रथांचे उच्चाटन, ग्राहकांच्या हितांचे संरक्षण करून दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे इ. कार्ये करतात. |

## १०.६ सारांश

जीवनावश्यक दर्जेदार वस्तू व सेवा रास्त दराने उपलब्ध करून देण्यासाठी स्वेच्छेने स्थापन केलेली संस्था म्हणजे प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था होय. सन १९०५ मध्ये पहिले ग्राहक सहकारी भांडार चेन्नई येथे सुरू झाले. ग्राहक सहकारी संस्था सभासदांना निर्भेळ माल वाजवी किंमतीत उपलब्ध करून देतात.

ग्राहकांनी स्वेच्छेने एकत्र येऊन लोकशाही पद्धतीने सहकारी तत्वावर आपल्या आर्थिक हितसबंधाचे संरक्षण करण्यासाठी एकत्र येऊन स्थापन केलेली संस्था म्हणजे ग्राहक सहकारी संस्था होय.

व्याख्या :– "ग्राहकांनी आपल्या गरजा भागविण्यासाठी उपभोग्य वस्तू व सेवा मिळविण्यासाठी स्वेच्छेने स्थापन केलेले संघटन म्हणजे ग्राहक सहकारी संस्था होय."

- **वैशिष्ट्ये :**

१ स्थापना
२ ग्राहकांची स्वेच्छा संघटना
३ रोखीने व्यवहार
४ ग्राहकांना निर्भेळ व दर्जेदार वस्तूंचा पुरवठा
५ लोकशाही पद्धतीने कारभार
६ नफेखोरीला आळा
७ राहणीमानात सुधारणा
८ रास्त किंमत
९ संघटनात्मक सरंचना
१० उत्पादकांकडून मालाची खरेदी

- **कार्ये :–**

१ ग्राहकांचे हित जोपासणे
२ जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन
३ अनिष्ट व्यापारी प्रथांचे उच्चाटन
४ निर्भेळ व दर्जेदार मालाचा पुरवठा
५ उचित व्यापारी प्रथांची जोपासना
६ मध्यस्थांचे उच्चाटन
७ मक्तेदारीला आळा
८ किंमत पातळीत स्थिरता
९ सभासद शिक्षण
१० शासनाचे प्रतिनिधीत्व करणे

- **प्रकार :**

१ प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था
२ सुपरबाजार
३ विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडारे

## १०.७ महत्त्वाच्या संज्ञा

**सुपर बाजार :**

विविध प्रकारच्या वस्तूंची विक्री एकाच छताखाली केली जाते, म्हणून त्यांना 'विभागीय भांडार'/ 'सुपर बाजार' असे म्हणतात.

**विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार :**

शाळा, महाविद्यालये व विद्यापीठ पातळीवर विद्यार्थ्यांनी एकत्रित येऊन सहकारी तत्त्वावर स्थापन केलेल्या संस्थेस 'विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार' असे म्हणतात.

## १०.८ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) ग्राहक सहकारी संस्था दर्जेदार वस्तूंचा पुरवठा ----- किंमतीला करतात.
अ) वाजवी ब) अधिक क) अवाजवी

२) ग्राहक सहकारी संस्था ----- कडून वस्तूंची खरेदी करतात.
अ) किरकोळ विक्रेते ब) उत्पादक क) घाऊक विक्रेते

३) राष्ट्रीय ग्राहक दिन ----- या दिवशी साजरा केला जातो.
अ) ५ जून ब) २६ जानेवारी क) २४ डिसेंबर

४) जगातील पहिली ग्राहक सहकारी संस्था ----- या देशात सुरू झाली.
अ) इंग्लंड ब) जर्मनी क) भारत

५) जगातील पहिली ग्राहक सहकारी संस्था ----- साली स्थापन झाली.
अ) १८४४ ब) १९०५ क) १९२०

६) ग्राहक सहकारी संस्था ग्राहकांना ----- वस्तूंचा पुरवठा करतात.
अ) चैनीच्या ब) जीवनावश्यक क) भेसळयुक्त

७) ग्राहक सहकारी संस्थांमुळे वस्तू वितरणाच्या साखळीतील ----- उच्चाटन होते.
अ) उत्पादकांचे ब) ग्राहकांचे क) मध्यस्थांचे

८) जगातील पहिले ग्राहक भांडार ----- हे होय.
अ) रॉश्डेल पायोनिअर्स ब) जनता बाजार क) मुंबई बाजार

**ब) योग्य जोडया जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| अ) भारतातील पहिला सुपर बाजार | १) २४ डिसेंबर |
| ब) राष्ट्रीय ग्राहक दिन | २) दिल्ली |
| क) विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार | ३) ५ जून |
| ड) ग्राहक सहकारी संस्था | ४) मुंबई |
| | ५) नोकरदारांसाठी भांडार |
| | ६) ग्राहकांचे संरक्षण |
| | ७) ग्राहकांचे शोषण |
| | ८) शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी |

**क) खालील विधानांसाठी एक शब्द/शब्दसमूह लिहा .**

१) विभिन्न प्रकारच्या सर्व वस्तू एकाच भांडारात उपलब्ध करून देणारी संस्था

२) विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर सुरू केलेले भांडार

३) ग्राहकांनी परस्परांच्या हितरक्षणासाठी स्वेच्छेने एकत्र येऊन सहकारी तत्त्वानुसार स्थापन केलेली संस्था

४) ग्राहकांना वाजवी दरात वस्तू व सेवा पुरविणारी सहकारी संस्था

५) सन १८४४ मध्ये इंग्लंडमधील विणकरांनी एकत्र येऊन स्थापन केलेली ग्राहक सहकारी संस्था

**ड) खालील विधाने चूक किंवा बरोबर ते लिहा.**

१) ग्राहक सहकारी संस्था या ग्राहक हित रक्षणासाठी स्थापन झालेल्या असतात.

२) ग्राहक सहकारी संस्थांमुळे ग्राहकांचे शोषण थांबते.

३) विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार व्यापारी स्थापन करतात.

४) ग्राहक सहकारी संस्थेतून पुरविल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किंमती जास्त असतात.

५) ग्राहक सहकारी संस्थांचा मुख्य हेतू जास्तीत जास्त नफा मिळविणे हा असतो.

६) जगातील पहिली ग्राहक सहकारी संस्था अमेरिकेत स्थापन झाली.

७) ग्राहक सहकारी संस्थेमुळे निर्भेळ व दर्जेदार मालाचा पुरवठा होतो.

**इ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) ग्राहक सहकारी संस्थेमुळे ............... चे उच्चाटन होते.

२) ग्राहक सहकारी संस्था ग्राहकांना ........... वस्तूचा पुरवठा करतात.

३) जगातील पहिली ग्राहक सहकारी संस्था ............ या देशात सुरू झाली.

४) ग्राहक सहकारी संस्था दर्जेदार वस्तूचा पुरवठा .......... किंमतीला करतात.

५) जागतिक सहकारी चळवळीचा उगम ........... संस्थेच्या स्थापनेतून झाला.

६) ग्राहक सहकारी संस्था ............ कडून वस्तूची खरेदी करतात.

(फ) अचूक पर्याय निवडा.

| | |
|---|---|
| १) सुपर बाजार | |
| २) | शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी |
| ३) ग्राहक सहकारी संस्था | |
| ४) | राष्ट्रीय ग्राहक दिन |
| ५) पहिले ग्राहक भांडार स्थापना | |
| ६) जागतिक ग्राहक दिन | |

१५ मार्च, २० सप्टेंबर १९०५, दिल्ली, विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार, ग्राहकांचे संरक्षण, २४ डिसेंबर

ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) ग्राहक सहकारी संस्था म्हणजे काय?
२) मध्यस्थांकडून ग्राहकांचे शोषण कशाप्रकारे होते?
३) ग्राहक सहकारी संस्थाचे प्रकार कोणते?
४) विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार म्हणजे काय?
५) ग्राहक सहकारी संस्थांची संघीय रचना कशी असते?

ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.

१) ग्राहक सहकारी संस्था ग्राहकांना चैनीच्या वस्तूचा पुरवठा करतात.
२) ग्राहक सहकारी संस्थांमुळे वस्तू वितरणाच्या साखळीतील उत्पादकांचे उच्चाटन होते.
३) ग्राहक सहकारी संस्था नफा मिळविण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या असतात.
४) ग्राहक सहकारी संस्थांमुळे मालाची विक्री केवळ उधारीनेच केली जाते.
५) एकाच छताखाली अनेक विभाग असलेली मोठी भांडारे म्हणजे पतपुरवठा संस्था होय.
६) जगातील पहिली ग्राहक सहकारी संस्था भारत या देशात सुरू झाली.
७) राष्ट्रीय ग्राहक दिन १ जून या दिवशी साजरा केला जातो.

ई) गटात न बसणारा शब्द शोधा.

१) अ) प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था ब) मध्यवर्ती ग्राहक भांडारे
क) गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ ड) विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार

२) अ) २० सप्टेंबर ब) २४ डिसेंबर
क) २ ऑक्टोबर ड) १५ मार्च

प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.

१) सुपर बाजार

२) विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार

३) प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था

**प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.**

१) ''ग्राहक सहकारी भांडार – एक आदर्श व्यवहार असतो''.

२) वस्तू वितरणातील मध्यस्थांच्या अनिष्ट व्यापारी प्रथा घातक असतात.

३) 'ग्राहक हा बाजारपेठेचा राजा असतो'.

**प्र.४ फरक स्पष्ट करा.**

१) ग्राहक सहकारी संस्था आणि विपणन सहकारी संस्था

२) सेवा सहकारी संस्था आणि ग्राहक सहकारी संस्था

३) ग्राहक सहकारी संस्था आणि पतपुरवठा सहकारी संस्था

४) ग्राहक सहकारी संस्था आणि प्रक्रिया सहकारी संस्था

५) गृहनिर्माण सहकारी संस्था आणि ग्राहक सहकारी संस्था

**प्र.५ टीपा लिहा.**

१) ग्राहक सहकारी संस्थेचे प्रकार

२) ग्राहक सहकारी संस्था

३) ग्राहक सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये

**प्र.६ कारणे द्या.**

१) वस्तू वितरण व्यवस्थेत ग्राहक सहकारी संस्था महत्वाची भूमिका पार पाडतात.

२) ग्राहक सहकारी संस्था रास्त किंमतीला वस्तूचा पुरवठा करतात.

३) ग्राहक सहकारी संस्थेमुळे ग्राहकांचे शोषण थांबते.

४) ग्राहकांच्या हित रक्षणासाठी ग्राहक सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत.

५) ग्राहक सहकारी संस्थांकडून वस्तू विक्री व्यवहारातील मध्यस्थांचे उच्चाटन होते.

**प्र.७ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) ग्राहक सहकारी संस्थाची वैशिष्ट्ये लिहा.

२) ग्राहक सहकारी संस्थेचा अर्थ व व्याख्या लिहा.

३) ग्राहक सहकारी संस्थेची कार्ये लिहा.

**प्र.८ दिर्घोत्तरी प्रश्न.**

१) ग्राहक सहकारी संस्था म्हणजे काय ? ग्राहक सहकारी संस्थेची कार्ये सविस्तर लिहा.

२) ग्राहक सहकारी संस्थेची व्याख्या लिहून वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

◆◆◆

## संदर्भ सूची


लेखकांनी पाठ्य घटकांचे लेखन करतांना वापरलेली संदर्भ सूची

१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे – प्रथमावृत्ती २००९
इयत्ता ११ वी सहकार

2) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे – प्रथमावृत्ती २०१३
इयत्ता ११ वी सहकार

3) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे – प्रथमावृत्ती २०१३
इयत्ता १२ वी सहकार

4) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे – प्रथमावृत्ती २०१३
इयत्ता १२ वी वाणिज्य संघटन आणि व्यवस्थापन

५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०

६) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारित) अधिनियम, २०१३

७) कंपनी कायदा २०१३



## ABBREVIATIONS

| | | |
|---|---|---|
| PCCS | – | Primary Consumers Co-operative Society. |
| PCMS | – | Primary Co-operative Marketing Society. |
| PSR | – | Profit Sharing Ratio. |
| PROC | – | Processing. |
| RBI | – | Reserve Bank of India. |
| SCB | – | State Co-operative Bank. |
| SCCF | – | State Co-operative Consumers Federation. |
| SCMF | – | State Co-operative Marketing Federation. |
| DCCB | – | District Central Co-operative Bank. |
| STL | – | Short Term Loan. |
| MTL | – | Middle Term Loan. |
| NCHFI | – | National Co-operative Housing Federation of India. |
| AMUL | – | Anand Milk Union Limited. |
| HUDCO | – | Housing and Urban Development Corporation. |
| HDFC | – | Housing Development Finance Corporation. |
| ICA | – | International Co-operative Alliance. |
| MAHANAND DAIRY | – | Maharashtra State Co-operative Milk Federation |
| NABARD | – | National Bank for Agricultural and Rural Development. |
| NCCF | – | National Co-operative Consumers Federation. |
| NCDC | – | National Co-operative Development Corporation. |
| NDDB | – | National Dairy Development Board. |



































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे–४११००४.

₹ 88.00